## प्रकरण 4

# उत्तर चालुक्यकालीन विविध शैव प्रवाह

मागील प्रकरणात उत्तर चालुक्यकालीन धार्मिक परिस्थिती जाणुन घेतली. या प्रकरणात तात्कालीन हिंदु धर्मातील विविध प्रमुख प्रवाहांपैकी एक आसणारा शैवपंथ व त्याचे विविध उपप्रवाह यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या कालखंडात विविध शैव पंथ व त्याचे विविध प्रवाह लोकप्रिय होते. तत्त्कालीन कोरीव लेखातून पाशुपत, कालामुखी, वीरशैव लिंगायत, सिद्धरामेश्वरांशी संबंधित विविध शैव प्रवाहांचा उल्लेख येतो. याशिवाय तत्कालीन वाङ्मयीन साधनांमधुनही या शैव संप्रदायाशिवाय नाथ संप्रदायाचाही उल्लेख येतो. या कालखंडाशी संबंधित विविध शैव प्रवाहांची ओळख आपण पुढीलप्रमाणे करून घेवू.

## पाशुपत

हा उत्तर चालुक्य समकालीन प्रसिद्ध शैव संप्रदाय आहे. इतिहासातील सर्वात प्राचीन तांत्रिक पंथ म्हणून पाशुपतांचा उल्लेख केला जातो. कांही वैदिक व वैदिकोत्तर वाङ्मयीन साहित्यात तर काही शिलालेखांमधून पाशुपत संप्रदायाचे उल्लेख येतात. पाशुपत संप्रदयाच्या तत्त्वज्ञानावर आधारित पाशुपत शास्त्र नावाचा एक ग्रंथ उपलब्ध आहे. उपनिषदे, सुत्रे, संहिता, महाभारत, माधवाचार्यांचे सर्वदर्शनसंग्रह, शिवमहापुराण, शिवपुराणातील कारवणमहात्म्य प्रकरणात, वायुविध पुराण, लिंगपुराण या शिवाय लकुलिशाने लिहिलेल्या 'पंचार्थविद्या' अथवा पंचाध्यायी या ग्रंथातून या पंथाबद्धलची माहिती मिळते. आचार्यांचा उल्लेख राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, तसेच कर्नाटकातील शिलालेख व ताम्रशासनातून मिळतो.[1] शिवाय महाराष्ट्रातील पूर्वचालुक्य व राष्ट्रकुटांच्या दानपत्रातूनही पाशुपतपंथीय आचार्यांना दानपत्रे दिल्याची आढळतात.[2] इ. स. च्या 971 च्या नागराज मंदिरातील शिलालेखात लकुलीशास पाशुपात संप्रदायाचा संस्थापक म्हटले आहे.[3]

---

1. देशपांडे ब्रह्मानंद, 3 शोध निंबंध, प्रथम आवृत्ती, परिचय प्रकाशन, औरंगाबाद, 1982, पृ.क्र.95.
2. भुसारी रघुनाथ महारूद्र, प्राचीन महाराष्ट्राचा धार्मिक इतिहास (इ.स.पूर्व 200 ते इ.स.1350), प्रथम आवृत्ती, मराठी साहित्य परिषद, आंध्रप्रदेश, हैद्रबाद, एप्रिल, 1965, पृ.क्र.51.

पाशुपत पंथाच्या संस्थापकाबद्धल व निर्मितीबद्धल प्राचीन साहित्यात व आधुनिक संशोधकांमध्ये बरेच मतभेद दिसतात. महाभारतात पाशुपतांचा उल्लेख आलेला असून स्वतः भगवान शिवच या पाशुपत पंथाचे मूल प्रवर्तक असल्याचे म्हटले आहे.[4]

'या प्रकारे मी महान पाशुपत योगाची व्याख्या केली. माझ्यावर भक्ती करणाऱ्या मानवांनी दररोज याचे श्रवण केले पाहिजे. जो श्रेष्ठ मानव माझ्या धर्मनिश्चयाचे श्रवण किंवा पठण करतो; तो या लोकांत धनधान्य, कीर्ती मिळवतो आणि परलोकांत स्वर्ग प्राप्त करतो'.[5]

ऐतिहासिक दृष्टया 'नकुलिश' उर्फे 'लकुलीश' नावाच्या व्यक्तीने पाशुपत पंथाची स्थापना केल्याचे बहुतेक विद्वान मान्य करतात. गुजरात मध्ये लकुलीशाचे एक मंदीर आढळते. 'लकुलीश' उर्फ 'नकुलीश' विरचित 'पाशुपत सूत्रम्' या ठिकाणी माधवाने वापरलेल्या 'नकुलीश' या रूपाऐवजी विकल्पाने रूद्र असलेले 'लकुलीश' हे रूप डॉ.तगारे 'शैवदर्शन' ग्रंथात वापरतात. या मागचे कारण सांगतांना ते लिहितात, लकुलिशाच्या भारतभर पसरलेल्या मूर्ती हातलकुल (लाकुल–'सोटा') असलेल्या आहेत. पुरांणातून तेच रूप आढळते. कर्मपुराणा 1–53 व शिव पुराण वायवीय संहितेत 2.9.5 लकुलिशाला शिवाचा 28 वा अवतार असे म्हटले आहे.[6] वराहकल्पाच्या सातव्या मन्वंतरातील अठ्ठाविस युगात भगवान रूपाने अवतार धारण करूनु 'पाशुपत धर्मा'चा प्रचार केला. शिव महापुराणात असे वर्णिले आहे की, अठ्ठाविस योगाचार्य व त्याचे 112 शिष्य होते. त्यांची नावे, 1.श्वेत, 2.सुतार, 3.मदन, 4.सुहोत्र, 5.कंक, 6.लौगाक्षी, 7.महासाय, 8.जैगिशव्य, 9. दधिवाह 10.ऋषभ 11.उग्रऋषी, 12.अन्वी, 13.सुबालक, 14.गौतम, 15. वेद शिराऋषी, 16. गोकर्ण, 17.गुहवासी (शिखंडी), 18.जठामली, 19.अट्टहास, 20.दारूक, 21.लांगली, 22.

---

3. यदुवंशी, शैवमत, प्रथम आवृत्ती बिहार राष्ट्रभाषा परिषद, पटणा, 1955, पृ.क्र.153.
4. सांख्य योगः पांचरात्रं वेदः पाशुपह तथा। ज्ञानान्येतानी राजहौ विध्दी नानामतानि।। 64।।
   उमापतिः भूतपतिः श्रीकठो ब्राह्मणः शुतः। उक्तवान इदय अव्योगो ज्ञानं पाशुपतं शिवः।।67।।
   **(महाभारत शांतिपर्व अध्याय 349)**
   एतंत ते सर्व मारण्यात योगं पाशुपतं महतं । मद्रक्तैर्मनुजैर्देवि श्राव्यकेतद दिने दिने ।।
   श्रणुयाद यः पन्दे वापि ममेदं धर्मनिश्चयम। स्वर्ग कीर्ती धन धान्य लाभते सनरोत्तमः।।
   **(महा.अनु. पृष्ठ 6021)**
5. अभ्यंकर शंकर वासुदेव (संपादक), भक्तीकोश, प्रथम आवृत्ती, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, मार्च 2001, पृ.क्र.1296.
6. तगारे ग.वा., शैव दर्शन, प्रथम आवृत्ती, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, 1987, पृ.क्र.24.

महाकाल, 23.शुली, 24.दंडी, 25.मुंढी, 26.सहिष्णू, 27.सौमशर्म, 28.नकुलीश्वर अशी आहेत.[7] लकुलीशाचा जन्म 'कारवाण' (ता.डभई, जि. बडोदा), येथे 'विश्वराज' नामक एका अग्निहोत्राच्या घराण्यात झाला.[8] त्यांच्या जन्माविषयी अशी कथा सांगितली जाते की, अठ्ठाविस युगापैकी शेवटच्या युगात शिव धर्माचा प्रचार करण्याच्या हेतूने भगवान शिवाने कायारोहण कारवाण येथील एका मृत शरीरात प्रवेश करून नकुलेश्वर नावांने अठ्ठाविसावा अवतार धारण केला.[9] नकुलीश थोडा मोठा झाल्यावर उज्जैनीला गेला, त्या ठिकाणी ब्रह्मावर्ताहून आलेल्या 'कुशिक' नामक ब्राह्मणास त्याने पाशुपतसूत्र म्हणून प्रसिद्ध असलेली 168 सुत्रे शिकविली.

लकुलीशाच्या त्रोटक सुत्रापेक्षा कोष्टन्याच्या 'पंचार्थ' भाष्यावरून आपणांस तत्कालीन पाशुपत तत्त्वज्ञानाची पहिली मिळू शकते हे त्याचे महत्त्व आहे. मोक्षमार्गाचे विवेचन करणाऱ्या या सूत्रग्रंथात लकुलीशाने 1.कारण, 2.कार्य, 3.योग, 4.विधी आणि 5. दुःखान्त या पांच अर्थाचे विवरण केले आहे. या पैकी 1.कारण (पती) व 2.कार्य (पशु) यांनाच 'पदार्थ' (तत्त्व) किंवा फिलॉसॉफिकल कॅटेगरिज म्हणता येईल. या पैकी कारण (पती, शिव, ब्रह्म) ही संकल्पना वैदिक (तैतरीय) परंपरेतील आहे. मोक्ष प्राप्तीसाठी ब्रह्माचा जप करावा (अत्रेंदं ब्रह्मा जपेत्) ही सूचना 1.39,2.21,3.20,4.21 व 5.41 या पाच ठिकाणी दिलेली आहे. आणि या प्रत्येक सुत्रांनतर ब्रह्म संकल्पना स्पष्ट करण्यासाठी या परिच्छेदात पुढे दिल्याप्रमाणे विशेषणे वापरली आहेत. आणि विशेष असा की ही सर्व विशेषणे तैतरीय आख्याकाच्या महानारायणीय उपनिषदातून 17.1.5 शब्दशः घेतली आहेत. उदा. 1.39 नंतर ब्रह्म कल्पना स्पष्ट करण्यासाठी पुढील विशेषणे योजली आहेत. इतकेच नव्हे तर तैतरीय आ. 17.1 हा मंत्रच पासून 1.40 ते 1.44 पर्यंत भिन्न सूत्रे म्हणून वापरला आहे. तो मंत्र असा,[10]

---

7. संपादक मंडळ, वीरशैव विश्वकोश, खंड 1, प्रथम आवृत्ती, अखिल भारतीय मराठी वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर, डिसेंबर 2001, पृ.क्र.72.
8. तगारे ग.वा., शैव दर्शन, प्रथम आवृत्ती, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, 1987, पृ.क्र.24.
9. संपादक मंडळ, उपरोक्त, पृ.क्र.72.
10. तगारे ग.वा., उपरोक्त, पृ.क्र.25.

कौण्डिन्य (इ.स. चे चौथे किंवा पाचवे शतक) व नकुलिश (इ.स. चे दुसरे किंवा इ. स.पूर्व दुसरे शतक) सायणापुर्वी निदान शतकापूर्वी होवून गेले असल्यामुळे वेदपरंपरेत कौण्डिन्याला अभिप्रेत असलेला अर्थच त्याकरीता रूढ असण्याची शक्यता आहे. या मंत्राचा आणखी एक विशेष म्हणजे हे मंत्र पाशुपत येणाऱ्या भिन्न प्रकट अवस्थात अनुक्रमाने चिंतन करावयाचे असते. उदा. प्रथमावस्थेत शिवमंदीरात राहून भस्मस्नान, निर्माल्यधारण, हसित, शिवाप्रमाणे अट्टहास करणे इत्यादी उपहारांनी व्रत किंवा नियम यांनी शिव करीत असतांनां सघोजात प्रपद्यामि इत्यादी ( तै. अ. 17.1) चाजप करावयाचा दुसऱ्या अवस्थेत यम नियमयुक्त कठोर तप करावयाचे असून इतर देव किंवा पितर यांच्या उपासना न करता अनन्यभावाने शंकराची उपासना करावयाची असते. त्या अवस्थेत वामदेवाय नमो ज्येष्ठाय नमो इत्यादी (तै. आ. 17.2) चा जप सांगितला आहे. तिसऱ्या अवस्थेत अहंकार व पाप झाडून टाकण्यासाठी इतर लोक जेणेकरून आपला अपमान अथवा निंदा करतील असे (अंतर्यामी शुध्द राहून) वर्तन करावे (समाज अमान्य वर्तन) (तै.आ.17.3) चौथ्या अवस्थेत आपली विद्या वा तपस्या गुप्त राखण्यासाठी ओसाड घर किंवा गुहेत राहण्याबरोबर मुद्याम उन्मत्त किंवा मूढ असल्यासारखे दाखवणे व त्याच बरोबर 'तत्पुरूषाय विद्यहे' इत्यादी (तै.आ.17.4) चा जप सांगीतलेला आहे. याच्याच प्रगत अवस्थेत स्मशानात झाडाखाली किंवा आकाशाखाली रूद्राच्या ठिकाणी लक्ष केंद्रीभूत करावयाचे असते. शेवटच्या पांचव्या अवस्थे ईशान, सर्वभुतानाम, (तै.आ.17.5) चा जप सांगीतला आहे.[11]

तांत्रिकता, तत्त्वज्ञान, अध्यात्मतेतून पाशुपत संप्रदायाचे सुबोध, 168 सुत्रांच्या आधारे कांही वैशिष्ट्ये आढळतात.

1. केवळ दुःखान्त म्हणजे मोक्ष नव्हे. महेश्वरात विलीन होणे म्हणजे अद्वैतवादी मानतात, तसा मोक्ष नसतो. जीव किंवा आत्मा त्या अवस्थेत महेश्वरासारखा दृकशक्ती व क्रियाशक्ती या ऐश्वर्याने संपन्न असतो. यात दुःख मुक्ती येते. मोक्षावस्थेत जीव महेश्वरांच्या समीप पण स्वतःचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व राखून असतो.
2. पाशुपत दर्शनात कैलास किंवा शिव लोक वैकुंठ इत्यादी पौराणिक कल्पनेला स्थान नाही.

---

11. 'सघोजांव प्रपद्यामि सद्योजाताय वै नमःद्य। भवे भवे नातिभवे भवस्वा मां भवोद्भवाय नमः'।।15। **(तै. आ. 17.1)**– तगारे ग.वा., शैव दर्शन, प्रथम आवृत्ती, मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, 1987, पृ.क्र. 27.

3. मनुष्याच्या कर्माप्रमाणे मनुष्याला गती मिळते. पण नियतिवाद किंवा कर्मवादाचा प्रभाव नाही. ईश्वरी अनुग्रहाने मलनाश पापनाश होवून मोक्ष दुःखान्ते प्राप्त होतो. मोक्ष ही मानवी कर्तव्यापेक्षा ईश्वरी अनुग्रहावर अवलंबून असणारी गती आहे.
4. ईश्वरी अनुग्रहाचे महत्त्व माणसाने कितीही सत्कर्मे व तपश्चर्या केली तरी परमेश्वरी कृपेखेरीज दुःखान्त मोक्ष नाही.
5. पुनःर्जन्म कल्पनेचा स्पष्ट उल्लेख नाही.
6. सगुण, निर्गुण उपासना पध्दतीचा उल्लेख नाही.
7. केवळ ओमकार जपावर भर 'ओमकार मामिध्यायीत' (पाशू 5.24) सुत्रावर कौण्डिण्याने भाष्यात म्हटले आहे. 'दुःखान्तनिमीत्त ध्यानौकविषयत्त्वम, ओडकरात्त्वम'
8. मायावादाचा, वेदान्तमताचा किंवा जैन, बौद्ध मतांचा उल्लेख नाही.
9. ग्रंथ संपतांना शैव दाखविण्यासाठी निदान शेवटच्या शब्दाची किंवा शब्द समुहाची पुनरावृत्ती करतात. उदा. ब्रह्मसूत्राच्या शेवटी अनावृत्ती शब्दात 'अनावृत्ती शब्दातः, अशी पुनरूक्तीः असते. या ग्रंथात तसे केले नाही. नुसता शिव (5.47) असाच शेवट केलेला आहे.[12]

लकुलिश व त्यांचा पाशुपत संप्रदाय इ. स. च्या आठव्या शतकापासून ते तेराव्या शतकापर्यंत मध्यभारतासह दक्षिण भारतात पसलेला होता. याचे उल्लेख तत्त्कालीन शिलालेखात, ताम्रपट, मूर्तीकला, तत्कालीन साहित्यिक साधनातून येते. जैन लेखक हरिभद्र, गुणरत्न व राजशेखर स्वतः पाशुपात वा वैदिकधर्मानुयायी नसले; तरी आपल्या समकालीन पाशुपतांची जीवनपद्धती व कांही अंशी तत्त्वज्ञान याची माहिती हरिभद्रसुरी इ.स. आठवे शतक व त्याचा टीकाकार गुणरत्न सुरी आणि राजशेखर सुरी (इ.स. 1300 ते 1350 च्या सुमारास) या जैन ग्रंथकारांनी दिली आहे.

आचार्य हरिभद्राच्या षड्दर्शन समुच्चयावरील टीकेत गुणरत्न लिहतो. – 'प्रथमतः नैयायिकांची अथवा यौगांची आचार पद्धती सांगतो ते 405 धारण करतात. मोठे (प्रौंढ)

---

12. तगारे ग.वा., शैव दर्शन, प्रथम आवृत्ती, मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, 1987, पृ.क्रं 28.

कौपीन घालतात व कांबळे पांघरतात. हे जटाधारी, भस्म चोपडलेले व यज्ञोपवीत धारण करणारे असतात. ते कमण्डलुधारक आहेत. त्यांचा आहार नीरस असतो. ते बहुधा वनात झाडाखाली राहून कंदमुळे आहार घेतात. ते अतिथ्यशील असतात. काही सापत्नीक असतात पण त्यांच्या पैकी जे श्रेष्ठ आहेत ते एकटे निस्त्रीक राहतात. हे पंचाग्निसाधन कटाक्षाने करतात. पंचाग्निसाधनपराः हे हात दंड, जटा इ. ठिकाणी प्राणलिंग धारण करतात. उत्तम अशी संयमावस्था प्राप्त झालेले नग्न हिंडतात. सकाळी शौचमुखमार्जन झााल्यावर तीन त्रिकाळ अंगाला भस्म लावून शिवध्यान करतात. यजमान हात जोडून त्यांना 'ओम नमः शिवाय' म्हटले तेंव्हा 'गुरू नमः शिवाय' असे उत्तरादाखल म्हणतात'.[13]

लकुलीशाचा जन्म गुजराथमध्ये कारवाण येथे झाला. पुढे तो उज्जैनला गेल्या नंतर कुशिका गार्ग्य सारखे अनेक शिष्य येवून मिळाले. शिष्य कुशिकाच्या शिष्यपरंपरांचा टप्पा चंद्रगुप्ताच्या मथुरा कोरीवलेखात व इ.स. 978 च्या राजस्थानातील नरवाहनाच्या उदयपूर शिलालेखात येतात. गार्ण्यांचा शिष्यपरंपरेचा तपोराशी, वाल्मिकी, राशी इ. व लाट दक्षिण गुजरात, केदार, प्रयाग, श्रीपर्वत, आंध्र, रामेश्वर ही पाशुपत केंद्रे असल्याचे उल्लेख शार्डगदेवाच्या (इ.स. 274–96) सिंत्रा प्रशस्तीत[14] आहे. युवानच्वांग (हयु–एन–त्संग) (इ.सन 629–645 इ.स.) या चिनी प्रवाशाला पाशुपत क्षेत्रे पुढील ठिकाणी आढळली. जालंधर, अहिछत्र, मलकूट, केरळ, माळवा, महेश्वर, खोटात, बिहारमध्ये इ.सनाच्या नवव्या व दहाव्या शतकातील लकुलीश मंदीरे, सिघभुम, जिल्हयात आहेत. आसाम मधील इंद्रपालच्या (इ.स. चे अकरावे शतक) ताम्रपटात 'जयति पशुपति प्रजाधिनाथ' म्हटले आहे यावरून त्या भागात पशुपतीचे महात्म्य होते. ओरीसामध्ये लकुलीश व त्याच्या शिष्यांच्या सुरेख मूर्ती परशुराममेश्वर, (परारोश्वर) (इ.सन 75 च्या सुमारास), कपिलेश्वर, मुक्तेश्वर (इ.सन 950 च्या सुमारास) इत्यादी, भुवनेश्वर मंदिरात असल्याचे के. सी. पाणिग्रहिनी, 'आर्केऑलॉजिकल रिमेन्स ॲट भुवनेश्वर' मध्ये नमुद केले आहे. दक्षिण भारतात पाशुपतमताचे पुनरूज्जीवन करण्यासाठी लकुलीशाने चल्लुका अवतार धारण केला असे

13. तगारे ग.वा., शैव दर्शन, प्रथम आवृत्ती, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, 1987, पृ.क्र. 33.

14. EP.Ind.P.282

हेमवती उत्कीर्ण लेखात म्हटले आहे.[15] महाराष्ट्रात घारापुरी (मुंबई जवळ) लेण्यातील मूर्ती लकुलीश पाशुपाताशी संबंधित आहेत. [16] दक्षिणेतील इ.सन. 1078 सालच्या एका शिलालेखात एका तपस्वीला लकुलीश असे म्हटले गेले.[17] 12व्या शतकातील शिलालेखात सोमेश्वर सुरीने लकुलिशाच्या तत्त्वज्ञानाचा पुन्हा प्रचार केल्याचा उल्लेख सापडतो.[18] इ.सन 1285 च्या शिलालेखात दान देणारा व्यक्ती लकुलिशाच्या पंथाचा सदस्य असल्याचे म्हटले आहे.[19] कलचुरी राजवंशाने (अल्हणदेवी आणि बोहला राणी) पाशुपत मताला प्रसारार्थ मदत केली आणि पाशुपताचार्यासाठी कांही मठ भेडाघाट इथे बांधून दिले[20]

## कल्याणी चालुक्य कालीन कोरीव लेखांमधून आलेली पाशुपतांचे संदर्भ

इ.स.च्या दहाव्या शतकापर्यंत शैव पाशुपत संप्रदायात बरेच परिवर्तन घडून आलेले होते. कल्याणी चालुक्यांशी संबंधित शिलालेखामध्ये पाशुपतांचा उल्लेख आढळतो. हे उल्लेख पाशुपत व पाशुपतांशी संबंधित कालामुखी पंथाशी आलेले आहेत. उत्तर चालुक्य कालखंडात पाशुपत शाखा परवर्तीत स्वरूपात दिसते. पुढे ती कालामुखी म्हणून ओळखली जावू लागले. 'राशी' अथवा 'पंडित' अशा पदव्या पाशुपत कालामुखी आचार्यांनी आपल्या नावापुढे धारण केलेल्या दिसतात.[21] असे असले तरीही काही शिलालेखांमध्ये मात्र पाशुपत व त्यांच्या आचार्यांचा उल्लेख आलेला दिसतो. चालुक्यांचे सामंत शिलाहार राजा मारसिंह याच्या इ.स. 1058 सालच्या मिरज शिलालेखात पाशुपत आचार्य चिक्‌देवराय व त्याची गुरूपरंपरा दिसते. चिकदेवराय हे ब्रह्मेश्वर देवाचे शिष्य होते. त्यांना मिरंजी (आधुनिक मिरज) येथे दान दिल्याचा उल्लेख प्रस्तुत शिलालेखात येतो.[22] तीर्थ, (जिल्हा सोलापुर)

---

15. JBBR AS XXII, P.101
16. Charles-I - Callins: Elephanta and The Relief, of Lakulis`a Pasupata- Joaos 102-104 (Oct.-Dec 1982) PP 605- 615
17. Ep-Ind-part 7, Sekarpur, P.NO. 107
18. ए. कर्नाटक, भाग 07, खंड 02, पृ.क्र. 64
19. यदुवंशी, शैवमत, प्रथम आवृत्ती बिहार राष्ट्रभाषा परिषद, पटणा, 1955, पृष्ठ क्रं.158.
20. अभ्यंकर शंकर वासुदेव (संपादक), भक्तीकोश, प्रथम आवृत्ती, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, मार्च 2001, पृ.क्र.1299.
21. शिवणी शिलालेख–रूद्रशक्ती पंडित, तीर्थ शिलालेख–विमलशक्ती पंडित, निबंरगी शिलालेख, ब्रह्मराशी पंडित, करडखेल शिलालेख– चंद्रशेखर पंडित व ज्ञानेश्वर पंडित, तरडखेल शिलालेख – वागेश्वर पंडित, भैरनमट्टी शिलालेख – सिंहराशी, मोरखंडी शिलालेख –गंगराशी पंडित इत्यादी
22. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Kannada Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2001, Page No.174 – 177.

येथील पाशुपत आचार्याला व शैव पाशुपत मठाला चालुक्य राजा विक्रमादित्य सहाव्याचा सामंत कलचुरी जोगमरसाने दान दिल्याचा उल्लेख प्रस्तुत इ.स. 1082 च्या शिलालेखात येतो.[23] नांदेड जिल्हयातील करडखेल व तडखेल हे पाशुपतांची प्रसिद्ध स्थळे असल्याची तेथील शिलालेखावरून स्पष्ट होते. येथे चालुक्यांचे सामंत नौळंब वंशीयाची सत्ता होती. त्यांनी व त्यांच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी पाशुपत मठाधिशांना विविध गावातील कराच्या रूपाने मिळणारे उत्पन्न दिल्याचे आढळते.[24] सांगली जिल्हयातील उंबरणी येथील कोरीव लेखात पाशुपत मठाधिशांची वर्णने आलेली आहेत.[25] बागलकोट जिल्हयातील बेळगी येथील चालुक्य राजा भुवनौकमल्ल (इ.स. 1075) च्या शिलालेखात किसूकाडू –70 प्रांतातील बादूंबेयचापाळू हे गाव दान दिल्याचा उल्लेख येतो. हे दान वळून्दचा अधिकारी चंदीमरसाने दिलेले होते.[26] मोरखंडी जि.बिदर येथील शिलालेखानुसार पाशुपत आचार्य गंगेश्वर याला रावीशेट्टी नावाच्या व्यापाऱ्याने दान दिल्याचा उल्लेख येतो. (110 गदयांन वार्षिक उत्पन्नाची बागायती जमिन)[27] बिदर जिल्हयातील हाळ्ळी येथील चालुक्य राजा त्रिभुवन मल्लाचा सामंत राघवराम याने पेर्मोडी राजाचा दंडनायक (सेनापती) च्या आज्ञेवरूण पंपेश्वर मंदिराला दान देतेवेळी मुळचा उत्तरेतील वाराणसी येथील रहिवाशी असणारा व हाळ्ळी येथे आलेला पाशुपताचार्य रत्नवासी या आचार्याची पादपूजा करून त्याला भुदान दिल्याचा उल्लेख प्रस्तुत गावातील शिलालेखात आलेला आहे.[28] यावरून या कालखंडात उत्तर भारतातून अनेक पाशुपत आचार्य दक्षिण भारतात आल्याचे स्पष्ट होते.

सारांश रूपाने असे सांगता येईल की, वेदकालापासून प्राचीन परंपरा असलेला व अखिल भारतात पसरलेला पाशुपत संप्रदाय हा महत्त्वाचा शैवसंप्रदाय आहे. उत्तर भारतातुन या संप्रदायाचा प्रसार दक्षिणेत झाला. उत्तर (कल्याण) चालुक्य कालखंडापर्यंत

---

23. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Kannada Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2001, Page No. 242 – 243.
24. Upadhya G.N., ibid, Page No.92-94, 96-97, 102-103, 107.
25. Upadhya G.N., ibid, Page No.163 - 168
26. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No. 57 – 60.
27. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – VIII, Bidar District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 2006, Page No.77 - 78
28. Reddy Devarakonda,ibid, Page No.83 - 84

या संप्रदायाचे अनुयायी दक्षिणेत येत राहिले. तत्कालीन शासनकर्त्यांनीही या संप्रदायिक आचार्यांना विविध प्रकारच्या देणग्या दिल्याचे वरील काही ऐतिहासिक साधनांवरुन स्पष्ट होते.

# कालामुखी संप्रदाय

## कालामुखी संप्रदायाची साधने व त्याचा इतिहास

कालामुखी संप्रदायाशी संबंधित मोठया प्रमाणात पुरातत्त्वीय साधने उपलब्ध आहेत. ज्यामध्ये शिलालेखाची संख्या मोठया प्रमाणात आहे. कालामुखी संप्रदायाशी संबंधित शिलालेख कर्नाटकातील शिमोगा, बेलगांम, बेल्लारी, विजापूर, धारवाड, चिकमंगळुर, चित्रदुर्ग, हसन, कोलार व तुमकुर या जिल्ह्यात आढळतात. महाराष्ट्रात सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, लातूर व नांदेड तर आंध्रप्रदेशातील निझामाबाद, बोधन, व परिसरात कालामुखी संप्रदायाशी संबंधित शिलालेख आढळतात. यातील बहुतांश शिलालेख कल्याणी चालुक्य व कलचुरी राजवटीशी संबंधित असून; कालामुखीच्या गुरूंना व मठ मंदिरांना दिलेल्या ज्ञानाशी संबंधित आहेत. या शिलालेखांवरून कालमुखीची गुरूपरंपरा, साधना पध्दती व त्यांच्या शैक्षणिक कार्यासंबंधीची माहिती उपलब्ध होते.

रामानुजाचार्याच्या (11 वे शतक) ब्रहमसुत्रावर 2.2.37 आपल्या भाष्यात कापालिक तसेच कालामुख या नांवाचे वर्णन वेद विरोधी चरित्राच्या रूपात करतात.[29] शिवाय कर्नाटक, आंध्रप्रदेश व दक्षिण महाराष्ट्रात आढळून आलेल्या शिलालेख व ताम्रपटात कालामुखांचा उल्लेख आढळतो. कालामुखांचा प्राचीन उल्लेख राष्ट्रकुट राजा गोविंद तिसऱ्याच्या इ.स. 807 च्या नंदी ताम्रपटात आहे. त्यात असे लिहीले आहे की, ईश्वरदास या राजाने नंदीच्या देवालयाचा मुख्य असलेल्या एका कालामुख पंथाच्या पुरूषाला एक गाव इनाम दिला.[30] कालामुख पंथाचे वैशिष्ट्ये असे की, इ.स.पूर्व मध्ये कोणतेच उल्लेख आढळून येत नाहीत. मात्र या पंथाच्या मुनींचे अनेक उल्लेख मात्र नंतरच्या शिलालेखात उपलब्ध आहेत. नादीकोड इ.स. 958 व तुमकूर जिल्ह्यातील हेमवती येथिल शिलालेखात

---

29. मंचरकर रत्नाकर बापुराव, वीरशैव संप्रदाय, प्रथम आवृत्ती, डॉ.वा.ग.कल्याणकर गौरव समिती प्रकाशन, श्रीरामपुर, सप्टेंबर 1989, पृ.क्र.162.
30. संपादक मंडळ, वीरशैव विश्वकोश, खंड 1, प्रथम आवृत्ती, अखिल भारतीय मराठी वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर, डिसेंबर 2001, पृ.क्र.73.

कालामुखी आचार्यांची नावे आलेली आहेत.[31] राष्ट्रकुट राजा कृष्ण तिसऱ्याच्या काळात इ. स. 958 साली गगनशिव या कालामुख आचार्याला कांही दान दिल्याचा उल्लेख कऱ्हाड येथील ताम्रपटात दिसतो. हा गगनशिव व ईशानशिवाचा शिष्य असून वल्कलेश्वर मठाचा आचार्य होता. तसेच तो शिव सिद्धांतात निपूण होता. कालामुखांची एक उपशाखा म्हणून समजल्या जाणाऱ्या मत्तमयूर वंशाच्या कर्करोणी शाखेतील आचार्य अम्भोजसिन याच्या आत्रेय नामक शिष्याला अव्वेश्वर देवाच्या पुजेसाठी कांही गावे दान दिल्याचा उल्लेख दक्षिण कोकणातील शिलहारांच्या रत्नागिरी जिल्हयातील खारेपाटण या गांवी सापडलेल्या ताम्रपटात आढळतो. सेऊणचंद्र यादव दुसरा याने नाशिक जिल्ह्यातील चिंचोली हे गाव त्याचा कालामुख पंथीय राजपुरोहित सर्वदेवाचार्य यास दान दिल्याचा उल्लेख इ.स. 1069 च्या वसई ताम्रपटात मिळतो. कल्याण चालुक्यांच्या नंतरही पूर्वकालीन यादव कालखंडात काही अपवादात्मक उल्लेख कोरीव लेखांच्या माध्यमातून कालामुखींची आलेली आहेत. यानंतर मात्र असे उल्लेख आढळत नाहीत.[32] यादव राजा कृष्ण याने आपल्या दरबारात कालामुखांना राजाश्रय दिलेला होता. बेळगाव जिल्हयातील मनोली शिलालेखात शके 1174 राजगुरूस सर्वेश्वर देव या कालामुख शैव पुजाऱ्याला जगदीश्वराच्या पुजेसाठी काही जमीन दान दिल्याबध्दलचा उल्लेख आढळतो.[33] गडिहळ्ळी शिलालेखात दिव्यशक्ती पंडित व त्यांचा शिष्य वामनपंडीत नावांच्या काळामुख मुनीचा उल्लेख आढळून येतो. या शाखेच्या आद्यगुरूचे नाव नाही. श्रीपर्वत मल्लिकार्जून शिलामठ पर्वतवळीय सिंहपरीषद श्रीशैल पर्वतावरील प्रसिध्द मल्लिाकार्जून शिलामठचे आचार्य मालामूख तपोधन रामेश्वर पंडितास काकतीय दुसऱ्या बेहराजाने दान दिल्याचा उल्लेख हनुमकोंड शिलालेखात आहे. सध्या हा शिलालेख कादलीमठ, श्रीशैल पर्वतावर असून त्याचे आता वीरशैव धर्मिय मठात परिवर्तन झालेले आहे. कालामुखांशी संबंधित भुनवल्ली शिलालेखात कालामुख मुनी सर्वेश्वर देवाचा उल्लेख आहे. त्यात त्यांचे लाकुलागम, समय समुद्रधण, जंगम लिंगावतार, उभयकुलशुद्ध,

---

31. संपादक मंडळ, वीरशैव विश्वकोश, खंड 1, प्रथम आवृत्ती, अखिल भारतीय मराठी वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर, डिसेंबर 2001, पृ.क्र.75.
32. ''यादव राजा भिल्लमने इ.स. 1191 होयसळवंशीय वीरबल्लाळवर केलेल्या स्वारीच्या काळात सिद्धांत चंद्रभूषण पंडित या कालामुखपंथीय स्थानकाचार्याला एक गाव दान दिले होते.''— रघुनाथ महारूद्र भुसारी, प्राचीन महाराष्ट्राचा धार्मिक इतिहास (इ.स.पूर्व 200 ते इ.स.1350), प्रथम आवृत्ती, मराठी साहित्य परिषद, आंध्रप्रदेश, हैद्रबाद, एप्रिल, 1965, पृ.क्र.52.
33. संपादक मंडळ, वीरशैव विश्वकोश, वीरशैव विश्वकोश, खंड 1, प्रथम आवृत्ती, अखिल भारतीय मराठी वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर, डिसेंबर 2001, पृ.क्र.75.

कालामुख, मसीय, राजगुरू सर्वेश्वर असे वर्णन केले आहे.[34] कल्याणी चालुक्य कालीन नांदेड जिल्हयातील देगलूर परिसरातील शिलालेखांमध्ये कालामुख आचार्यांचा उल्लेख दिसतो. चालुक्य शासकांनी विद्यादानासाठी म्हणून कालामुख आचार्यांना जमिनी दान दिलेल्या होत्या.

## कालामुखींची प्रमुख स्थळे

कल्याणी चालुक्य कलचुरी कालखंडात त्यांच्या राज्यात कालामुखींची काही प्रसिध्द स्थाने होती. तेथील मठांच्या व मंदिरांच्या नियंत्रणाखाली इतर काही कालामुखी मठ मंदिरे संस्थाने होती. उदा. इ.स. 1094 साली निर्माण झालेल्या बळ्ळेगावी येथील केदारेश्वर (कोंडी) मठाच्या अधिपत्याखाली धारवाड जिल्हयातील अबलूर, हळेनिंडगुंदी, गदग, सुडीचे मठ व शिमोगा जिल्हयातील हक्कलू मठ हे कालामुखी मठ संस्थाने होती. यांचा कारभार केदारेश्वर मठाच्या माध्यमातून चालत असे. या सर्व मठ व मंदिर संस्थाना राज्यसत्तेकडून अग्रहाराच्या रूपाने दानधर्म केले जात असे. बळ्ळेगांवी येथील प्रमुख कालामुखी स्थळाशिवाय श्रीगिरी/श्रीशैल्य हे ही कालामुखांचे एक प्रभावशाली केंद्रस्थान होते. याविषयी अधिक चर्चा प्रकरण क्र. 4 मध्ये केलेले आहे. कालामुखी संन्याशी यंत्र–तंत्र अथवा यक्षिणी विद्येत पारंगत होते. चमत्कारामुळे विरोधकांचा पाडाव करत होते. कोंडी मठात पाठ्यक्रम रचनेत व्यक्त झालेले नैपुण्य निरक्षर तांत्रिक (मांत्रिक) साधू मिळवू शकणार नाहीत असे लॉरेंजन यांचे मत आहे.[35] येथे विशेष म्हणजे कालामुखांच्या मठासाठी प्रसिद्ध असलेल्या बळ्ळेगांवी व श्रीगिरी हे बसवेश्वरांच्या काळात लिंगायत धर्माच्या प्रभावाखाली येवून काळानुसार लिंगायत मठाच्या स्थापनेसाठी, धर्माच्या प्रचारासाठी उपयुक्त ठरले. या संबंधीची चर्चा आपण पुढील प्रकरणात करणार आहोत.

वरील कालामुखी प्रमुख स्थळाशिवाय धारवाड जिल्हयातील गदग हे ही कालामुखींचे एक प्रमुख स्थान होते. इ.स. 1192 साली होयसळ राजा दुसऱ्या बल्लाळाने

---

34. मोगलेवार सुधाकर, वीरशैव धर्मपंथः इतिहास व तत्त्वज्ञान, प्रथमावृत्ती, नटराज प्रकाशन, नागपूर, एप्रिल 1976, पृ.क्र. 61.
35. Lorenzen David N., The Kapalikas and Kalamukhas, First Published, University of California Press, Berkeley and Los Angeles 1972, Page No. 103

कालामुखी त्रिकोटेश्वर मंदिराला ग्रामदान दिले होते. या देवस्थानाचा प्रमुख कालामुखी आचार्य चंद्रभूषण हा तांत्रिक मताचा आचार्य होता. तांत्रिक क्रियासाठी वामांची आवश्यकता असे. यासाठी कदाचित त्याने त्रिकोटेश्वर मंदिर परिसरात वेश्यावस्ती उभारली असावी. असे म्हणण्यापेक्षा समाजाने उपेक्षीत ठेवलेल्या देवदासींना धर्म प्रक्रियेत सामावुन घेण्याची तांत्रीकांची भुमिका होती. तांत्रिक क्रिया कर्मासाठी व त्यांना यात सामावुन घेण्यासाठी देवदासिचे त्यांने समर्थन केले तसा उल्लेख मंदिरातील शिलालेखात दिसतो.[36]

वरील काही प्रमुख स्थानाशिवाय बेळगांव जिल्हयातील मुनवळ्ळी, महाराष्ट्रातील नांदेड जिल्हयातील करडखेल व लातूर जिल्हयातील निलंगा तालुक्यातील गणेशवाडी ही कालामुखी संप्रदायाची प्रमुख संस्थाने होती.

## कालामुखी उपपंथ

लकुलीश पाशुपताची एक उपशाखा म्हणून कालामुख संप्रदायाचा उदय झाला.[37] पाशुपतांप्रमाणे कालामुखही व्रत करतात या व्रतात कंठमाला एक दागिना, कानातील दागिना, शिरोभूषण, भस्म व यज्ञोपवित धारण करणे, डोक्याच्या कवटीतून अन्न घेणे, प्रेतरक्षा अंगास फासणे, रक्त प्राशन, सोटा धारण, दारूभांडे अवलंब या गोष्टी आवश्यक असत. त्यांच्या मते कोणत्याही जातीचा माणूस ब्राह्मणच होतो व हे व्रत घेतल्यास साधु बनतो. असा शैव पंथातील कट्टर तांत्रिक संप्रदाय असल्याची ग्वाही डॉ.दा.ल.सहस्त्रबुध्दे देतात. रामानुज (11वे शतक) मात्र कालामुखास 'महाव्रतधार व लगूडधर' म्हणतो.[38] कालामुखास 'कालामुख' असेही म्हटले जाते. कपाळावार कृष्णवर्णी आडवा पट्टा लावण्याच्या त्यांच्या प्रघातावरून कालामुख किंवा कालामुखी हे नांव पडले असावे असा टी.ए. गोपीनाथराव सारख्या विद्वानांचा तर्क आहे.

---

36. ओळ क्र. 1 – समुद्रातील लाटा स्थगित होवू शकतील पण दयामयी असलेल्या आचार्यास निरंतरपणे दान येत राहतात. ओळ क्र. 2 – अन्न, सुवर्ण, औषध, पाणी, वस्त्रादी, दान त्याच्याकडून घेतलेली जनता समाधानी आहे. ओळ क्र. 3 – चंद्रभूशणने देवस्थानाचा (त्रिकोटेश्वर) जीर्णोध्दार केला. एक नवीन सुंदरपूर बांधले. या अगोदर देवस्थानापासून दूर असलेले वेश्यागृह स्थंलातरीत करून देवस्थानाच्या बाजूला आणले.
**(गदग येथील त्रिकोटेश्वर मंदिर शिलालेख)**
37. तगारे ग.वा., शैव दर्शन, प्रथम आवृत्ती, मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, 1987, पृ.क्र.223.
38. तगारे ग.वा., शैव दर्शन,उक्त, पृ.क्रं.224.

या संप्रदायाचे 1.शक्तीपरिषद 2.सिंहपरिषद असे दोन उपपंथ होते. या संप्रदायाचा प्रसार इ.सनाच्या अकराव्या, बाराव्या व तेराव्या शतकाच्या पुर्वार्धात मुख्यतः कर्नाटक व आंध्रपदेशाचा कांही भाग यात होता. असे उपलब्ध शिलालेखावरून दिसते. या संप्रदायापैकी शक्तिपरिषद ही मुख्यतः धारवाड व शिमोगा जिल्हयात प्रभावी होती. त्या परिषदेच्या देवालयांना व मठाना दिलेल्या देणग्या नमुद करणाऱ्या शिलालेखांची संख्या शिलालेखांवरील सांप्रदायिक, ऐतिहासिक, व इतर माहितीची विपुलता यावरून दिसते. सिंहपरिषद, कर्नाटक, आंध्र व महाराष्ट्राच्या दक्षिण प्रांतात विस्तारलेली असली; तरी त्यांचा देवालयांना व मठांना दिलेल्या देणग्यांच्या शिलालेखांची संख्या शक्तिपरीषदेपेक्षा कमी आहे. या संप्रदायाचे संस्थापक वा प्रचारक काश्मिरी ब्राह्मण असावेत असे विजापूर जिल्हयातील विजापूर (इ.स.1074—75) मुत्तगी (इ.स.1147 व इ.स.1158) येथील शिलांलेखातून आढळते. हे सर्व आचार्य कदाचित काश्मिरी नसतीलही पण हे ब्राह्मण असावेत, कारण ते लकुलागमत (लकुलीशकृत पाशुपतसूत्र इत्यादी) तज्ञ होते. या संप्रदायातील यतींच्या (गुरूंच्या) नावापुढे 'रासी', 'पंडित' व 'शक्ती' अशी उपपदे जोडत असत.[39] पण त्याच बरोबर ते वेद शास्त्र (व्याकरण, न्यायमीमांसा, इत्यादी), पुराण, इतिहास व नीतीशास्त्र यातही पारंगत होते. योगविद्येवर त्यांचा भर होता. त्यांच्या मठातून या विद्यांचे शिक्षण दिले जाई. व त्याबद्दल त्यांना तत्कालीन सत्ताधिशांकडून देणग्या मिळाल्याचे शिलालेखात नमुद केले आहे.[40] त्यांची देवालये (उदा.केदारेश्वर, सोमनाथ, पंचलिंग इत्यादी), महादेवाची (शिवलिंगाची) असून त्यातील कांही लेखांत वर्णाश्रम धर्मावर भर असला तरी पाशुपतांप्रमाणे ते सर्व वर्णांना ज्ञानदान करीत. त्यांच्यानंतर आलेल्या वीरशैवाप्रमाणे ज्ञानेच्छुकांना ज्ञान करण्याविषयीच्या सूचना कांही लेखात आढळतात.

---

39. अतकरे के.एस., गाडगीळ विद्या, संशोधनमुद्रा, प्रथम आवृत्ती, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, जुलै 2009, पृ.क्र. 332

40. द्विवेदी पारसनाथ, भारतीय दर्शन, प्रथमावृत्ती, श्रीराम मेहरा ॲन्ड कंपनी, आग्रा, 1973, पृ.क्र. 332.

## कल्याणी चालुक्य व कालामुखी संप्रदाय

शैव पाशुपंथाची परावर्तीत शाखा म्हणून कालामुखी पंथाकडे पाहिले जाते. दहाव्या शतकापर्यंत उपलब्ध शिलालेखावरून पाशुपतांचे रूपांतर कालामुख संप्रदायात झालेले आढळते. कल्याणी चालुक्य कालीन शिलालेखामध्ये कालामुखींची गुरूपरंपरा सांगताना ती पाशुपत आचार्यांना दाखविलेली आहे. चालुक्य कालखंडात तांत्रिक शैव म्हणून समजली जाणारी ही शाखा लोकप्रिय असल्याचे तत्कालीन विविध कोरीव लेखांच्या आधारे स्पष्ट होते.

डाळींब (जि.उस्मानाबाद) येथील कल्याणी चालुक्य विक्रमादित्य सहाव्याच्या कालखंडातील शिलालेखात या प्रदेशाचा महामंडलेश्वर अहवमल्लरस याचा उल्लेख येतो. 'डाळींब' येथे कालामुखी संप्रदायाचे मठ होते. या मठाचे आचार्य 'संगमेश्वर पंडित' हे असून त्यांनी केलेल्या विद्यादानामुळे 'महामंडलेश्वर अहवमल्लरसा'ने भूदान केल्याचा उल्लेख उपरोक्त शिलालेखात आलेला आहे.[41] उत्तर कर्नाटक कालामुखी पंथाचे केंद्र होते. उत्तर कर्नाटकातील बांगलकोट जिल्हयातील 'हालुर' येथील इ.स. 1030 च्या कोरीव लेखानुसार चालुक्य राजा जयसिंह दुसरा याचा सांमत 'नागतियरस तेजोराशी' पंडित याला दान दिल्याचा उल्लेख येतो.[42] याच जिल्हयातील इ.स. 1033 च्या 'भैरणमट्टी' शिलालेखात कालामुखी संप्रदायाचा 'सिंहराशी' नावाच्या उपशाखेचा उल्लेख येतो. चालुक्य सांमत सिंधवंशिय नागादित्याने कालामुखी उपशाखा सिंहराशी पंडित नागादित्य भट्टाचार्य व तेजोरस पंडित यांना, युध्दासाठी जात असताना त्यांची पादपूजा करून दान धर्म केल्याचा उल्लेख येतो.[43] करडखेल पासून जवळच असणाऱ्या तडखेल (जि.नांदेड) हे ही एक कालामुखींचे प्रसिध्द केंद्र होते. चालुक्य राजा सोमेश्वर प्रथमच्या कालखंडातील इ.स. 1047 च्या शिलालेखात[44] चालुक्य राजवंशाची वंशावळ आढळते. चालुक्य राजा त्रैलोक्यमलदेव याच्या पराक्रमाचे वर्णन यात आहे. त्रैलोकमलदेव व त्याचा सेनापती

41. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Kannada Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2001, Page No.3-7
42. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.31 – 32.
43. Reddy Devarakonda, ibid, Page No.34 – 36.
44. हा शिलालेख गदय व पदय स्वरूपात असून प्राचीन कन्नड साहित्याची माहिती उपलब्ध होते.

नागवर्म व माधव यांचे शौर्य वर्णन विस्ताराने आलेले आहे. यांनी चालुक्यांचा राज्याचा विस्तार उत्तर भारतात केलेला होता. या पराक्रमी सेनापतींनी तडखेल येथील कालामुखी आचार्य वागेश्वर पंडितांनी केलेले विद्याज्ञानाचे कार्य पाहून त्यांना मोठे दानधर्म दिल्याचा उल्लेख प्रस्तुत शिलालेखात आलेला आहे.[45] याच जिल्ह्यातील भंडारकवठे या गावातील इ.स. 1069 चा आमिगीदेव कालीन शिलालेखात अणदुर 3000 या प्रांताचा उल्लेख येतो. या प्रांतातील भंडारगवटीगी (आधुनिक भंडारकवठे) येथील ग्रामप्रमुख मुदगौंड याच्या सांगण्यावरून सर्व गावकऱ्यांनी गावातील कालामुखी मठातील आचार्य ब्रह्मराशी पंडित याला दान दिले.[46] बागलकोट जिल्हयातील 'बेळगी' या तालुक्यांच्या गावी इ.स. 1075 सालच्या भुवनोकमल्ल चालुक्याच्या शासनकाळातील शिलालेखात कालामुखींची दुसरी उपशाखा ''कालामुखी यती पर्वतवळीय'' चा उल्लेख येतो. या शाखेतील भुवनशक्ती पंडित देवाचे शिष्य तत्पुरूष पंडित देव जे विद्यादानासाठी प्रसिद्ध होते. त्यांना या कार्यासाठी 'किसुकाडू' 70 या प्रांतातील 'बादूबेय' हे गाव दान म्हणून दिले होते. 'बेळगी' हे गाव चालुक्य कालखंडातील विद्यादानाचे प्रसिद्ध स्थळ होते. येथे विद्यादान करणारे व विद्यादान घेणारे उपाध्याय एक मत्तर बागायत जमीन व विद्यार्थ्यांना 16 मत्तर जमिन व तेथील पाहरेकरी व सेवकांना 30 मत्तर भूमी दानाच्या स्वरूपात दिल्याचा उल्लेख प्रस्तुत शिलालेखात आलेला आहे.[47]नांदेड जिल्ह्यातील करडखेल येथील शिलालेख महामंडलेश्वर कक्करस याच्या कालखंडातील इ.स. 1078 सालचा आहे. यात पाशुपत शाखा म्हणून कालामुखींचा उल्लेख आलेला आहे. या गावातील पाशुपत कालामुखींच्या मठाचा प्रमुख आचार्य चंद्रशेखर पंडित याला आवरवाडी, (आधुनिक औराद, जि.बिदर, कर्नाटक), कावळगांव, आलूर, सक्करगा, भाईगाव येथील उत्पन्न दान म्हणून दिलेले आहे.[48] बिदर जिल्हयातील (कर्नाटक राज्य) 'मौरखंडी' येथील इ.स. 1079 च्या चालुक्य राजा 'त्रिभुवन' मल्लच्या कार्यकिर्दीमधील कोरीव लेखात रावीशेट्टी नावाच्या व्यापाऱ्याने त्याच्याकडे

---

45. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Kannada Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2001, Page No.107
46. Upadhya G.N., ibid, Page No.250- 251
47. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.57 – 60.
48. Upadhya G.N., op.cit., Page No.92 - 93.

असलेली संपूर्ण स्थावर मालमत्ता व त्याला मिळणारे (व्याजाच्या माध्यमातून) संपूर्ण उत्पन्न कालामुखी आचार्य 'गंगराशी पंडित देव' याला दिल्याचा उल्लेख प्रस्तुत कोरीव लेखात येतो.[49] दक्षिण सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण भागातील तीर्थ येथील इ.स. 1082 अथवा 1108 च्या रामलिंगेश्वर मंदिरातील शिलालेखानुसार चालुक्य शासक विक्रमादित्य सहाव्याचा सांमत विजयादित्य याची राणी पद्मलदेवी व मुलगा (नावाचा उल्लेख कोरीव लेखात नाही) प्रस्तुत गावातील पाशुपत कालामुखी आचार्य आनंदशक्ती पंडित याला दान दिल्याचा उल्लेख येतो.[50]

उत्तर कर्नाटकातील कोप्पल जिल्हयातही कालामुखींची काही स्थळे दिसून येतात. त्यानुसार 'कल्लूर' येथील चालुक्य शासक विक्रमादित्याच्या कालखंडातील इ.स. 1098 च्या शिलालेखात कालामुखी कलीदेव मठाच्या जीर्णाध्दारासाठी व 'बन्नतुर' गावच्या शिवारातील दक्षिणेकडील 50 मत्तर भूमी व येरबगी गावच्या दक्षिणेकडील 50 मत्तर भूमी व इतर 20 मत्तर भूमी अशी 10 मत्तर भूमी, नंदादिपासाठी एक तेलाचा घाणा कालामुखी येती.[51] शिवशक्ती पंडिताच्या सान्निध्यात दिल्याचा उल्लेख प्रस्तुत शिलालेखात आलेला आहे.[52] याच गावात एकूण नऊ शिलालेख चालुक्य समकालीन असून त्यातील वरील शिलालेखांशिवाय इ.स. 1102 सालच्या शिलालेखात महासांमत ठक्करसन याने विद्यादानासाठी प्रसिध्द असलेल्या कालामुखी शैव आचार्य चंद्रशेखर पंडित देव याला दान दिल्याचा उल्लेख येतो.[53] येथील दुसऱ्या एका शिलालेखात चालुक्यांचे सांमत वन्हीकुल वंशातील कर्केरस राजाने कालामुखी पंडित चंद्रशेखर पंडित व त्याचा सहाय्यक आचार्य ज्ञानेश्वर व योगेश्वर यांना दान दिलेले शिलालेखात दिसते.[54] चालुक्य कालखंडात करडखेल 2000 ही करडखेल प्रांताची राजधानी असून येथील सांमत येरेयमरस वन्हीकुल

---

49. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – VIII, Bidar District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.77 – 78
50. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Kannada Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2001, Page No. 243-248
51. कालामुखी आचार्यांना काही शिलालेखात ''यती'' असा शब्दप्रयोग केलेला आढळतो.
52. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – III, Koppal, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 1999, Page No. 174 – 177
53. Upadhya G.N., op.cit, Page No.94
54. Upadhya G.N., lbid, Page No.96 - 97.

राजवंशातील होता. याने आवरवाडी 700, लघुप्रांतातील आलुर, गौंडगाव, कावळगाव, दैसवळगी, दुक्कावे, बोरीगावे (आधुनिक बोरगांव) नेरूलगे, हिप्पळगावे (आधुनिक हिप्पळगा) सक्करगा 90 (आधुनिक सखरगा) येथील मिळणारे उत्पन्न वरील कालामुखी आचार्यांनी केलेले शैक्षणिक कार्य पाहून त्यांना दान दिलेले आढळते.[55]

आधुनिक नांदेड जिल्हयाचा दक्षिण पूर्व भाग कालामुखींच्या धार्मिक प्रभावाखाली होता. सगरोळी येथील इ.स. 1110 च्या शिलालेखानुसार 'येकप्पा नायक' नावाच्या स्थानिक प्रशासकाने कालामुखी आचार्य 'ब्रह्मराशी पंडित' याला दान दिल्याचा उल्लेख येतो.[56] याच प्रमाणे 'सकनुर' येथील चालुक्य शासक विक्रमादित्याचा सामंत आचरस याने कालामुखी देवराशी पंडित याला भूदान दिल्याचा उल्लेख येतो. (इ.स. 1113)[57] इ.स. 1115 च्या या गावातील शिलालेखात बोधन 700 प्रांतातील कंपन्न 24 मध्ये सवरळी (आधुनिक सगरोळी) येथील कालामुखी मठाचार्य बम्मराशी पंडित याला वन्हीकुल वंशातील 'बल्लरस' या सांमताने दान दिल्याचा उल्लेख येतो.[58] कल्याणी चालुक्य कालखंडात करडखेल (जि. नांदेड) हे कालामुखींचे मोठे केंद्र होते. येथील उपलब्ध 7 शिलालेखापैकी 5 शिलालेखात कालामुखी आचार्यांचा उल्लेख येतो. येथील इ.स. 1130 च्या शिलालेखात पुन्हा ज्ञानेश्वर पंडिताचा उल्लेख येतो.[59]

यावरून हे स्पष्ट होते की, या कालखंडातील अनेक दानशुरांनी कालामुखी आचार्यांना संपत्तीचा त्याग मोठया प्रमाणात केलेला होता. या जिल्ह्यातील 'हालसी' (तुगाव) येथील चालुक्य राजा भूवलोकमल्लच्या कारकिर्दीतील इ.स. 1137 च्या शिलालेखानुसार उत्तरेश्वर देवालयाचे आचार्य 'विमळादित्य पंडित' याला महामंडलेश्वर 'हेमाडीरस' (हेमाद्रीरस) याने दिवाबत्तीच्या सोईसाठी एक तेलघाणा व आठ मत्तर जमिन

---

55. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Kannada Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2001, Page No.100-102.
56. Upadhya G.N., ibid, Page No.124 - 125
57. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – III, Koppal, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 1999, Page No. 182 – 183
58. Upadhya G.N., op.cit, Page No.127 - 128.
59. Upadhya G.N., lbid, Page No.103

एक मत्तर फुलाची बाग दान दिल्याचा उल्लेख प्रस्तुत शिलालेखात येतो.[60] सोलापूर जिल्ह्यातील इ.स. 1171 च्या 'शिवणी' शिलालेखात चालुक्यांचे सामंत कलचुरी राजा 'सोवीदेव' व त्याची राणी 'हारलादेवी' यांचा उल्लेख येतो. याचा प्रधान सोयीदेवरसाने तैलार –40 मधील 'शिवणगी' (आधुनिक शिवणी) येथील 'कालामुखी मठाचार रूद्रशक्तीपंडित' यांना दान दिल्याचा उल्लेख प्रस्तुत शिलालेखात आलेला आहे.[61] कालामुखी आचार्य तंत्र–मंत्रात प्रविण होते. मुळात हा शैव संप्रदाय तांत्रिक स्वरूपाचा होता. कोप्पल जिल्हयातील कुक्कनूर येथील इ.स. 1178 च्या शिलालेखानुसार चालुक्यांचा महामंडलेश्वर सिधंवंशीय 'पेर्मोडील' व त्याचा अधिकारी 'चाऊंडेश्वर' यांनी कालामुखी मठातील काळेश्वर जो यती परंपरेतील होता हा आचार्य अनेक सिद्धांत व शास्त्रांमध्ये परिपूर्ण असा होता तो मंत्र–तंत्र विद्येत श्रेष्ठ होता. तो काळीकाजेष्ठेचाही उपासक असल्याचा उल्लेख प्रस्तुत शिलालेखात आलेला आहे.[62]

## कालामुखीची साधना पद्धत व तत्त्वज्ञान

कालामुखी संप्रदायावर पाशुपत मतांचा प्रभाव असल्यामुळे हा संप्रदाय योगी संप्रदाय म्हणून ओळखला जातो. पाशुपत, कापालिकासारख्या साधना पध्दतीचा कालामुखींनी काही प्रमाणात स्वीकार केलेला दिसतो. नामस्मरण, यज्ञ, जप, ध्यान, समाधी या साधना पध्दतीचा वापर कालामुखींनी केल्याचे इ.स. 1094 च्या बेळगांव येथील केदारेश्वर मंदिराच्या शिलालेखावरून स्पष्ट होते.[63] काश्मिरी शैव पंथाचाही कालामुखींवर प्रभाव पडलेला होता. त्यामुळेही काश्मिरी साधना पद्धतीचा व तत्त्वज्ञान स्वीकार कालामुखींनी केलेला आहे.[64] कालामुखींनी आपल्या तत्त्वज्ञानात कार्यकारण योग, विद्या

---

60. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – VIII, Bidar District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.106 – 107
61. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Kannada Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2001, Page No.220 - 221
62. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – III, Koppal, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 1999, Page No. 228 – 235
63. Lorenzen David N., The Kapalikas and Kalamukhas, First Published, University of California Press, Berkeley and Los Angeles 1972, Page No. 112
64. Lorenzen David N., ibid, Page No. 105

आणि दुःखांत यांचा स्वीकार केलेला आहे. तत्कालीन पाशुपत, कापालिक व काश्मिरी शैव, संप्रदायाच्या प्रभावातून निर्माण झालेले कालामुखींचे तत्त्वज्ञान दिसते. आधुनिक विद्वानांच्या मते हा संप्रदाय एका अर्थी वीरशैव मताचे पूर्वरूप असलेले दिसते. कालामुखांची सर्व प्रमुख देवालये व मठ आज वीरशैवांची पुण्यक्षेत्रे असून ती त्यांच्या ताब्यात आहेत. एस.सी. नंदीमठानी 'ए हॅंडबुक ऑफ वीरशैवझम' पृष्ठ 09 वर हुली येथील कालानुभव मठ आता वीरशैवांचा महत्त्वाचा मठ बनला असून इतरही कालामुख मठ व मंदीरे सावकाशपणे कुणाच्याही लक्षात न येता वीरशैव बनले.[65] या कालामुख पाशुपतांच्या आचार्यांच्या कार्याचा परिपाक म्हणजे बसवेश्वर व इतर प्रारंभीचे वीरशैव यांच्या नेतृत्त्वाखाली झालेले शैवपंथाचे पुनर्स्थापना होय. कालामुख व वीरशैव या दोन पंथाचे समान विशेष म्हणजे लिंगपूजेवर भर व मठ संस्था बेलगांवे मठाचे कालामुख आचार्य केदार शक्ती हे केदारेश्वर मंदीर प्रमुख होते. त्यांनी जो कोणी भक्त एका लिंगाची स्थापना करील त्यास आगमास वर्णन केलेल्या फलापेक्षा कोटीपट फळ मिळेल असे म्हटल्याचे तेथील इ.स. 1164 च्या शिलालेखात नमुद केले आहे.[66]

## कालामुखींचे शैक्षणिक कार्य

इ.स. च्या 10 व्या शतकापासून ते तेराव्या शतकापर्यंत कालामुखी गुरूंनी आपल्या मठ, मंदीर संस्थांनामधून शैक्षणिक कार्य मोठया प्रमाणावर केलेले दिसून येते. त्याच्या या कार्यामुळे चालुक्य, कलचुरी व समकालीन इतर शासक प्रभावित होवून कालामुखींना मोठया प्रमाणात दान धर्म केल्याचे बहुतांश कालामुखी शिलालेखावरून स्पष्ट होते. कालामुखी गुरू योगाचे प्रवर्तक होते. हे बेळगांव जिल्ह्यातील गोलियहल्ली शिलालेखावरून स्पष्ट होते.[67] कालामुखी वैदिक धर्माचे अनुयायी असल्यामुळे ते वैदिक तत्त्वज्ञानाच्या अध्यापनाचे कार्य करीत. बेळगांव येथील केदारेश्वर (इ.स. 1094) येथील शिलालेखानुसार सिद्धांत, तर्कशास्त्र, व्याकरण, काव्य, नाटक, संगीत, साहित्य, इत्यादींचे

---

65. have been absorbed in to Virasaivism, Maysor Gazetteer, [II part,11,885]
66. दामोदरन के., भारतीय चिंतन परंपरा, प्रथम आवृत्ती, पिपुल्स पब्लिशिंग हाऊस (प्रा.), लि., नई दिल्ली, 1970, पृ.क्र. 245.
67.- Lorenzen David N., The Kapalikas and Kalamukhas, First Published, University of California Press, Berkeley and Los Angeles 1972, Page No. 152

शिक्षण कालामुखी गुरूकडून दिले जात असे. महाराष्ट्रातील गणेशपूर (जिल्हा लातूर), करडखेल (जिल्हा नांदेड) या शिलालेखांवरून ही कालामुखी गुरू हे योग अभ्यासासोबतच विविध कलेचे अध्यापन कार्य करीत असल्याचे स्पष्ट होते.[68]

कापालिकापेक्षा थोडासा मवाळ असणारा पंथ म्हणून कालामुखांकडे पाहिले जाते. जैन धर्मियांशी तोंड देवून त्यांनी आपला संप्रदाय दक्षिणेत वाढवला. इ.स. दहाव्या, अकराव्या, आणि बाराव्या शतकातील दक्षिणेतील राष्ट्रकुट, चालुक्य, यादव, शिलहार या राजवटींनी कालामुख गुरूंना आश्रय दिला. त्यांच्या दरबारी अनेक कालामुख आचार्य होते. बहुतेक कालामुख आचार्यांचे मठ त्या काळी अस्तित्त्वात होते. या मठाद्वारे ते वैदिक शिक्षणासोबतच, मंत्र, तंत्र, योग, विद्या, इतिहास, शास्त्र असे विषय शिकविले जात. या पंथाचे मुख्य केंद्र कदलीबन म्हणजेच 'श्रीशैल्य' हे होते. शिवाय उत्तर कर्नाटक, महाराष्ट्रातील कोल्हापूर, सोलापूर, सांगली, उस्मानाबाद, नांदेड या जिल्हयातील अनेक शिलांलेखामध्ये कालामुखांच्या आचार्याचा उल्लेख येतो. या आचार्यांच्या मठांना जमिनी दान दिल्याचे समजते. पुढे मात्र यांच्यावरही वीरशैवांचा प्रभाव पडला व कालामुख संप्रदायाचा अस्त होवून वीरशैवांचा उदय दक्षिणेत झाला.

## नाथसंप्रदाय

पूर्व मध्ययुगीन शैव संप्रदायातील सर्वात लोकप्रिय नाथ संप्रदायाकडे पाहिले जाते. भारतातील प्रत्येक प्रांतात आजही नाथ पंथीय अनुयायी दिसतात. उत्तर चालुक्य कालाखंडात इतर पंथाप्रमाणे नाथ पंथीयांची संख्याही अधिक प्रमाणात असावी. कारण नऊ नाथांपैकी बहुतेक सर्वच नाथ उत्तर चालुक्य समकालीन होते. बाराव्या शतकापर्यंत नाथ संप्रदायाचा विकास मोठया प्रमाणात झाला. तात्त्विक विचार प्रवाह, समाजात खोलवर रूजला. उत्तर चालुक्य व त्यांच्या मांडलिक राज्यांचा विचार करता 12 व्या शतकानंतर मात्र वीरशैव लिंगायताचा प्रभाव वाढलेला दिसतो. या दोन्हीही शैव पंथामध्ये पुढे वैचारिक समन्वय निर्माण झाले. अल्लमप्रभू, गोरखनाथ व बसवेश्वर यांच्यात समन्वय घडून आला.

दख्खन प्रदेशात (कुंतल देश) नाथ संप्रदायाशी संबंधित अनेक धार्मिक स्थळे आहेत. या स्थळांशी सर्वसामान्याचा नेहमीच संबंध आलेला आहे. यातूनच महाराष्ट्र,

---

68. Ritti Shrinivas & G.C. Shelke, Inscriptions from Nanded Distrit, Yashwant Mahavidyalaya, Nanded, 1968, Page No. 220

कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या आधुनिक राज्यात पूर्वमध्ययुगीन कालखंडापासून नाथ संप्रदाय रूजलेला दिसतो. या प्रदेशातील तांत्रिक, बौद्ध, जैन अशा अनेक पंथांचा प्रभाव नाथ संप्रदायावर होता. या पंथातील चांगले वाईट विचार व आचारांचा समावेश नाथ प्रवाहावर झाला. पुढे गोरख नाथासांरख्या धर्म व समाज सुधारकांनी सामाजिक व धार्मिक दोष बाजूला सारून गुणांची मुक्तपणे समाजात उधळण केले. गोरखनाथांचा या प्रदेशाशी प्रत्यक्ष संबंध आल्याचे पुरावे, आढळतात. तत्कालीन वीरशैव लिंगायत संप्रदायाचे महात्मा बसवेश्वर व त्यांचे इतर अनुयायांशी नाथ सिद्धांचा व गोरखनाथांचा संबंध येवून नाथांसह वीरशैवांवर त्यांचा प्रभाव निश्चित पडला असावा. या घटकांचा या व पुढील प्रकरणात विवेचन केले जाईल.

## नाथ पंथाची पार्श्वभूमी

नाथ पंथातील प्रमुख तत्त्वे ही प्राचीन काळापासून परंपरेने आले असावेत असे असले तरी त्यावर पूर्व मध्ययुगात अनेक संस्कार झालेले आहेत. त्यामुळे आपणास नाथतत्त्व नवे वाटते. नाथ पंथाच्या स्वरूपाकडे पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, नाथपंथ बौद्ध धर्मातून रूपांतरीत झालेल्या सिद्धांचा एक घटक अथवा भाग आहे.[69]

नाथ पंथ 'बौद्ध वज्रयान पंथा'चे परिवर्तीत रूप मानले जाते. दुसऱ्या बाजूला नाथ पंथाने योग तत्त्वाचाही आधार घेतलेला आहे. यामुळे नाथांचा विचार प्रवाह काहींसा वेगळा जाणवतो. याकाळातील परिस्थिती पाहता बौद्ध पंथाचे पिछेहाट देशात होत असताना हिंदू शैव पंथाचा विकास मोठया जोमाने चालू होता. यातून नाथांकडे हटयोग चालून आले व शैवांची प्रमुख देवता आदिनाथ (शंकर) व त्याच्या तत्त्वातून नाथ प्रवाहाचा उदय झाल्याचे सांगितले जाते. प्राचीन काळापासून इतर विचारांप्रमाणे शैव विचार प्रवाह दीर्घकाळापर्यंत समाजात रूजला. त्याचाच परिणाम म्हणून नाथपंथीय तत्त्वज्ञानही समाजाने सहजतेने स्वीकारली. याविरूद्ध अनेक मतमतांतरे नाथ संप्रदायाच्या उदयासंबंधी असू शकतील.

---

69. अ – नाथ पंथ 84 सिद्धांनमधून निर्माण झाले. असे सामान्यतः मानले जाते.
आ – यात 84 सिद्ध आणि नाथ पंथ यांच्यातील संबंध हे महत्वपूर्ण होते. बौद्ध अनिश्वरवादी आहेत. नाथ पंथीयामध्ये बदल होवून तो ईश्वरवादी बनला असे असले तरी नाथपंथीय ओव्यांकडे बारकाईने पाहताच असे लक्षात येते की, बौद्धाचा शुन्यवाद आणि वज्रभाव यात दिसतो. (राहुल सांकृत्यायन, निबंधावली, पृ. 163)

ज्यात जातीय बंड आणि त्याची उमटलेली प्रतिक्रिया या घटकांना अधिक महत्त्व देवून जनआंदोलनाचे प्रतिक म्हणून भारतीय समाजात हा पंथ व विचार प्रवाह उदयास आला असावा. एवढे मात्र नक्की की, ऐतिहासिक दृष्टिकोनाशी संबंधीत अपुऱ्या साधनामुळे आपण नाथांच्या उदयासंबंधीच्या स्पष्ट निष्कर्षापर्यंत पोहोचू शकत नाही. नाथ पंथावर भारतीय विविध तात्त्विक प्रवाहांचा जसा प्रभाव काळानुरूप पडत गेला. त्याचप्रकारे परकीय, भारताबाहेरील इस्लाम सारख्या धर्माचाही प्रभाव काही प्रमाणात पडलेला जाणवतो.[70]

## 'नाथ' शब्दाचा अर्थ

नाथ संप्रदाय या शब्दातील 'नाथ' म्हणजे 'स्वामी' किंवा 'धनी'. हा धनी कोण? तर या चराचर सृष्टीचा निर्माता किंवा संप्रदायीकांच्या भाषेत सांगावयाचे तर 'शिव गोरखबानी' या गुरू गोरक्ष नाथांच्या मान्यता प्राप्त ग्रंथात प्रस्तुत शब्द 'ब्रह्म' किंवा 'परमतत्त्व'. या अर्थाने वापरला आहे. तर संस्कृत टीकाकार हाच शब्द 'सद्‌गुरू' या अर्थाने वापरतांना आढळतो. सारांश 'अध्यात्म मार्गातील श्रेष्ठ किंवा आदरणीय व्यक्ती' असा 'नाथ' या शब्दाचा सर्वांना समजेल असा अर्थ सांगता येईल. हा संप्रदाय अनादी ज्याला प्रारंभ नाही म्हणजे जो अनादी आहे असा हा नाथ पंथ; असाही एक अर्थ सांगितला जातो. सांप्रदायिक दृष्टया विचार करताना असे दिसते, की नाथ म्हणजे 'परब्रह्म', 'परमतत्त्व', 'सद्‌गुरू' अनेक सिद्‌ध पुरूषांनी पंथीय दीक्षेनंतर आवर्जुन 'नाथ' हे उपपद लावलेले दिसते. परब्रह्माची किंवा परमतत्त्वाची उपासना करणारा हा संप्रदाय सिद्‌ध पंथ, सिद्‌ध मार्ग, योग मार्ग, योग संप्रदाय, अवधुतपंथ, गोरखपंथ, कानफाटा संप्रदाय, गुरू मार्ग, अशा अनेक नांवांनी ओळखला जात असला तरी 'नाथसंप्रदाय' किंवा 'नाथपंथ' हेच या पंथाचे नाव सर्वमान्य झाले आहे.[71]

---

70. सोलंकी कोमलसिंह, नाथ पंथ और निर्गुण संत – काव्य, प्रथम संस्करण, विनोद पुस्तक मंदिर, आग्रा, 1966, पृ.क्र.54
71. जोशी प्र.न., नाथ संप्रदाय उदय व विस्तार, द्वितीय आवृत्ती, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, ऑगस्ट 2004, पृ.क्र.15–16

## 'नाथ' संज्ञेचा अथवा शब्दाचा प्रथमतः आलेला उल्लेख

ब्रह्मानंदाने 'हटयोगप्रदीपिका' या टीकेत नाथ संप्रदाय हीच संज्ञा वापरलेली आहे[72] गोरखसिध्दांतसंग्रहात 'नाथ मार्ग' अशी संज्ञा वापरली आहे. गोरक्षनाथ संप्रदाय अनेकदा केवळ 'नाथ' या नावाने ओळखला जातो. 'राजगुहयात' 'नाथ' शब्दाचे विवरण आलेले आहे.[73] शक्तीसंगमतंत्रातही 'नाथ' पदाचे आध्यात्मिक व्युत्पादन आलेले आहे.[74]

'नवनाथ भक्तीसार' या ग्रंथात 'नाथ' याच संज्ञेचा उपयोग केलेला आहे. गिरीधर स्वामीच्या 'समर्थप्रतापात', 'नाथपंथी बाळ्ळक' असे शब्द आले आहेत. स्वतः रामदासांनी 'दासबोधा'तील सभास्तवनात 'नाथपंथी'चा समावेश केला आहे. राजाराम प्रसाद यांच्या प्रसादींच्या 'भक्तमंजरीमाले'त 'नाथ संप्रदाई तयासी नमन' असे म्हटले आहे. त्र्यंबकरामाच्या 'बाळबोधात' ''येथूनि दृष्टी प्रकास । नाथ पंथ विचारू ।।'' आणि ''नाथ पंथीय सीध्दांती । तेथही दविली वित्पत्ति।।'' असा दोनदा याच नावाचा उल्लेख आहे. संत निळोबांनी 'नाथ संप्रदायाची थोरी । प्रकट केली ज्ञानेश्वरी ।।' या वाक्यात याच नावाचे स्पष्ट उपयोजन केले आहे. याशिवाय ज्ञानेश्वरांच्या 'आम्ही एक दीन' जाणा नाथपंथी' हा अभंग प्रसिध्दच आहे. या अगोदरच्या लीळाचरित्र आणि अन्य महानुभावीय आद्य ग्रंथात या शब्दाचा अनेकदा उपयोग झाला. 'नाथपंथ' आणि 'नाथपंथीय' हे शब्द लीळाचरित्रात कित्येक ठिकाणी आले आहेत. हरिबाचा सोंगोबास रचित 'अन्वयस्थळा'त ही 'नाथपंथ' ही संज्ञा वापरलेली आहे. ('अन्वयस्थळ' म.स. पत्रिका) 'ज्ञानेश्वरी'त सहाव्या आध्यायात योगरहस्याला 'नाथ संकेतीचा दस्यू' म्हटल्याचे सर्व परिचित आहे. यावरून नाथपंथ अथवा नाथसंप्रदाय या संज्ञेची प्राचिनता व सार्वत्रिकता सिद्‌ध होईल.[75] ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी नाथ या शब्दासोबतच 'संप्रदाय' असाही शब्द प्रथमतःच वापरलेला आहे. 12 व्या शतकापासून या नाथांचे रूप संप्रदायासारखे असावे.[76]

---

72. आदिनाथ : सर्वेषां नाथांना प्रथम : त तो नाथसंप्रदाय : प्रवृत्त इति. नाथ संप्रदायिनो वदन्ति।
 –हटयोग प्रदीपिका 1.5, पृ.क्र. 9
73. ना कारोड नादिरूपं थकार : स्थाप्यते सदा ।
 भुवनत्रयमे वैक : श्रीगोरक्ष नमोऽ स्तुते ।।
74. श्री मोक्षदान दक्षत्वात् नाथ ब्रह्मानुबोधनात् ।
 स्थगिताज्ञानविभवात्, श्रीनाथ इति गीतये ।।
75. ढेरे रा.चिं., नाथ संप्रदायाचा इतिहास, प्रथमावृत्ती, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, सप्टेंबर 2007, पृ.क्र. 25
76. ''ती ययाचि शास्त्राचेनि। संप्रदाचे पांघुरौनि। शास्त्रार्थ हा निकेनि । अनुष्ठी हो ।।
 येहवी अमृतमंथना । सारिखे होईल अर्जुना । जरी रिघसी अनुष्ठाना । संप्रदायेंवीण ।।

## नाथ संप्रदायाच्या उदयाचा विकास

नाथ संप्रदायासंबंधी अनेक घटना वादातीत आहेत, वेगवेगळया अभ्यासकांनी वेगवेगळी मते मांडलेली आहेत नाथ संप्रदायाचा उदय केंव्हा झाला? कुठे झाला? कसा झाला? या बद्धल स्पष्टपणे माहिती उपलब्ध होवू शकत नाही. नाथ संप्रदायासंबंधीचे पुरातत्त्वीय साधने फारच अल्प प्रमाणात आहेत. साहित्यिक साधने बरीचशी अविश्वसनीय वाटतात. कारण त्या कल्पित कथा मोठया प्रमाणात दिसतात अशा वेळी आपण सर्वसामान्य मतप्रवाह जाणून घेवू.

या संप्रदायाचा उगम आदिनाथापासून झाला याविषयी कोणतेच दुमत नाही. तसेच, या संप्रदायाच्या उगमाच्या अनादिसिद्ध घटनेविषयी ही वेगळे मत नाही. कोणताही संप्रदाय परंपरेने अनादिच असतो परंतु, संप्रदाय प्रवर्तक महापुरूषांच्या संप्रदाय–प्रवर्तन कार्याचा आणि त्याच्या काळाचा जेव्हा विचार येतो, तेव्हा शुद्ध ऐतिहासिक दृष्टिला आरंभ होतो. प्रथम या संप्रदायाच्या आगमनाविषयीचा अनादिसिद्ध आणि सर्व मान्य प्रसंग विचारात घेवू. संत ज्ञानेश्वरांनी या घटनेविषयी आपल्या गुरू परंपरा ज्ञानेश्वरीत नमूद केले आहे.[77]

त्यांच्या मते शंकरापासून पार्वती व मत्स्येंद्रनाथांना जो उपदेश मिळाला, तोच गोरक्षनाथांपासून गहिनीनाथाना व गहिनीनाथाकडून, निवृत्तीनाथाना व निवृत्तीनाथाकडून आपणास ''बोधाचा संवभारा'' किंवा ''नाथ संकेतीचा दंषु'' प्राप्त झाला, असे ज्ञानेश्वर

---

गाय धड जोडे गोमटी। ते तैचि पिवों ये किरीटी। जैं जाणिजे हातवटी। सांजवणीची।।
तैसा गुरू प्रसन्नू होये । शिष्य विद्या ही करि लाहे । परिते फळे संप्रदाये । उपासिलिया।।
म्हणौनि शास्त्री जो इये । उचितु संप्रदायों आहे । तो ऐक आता बहुवें । आदरेंसी ।।
(ज्ञानेश्वरी 18.1481–85)

77. ''क्षीर सिंधू परिसरी । शक्तीचा कर्णकुहरी। तेथे कैश्री त्रिपुरारी। सांघितले जें।।
ते क्षीरकल्लोळाआंतु । मकरोदरी गुपितू। होता त्याचा हातु। पैठे जालें ।।
तो मछंप्रसव सृंगी। भग्नावयव चौरंगी। भेटला तो सर्वांगी। संपूर्ण जाला।।
मग समाधि अव्यया इया। भोगाची वासना इया। ते मुद्रा श्रीगोरखराया। दिधली मीनी।।
तेणे योगाविजनी सरोवरू। विषयविध्वं कवीरू । तिचे पदरी कां सर्वेश्वरू। अभिषेकिला।।
मग ते हि ते षांभवा। अद्वयामंद वैभव। संपादिले सब्रभाव। श्रीगयणीनाथी ।।
तेणे कालिकालितभूतां । आला देखौनी निरूता। आज्ञा श्री निवृत्तीनाथा । दीधली ऐसी।।
बोधाचा हा संवसार। आला आमते ।।'' (**ज्ञा.अ.18, 1730 –1737**)

सांगतात तेंव्हा ही परंपरा आदिनाथ शिव–पार्वतीपासून मत्स्येंद्रनाथांद्वारे पुढे चालत आल्याचे सर्वांना मान्य आहे. नवनाथांपैकी जालंधर आणि नागार्जून यांनाही आदिनाथांपासूनच उपदेश झाल्याचे सांगतात,

मत्स्येंद्रनाथ हे शाक्त तंत्राचीच एक शाखा असलेल्या कौलमताचे अनुयायी, तेंव्हा नाथ संप्रदाय प्रवर्तनाचा प्रश्न त्यांच्या बाबतीत उपस्थित होत नाही त्यांचे शिष्य गोरक्षनाथ यांना मात्र मध्ययुगीन सर्व साधनामार्गांत नाथ संप्रदायाचे प्रवर्तक म्हणून गौरविलेले आढळते त्यांनी अखिल भारतीय पातळींवर सर्व सिद्धांना संघटीत केले आणि योगमार्गाचा स्वीकार करून एका नविन परंपरेची प्रस्थापना केली ती करीत असताना त्यांनी सर्वप्रथम श्रीशैल्य पर्वतावर योगिणींच्या मेळाव्यात सापडलेल्या आपल्या गुरूंचे मन वळवून त्यांना पुन्हा शुध्द योगमार्गात आणले. हाच या नाथ संप्रदायाचा आरंभबिंदू किंवा उगम म्हणता येईल.[78]

## नाथ संप्रदायाचे उदयस्थळ

भारतातील सर्वच प्रांतात नाथतत्त्वाचा प्रसार झालेला असल्यामुळे परंपराभिमाने व स्वदेशाभिमाने साधक आणि विचारवंतानी आपआपली भूमी हीच या संप्रदायाची जन्मभूमी म्हणून सांगताना आढळतात. त्यानुसार पंजाब, काश्मिर, नेपाळ, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, आसाम या विविध ठिकांणी या संप्रदायाची उदयभूमी मानली जाते. तथापि, श्रीशैल्य पर्वतावर आणि त्याच्या परिसरात (कदलीबन) शैव, बौद्ध, शाक्त आदींच्या मध्य–मांस–स्त्रिप्रधान तंत्रसाधनांचा प्रकर्ष झालेला होता. श्रीशैल्य पर्वतावरील स्त्री राज्यातील योगिनींच्या मेळाव्यात मत्स्येंद्रनाथ याच साधनेच्या जाळयात आडकून पडले होते. तेथील सिद्धांना संयमाचे, अंतःशुध्दीचे, साधनचितेचे आणि शुद्ध योगमार्गाचे महत्त्व पटवून संघटीत करणे आवश्यक होते. गोरक्षनाथांनी सर्वप्रथम हेच कार्य हाती घेतले आणि नंतर या कार्याचा सर्व भारतभर प्रचार आणि प्रसार केला हे ध्यानात घेवून डॉ.रा.चिं. ढेरे यांनी श्रीशैल पर्वत आणि स्त्रीराज्यात असलेले कदलीबन हे एकच स्थान असल्याचे सिद्ध करून दक्षिणेतील श्रीशैल पर्वत ही नाथ संप्रदायाची उदयभूमी म्हणून साधार सिद्ध केले

---

78. गोसावी र.रा., पांचभक्ती संप्रदाय, द्वितीय सुधारीत आवृत्ती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, जानेवारी 1998, पृ.क्र.8

आहे. ते योग्य वाटते.[79] तात्पर्य, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, आसाम, नेपाळ इत्यादी ठिकाणची नाथसांप्रदायिक विविध केंद्रे ही त्यांच्या विस्ताराची प्रतिके आहेत असे असले तरी महाराष्ट्राबाहेरील संशोधक मोहनसिंग, ब्रिग्ज, हजारीप्रसाद द्विवेदी, कल्याणी मलिक इत्यादींना नाथपंथ हा उत्तेरेकडील असाच निष्कर्ष काढलेला आहे. परंतु सरदार ना.य. मिरीकरांचा संदर्भ देवून प्र.न. जोशी यांच्या मते महाराष्ट्रात नाथपंथीयांची अनेक ठिकाणे आहेत.[80] त्यांनी त्या संबंधिचे काही पूरावे दिलेली आहेत पण त्यांना आधार नाही. उत्तरेतील नाथांची हिंदीतील बृहत रचना पाहता उत्तर भारत नाथ संप्रदायाची जन्मभूमी मानने निराधार वाटते. त्याऐवजी डॉ. ढेरे यांचे मत दक्षिण भारत हेच नाथांचे उदयस्थान योग्य व तर्कसंगत वाटते.

## नाथांची उपास्य देवता

नाथ संप्रदाय हा शैव संप्रदाय असल्याने शिवोपासनेला त्यात सर्वोच्च स्थान प्राप्त होणारच. त्यांच्या परंपरेतच 'आदिनाथ' म्हणून शिवाला स्थान दिले आहे. शिवाबरोबरच त्याची भैरव, कालभैरव, एकलिंग इ. रूपे आली. शिवाची शक्ती म्हणजे पार्वती ही त्याची इच्छाशक्ती सृष्टीनिर्मिती करते म्हणून तिची अंबा, जगदंबा, दुर्गा, त्रिपुरा इत्यादी रूपेही नाथांना पुज्य आहेत. नाथसंप्रदाय हा अवधुत मत म्हणूनही ओळखला जातो. दत्तात्रेय हा अवधुत या दत्तात्रेयानेच 'अवधूतगीता' गोरक्षांना सांगितली. म्हणून या संप्रदायात दत्तात्रयाला गुरू संस्थेचा आद्य म्हणून पुज्यस्थान प्राप्त झाले आहे. त्याच बरोबर संप्रदाय प्रवर्तक गोरक्षनाथ आणि त्यांचे गुरू मच्छेंद्रनाथ यांचेही मंदिरे उभारली जाऊन त्यांनाही उपासनामार्गात श्रेष्ठस्थान शिवावतार स्वरूपात प्राप्त होणे स्वाभाविक होते. 'नवनाथांना' तर संप्रदायात अनन्य साधारण स्थान आहे. एकूण गुरूसंस्थेचा श्रेष्ठ आदर्श आदीनाथापासून पुढील नाथ सिद्धांच्या परंपरेतून सिद्ध होवून तो पुज्यता पावलेला दिसतो.[81]

---

79. ढेरे रा.चीं., ''श्री.गुरू गोरखनाथ, चरित्र आणि परंपरा'', प्रथमावृत्ती, पद्यगंधा प्रकाशन, पुणे, 1959, पृ.क्र. 22 ते 28
80. उदा. नगर जिल्हयातील वृद्धेश्वर अथवा म्हातार देवाचा डोंगर हेच आदीनाथाचे स्थान व तेथून नाथ पंथाचा उदय झाला. मढीचा मायंबा व कान्होबा म्हणजे मत्सेद्रनाथ व गोरखनाथ असावेत.
81. गोसावी र.रा., पाच भक्तीसंप्रदाय, द्वितीय सुधारीत आवृत्ती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, जाने. 1998, पृ.क्र.16

## प्रमुख नाथ सिद्ध आणि त्यांचा परिचय

शैव असणाऱ्या नाथपंथाचे प्रवर्तक संख्येने जास्त आहे. सामान्यतः नऊ नाथ प्रवर्तकांपासून नाथ संप्रदायाचा उदय व विकास झाल्याचे सांगितले जाते. विविध कालखंडात वेगवेगळे नाथ प्रवर्तक जन्माला आले. पुढे त्यांनी भारतीय समाजात नाथ पंथाचा प्रसार केला. विविध नाथ संप्रदायी ग्रंथामध्ये नऊ नाथांची वेगवेगळी नावे दिसतात. काही ग्रंथामध्ये तर विविध शैव सिध्दांचा समावेश नाथांमध्ये केलेला दिसतो. नाथपंथाशी संबंधित प्राथमिक साधनांच्या अभावामुळे व भारतीय समाजात नाथ संप्रदायाशी संबंधित कल्पित कथांमुळे स्पष्ट व निश्चित अशी माहिती नाथ प्रवर्तकाबद्दल मिळू शकत नाही. असे असले तरी आधुनिक कालखंडात ब्रिज, कल्याणी मलिक, हजारी प्रसाद द्विवेदी, रा.चिं.ढेरे, प्र.न.जोशी या सारख्या विद्वानांनी नाथ साहित्य संकलित करून त्यांचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. नाथ साहित्य संपूर्ण भारतातील प्राचीन नाथ पंथीय आखाडे व मठामधून दिसून येते. या सर्वांचा उपयोग साधन म्हणून करण्यात आलेला आहे. यातील बरेच ग्रंथ मध्य युगातील आहेत. नवनाथांपैकी बहुतांश नाथांनी, साहित्य रचना केल्याचे मानले जाते. पण शास्त्राच्या कसोटीपुढे ते टिकू शकत नाही. कदाचित त्यांच्या नावावरती ती नंतरच्या काळात निर्माण झालेली असावीत. अशा साधनांच्या इतर धर्म पंथातील ऐतिहासिक साधने अल्प प्रमाणातील भौतिक साधनांद्वारे नाथ संप्रदायातील प्रवर्तकासंबंधीची थोडक्यात माहिती आपण पुढील प्रमाणे घेऊ.

### मच्छिंद्रनाथ

नऊ नाथांपैकी पहिले व महत्त्वपूर्ण नाथ म्हणून मच्छेंद्रनाथाकडे पाहिले जाते. एका मतप्रवाहानुसार मच्छेंद्रनाथांनी नाथ संप्रदायाची स्थापना केली. दुसऱ्या एका विचारानुसार नाथ संप्रदायाचे मानवी संस्थापक मत्स्येंद्रनाथ नसून 'सरहपाद' आहेत.[82] हा सरहपाद

82. करमळकर विनायक, 'श्रीसरहपाद' आणि त्यांचे तत्त्वज्ञान, प्रथमावृत्ती, सहयाद्री प्रकाशन, पुणे,

मूळचा वज्रयानी परंपरेतील. त्याची परंपरा पुढील प्रमाणे सांगितली जाते. सरह– शबर– लुईपा– दारिक– घंटापा– जालंधर– कानिफा– मत्स्येन्द्र / मच्छेंद– गोरक्ष व चौरंगी. खरे सांगायचे म्हणजे नाथ संप्रदायात अनेक परंपरामधील सिद्‌ध येऊन सामील झाले. त्यांनी आपापली पूर्व परंपरा नाथ संप्रदायाशी समन्वीत केले. म्हणून नाथ संप्रदायाच्या परंपरेत, तसेच त्यांचा संस्थापक कोण? या विषयात अनेक प्रवाद निर्माण झाले. आणखी उदाहरणच द्यावयाचे झाले, तर नाथपंथातील जालंदरनाथांनाही एका परंपरेनुसार आदिनाथ मानण्यात आले आहे. नाथ पंथात मत्स्येंद्र व जालंधर यांच्या दोन शाखा होत्या. मत्स्येंद्र हे 'शैव कौल' तर जालंधर हे 'शैव कापालिक' होते; व पुढे लवकरच या दोन शाखा एकत्रित होऊन शक्तीयुक्त आदिनाथालाच गुरूस्थानी मानणारा नवनाथांचा 'नाथ संप्रदाय' निर्माण झाला.

नाथ संप्रदायातील आद्य प्रवर्तक मच्छिंद्रनाथ या सिध्दाला मच्छिंदर, मच्छंदर, मछिंदर, मच्छप्रपाद, मछेन्द्रपाद, मीनपाद, मीननाथ मत्स्येद्रनाथ अशा विविध नावांनी ओळखले जाते. स्कंद नारद, शंकर दिग्विजय, नवनाथभक्तिसार, नाथलीलामृत, भक्तिविजय, सिध्दचरित्र इत्यादी विविध संस्कृत व प्राकृत ग्रंथातून मत्सेद्रनाथांच्या कथा देतात. काही संदर्भावरून ते भृगुवंशीय ब्राह्मण असावेत, तर मच्छप्रपाद या नावावरून ते कैवर्तक म्हणजे कोळी कुळातील असावेत असे वाटते. पूर्वमध्ययुगात यांनी तत्कालीन सामाजिक व धार्मिक परिस्थितीविरोधात बंड केले. आदिनाथ शिव हा यांचा गुरू व त्यांचा शिष्य गोरक्षनाथ असे नाते मात्र सर्वत्र दिसते.[83]

## मत्स्येंद्रनाथांचा उदय

ब्रह्मानंदाने आपल्या हटयोगप्रदीपिकेवरील टीकेत मत्स्येंद्रनाथाच्या प्रादूर्भावासंबंधी जी कथा दिली आहे. तीच थोडयाफार फरकाने सर्वत्र आढळते.[84] नरहरवंशी मालू चरित्र

---

जुलै 1965 प्र. क.

83. आदिनाथो गुरूर्यस्य गोरक्षस्य च यो गुरूः। मत्स्येंद्र तमहं वन्दे महासिद्‌ध जगद्‌गुरूम्।।

84. अत्रैवं किंवद न्तीकदाचिदादिनाथः कस्मिंश्चिद्द्वीपे स्थितः तत्र विजनमिती म त्वा गिरिजायौ योगमुपदिष्टवान्। तीरसमीपनीरस्थः कश्चन मत्स्यः तं योगोपदेशं श्रुत्वा एकाग्रचित्तो निश्चलकायोऽवतस्थे। तं तादृशं दृष्ट्रवा ऽनेन योगः श्रुत इति तं मत्वा कृपालूरादिनाथे जलेन प्रोक्षीतवान् । सच प्रोक्षणमात्राद्दिव्यकायो मत्स्येंद्रः सिद्‌धोऽभुत। तमेव मत्स्येंद्रनाथ इति वदन्ति।। **(हटयोगप्रदीपिका, 1.5, पृ.क्र. 9)**

नवनाथ भक्तीकथासार ग्रंथातही अशीच कथा दिसते. वासुदेवाचे वीर्य यमुनेत पडते त्याचा एक थेंब मासीकडून प्राशीले जाते. याच वेळी शंकर आणि पार्वती त्या एकांत ठिकाणी येतात. शंकर पार्वतीला तीच्या इच्छेनुसार त्यांच्याकडे असणारे सर्व ज्ञान सांगावयास सुरूवात करतात हे ज्ञान ऐकत असतानांच पार्वतीस झोप लागते. तीथेच या माशांचेही वास्तव असते. या माशाच्या पोटातील मच्छिंद्रनाथ शंकराकडून पार्वतीला सांगितले जाणारे ज्ञान ऐकत असतो; व शंकराच्या सांगण्याला तो प्रतिसाद देत असतो. अशा प्रकारे मासीच्या पोटात असतानांच मच्छिंद्रनाथाला आदिनाथ शंकराकडून सर्व ज्ञानाची प्राप्ती झाली. पुढे हा मासा अंडी देतो आणि त्यातून मत्स्येंद्रनाथाचा जन्म होतो. पुढे कोळी वंशातील एका व्यक्तीकडून मत्स्येंद्रनाथाचे पालनपोषण होते.[85] या प्रमाणे ज्ञानेश्वरांनीही ज्ञानेश्वरीच्या शेवटी आपले गुरू परंपरा सांगतांना मत्स्येंद्राच्या अवतारांच्या पारंपारिक कथेचा निर्देश केला आहे.[86] या कथेची विविध रूपांतरे 'गोरक्षविजय' व 'मीनचेतन' हे बंगाली ग्रंथ, 'बुध्दपुराण' हा नेपाळमधील ग्रंथ, योगी चंद्रनाथकृत 'योगीसंप्रदायाविश्कृती', जोधपूरच्या सरदार म्युझियमधील 'नाथ चरित्र' 'नाथ पुराण' 'मेघमाला' इत्यादी ग्रंथात आढळतात.

'कदलीमज्जुनाथ महात्म्यम्' या संस्कृत ग्रंथानुसार मत्स्येंद्रनाथ हा दक्षिणेतील तौलवी (तुलुभाशिक) देशाचा राजा होता आणि मंगला ही त्याची राजधानी होती. 'नाथलीलामृत' या मराठी ग्रंथात मच्छिंद्रनाथ हा मल्लाळ देशातील असल्याची कथा दिली आहे.[87] नाथ लिलामृत ग्रंथानुसार मच्छिंद्रनाथ मल्लाळ देशातील असून त्याचा जन्म 'मार्गशीर्श मास, शुध्द पक्ष गुरूवार श्रवण नक्षत्र, निशी मध्यान्ह' असा तपशील दिसतो.[88]

## मत्स्येंद्रनाथांचा जन्मकाळ

नाथसंप्रदायी साहित्य रसभरीत पौराणिक साहित्यात भरून निघालेले आहे. त्यामुळे उपलब्ध ऐतिहासिक साधनांचा आधार घेवून त्यांचा कालखंड ठरविण्याचा आपण प्रयत्न

---

85. नवनाथ भक्तीकथासार, अध्याय 1, ओवी क्र. 101 ते 105
86. क्षीर सिंधू परिसरी। शक्तीच्या कर्णकुहरीं। नेणों कै श्रीत्रिपुरारी। सांगितलें जें।। ते क्षीरकल्लोळाअंती। मकरोदरी गुप्त। होता तयाचा हात । पैठे जालें।। (ज्ञानेश्वरी, 18.1752.53)
87. ढेरे रा.चिं., नाथसंप्रदायाचा इतिहास, प्रथमावृत्ती, पद्यगंधा प्रकाशन, पुणे, 2007, पृ.क्र. 57
88. जोशी प्र.न., नाथ संप्रदाय, उदय व विस्तार, द्वितीय सुधारीत आवृत्ती, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, ऑगस्ट 2004, पृष्ठ क्र. 198

करू. त्यांच्या 'कौलज्ञान निर्णय' या ग्रंथावरून ते अकराव्या शतकाच्या पूर्वीचे नक्कीच ठरतात. अभिनव गुप्तांनी 'तंत्रलोक' मध्ये त्यांना नमन केले आहे. तंत्रलोकची रचना इ.स. 1015 ची आहे. यापूर्वी मत्स्येन्द्रनाथ झाले हे उघडच आहे. आधीचे एक शतक म्हणजे आरंभी ते अवतरले (जन्म झाला) असा संशोधकाचा निष्कर्ष आहे.[89] अशाच प्रकारचे अनुमान जेष्ठ संशोधिका कल्याणी मलिक यांचेही आहे.[90] तिबेटी परंपरेतील सिद्धांच्या आधाराने द्विवेदी व मोहनसिंग मत्स्येंद्रनाथांना नवव्या शतकातील मानतात.[91]

तिबेटच्या परंपरेत मीनपा राजा देवपालच्या काळात (इ.स. 809 ते इ.स. 849) होऊन गेल्यामुळे व मीनपा –मत्स्येंद्र एकरूप मानल्यामुळे हे मत सिद्ध झाले. 'प्रबंध चिंतामणी' नावाच्या ग्रंथानुसार दहाव्या शतकातील चालुक्य राजा मुलराज याच्याशी संबंध असणारा कंथडी नावाचा यागी सिद्ध होता. हा कंथडी म्हणजेच गोरक्षशिष्य कंथडीनाथ मानून द्विवेदी मत्स्येंद्रांना नवव्या शतकातील ठरवितात. शि.म. परांजपे यांनी माधवाचार्यांच्या 'शंकरद्विग्विजय' नावाच्या ग्रंथाच्या आधारे मत्स्येंद्र –गोरक्ष यांना शंकराचार्याच्या पूर्वीचे ठरविण्याचा प्रयत्न केला आहे.[92] मंडन मिश्राची स्त्री शारदा हिच्या शृंगारीक प्रश्नांना उत्तर देण्यासाठी शंकराचार्यांना अमरू राजाच्या मृत शरीरात प्रवेश करण्याचे ठरवितात. तेव्हा त्याच्या शिष्य पद्यपादाचार्य त्यांच्या कृत्याचा निषेध करून त्यांना मत्स्येंद्रनाथाच्या परकाया प्रवेशाची व त्यांच्या सुखभोगमग्नतेची माहिती सांगतो. 'मत्स्येंद्र–नामा ही पुरा महात्मा' या वचनानुसार मत्स्येंद्रनाथ सहाव्या –सातव्या शतकातील ठरतील.

वरील विविध विद्वानांची मते जाणून घेता हे लक्षात येते की, मत्स्येंद्रनाथाचा कार्यकाळ सातव्या शतकापासून ते अकराव्या शतकाच्या दरम्यानचा असावा. मत्स्येंद्र शिष्य गोरक्षनाथांचा कार्यकाळ जर 11 वे शतक असेल तर मत्स्येंद्राचा कार्यकाल ही 10 व्या शतकातील शेवटचा अथवा 11 व्या शतकाचा सुरूवातीलचा कालखंड असला पाहिजे. गुरूशिष्य हे समकालीन होते त्यांच्या वयात शंभर वर्षापेक्षा जास्त फरक संयुक्तीक वाटत नाही. म्हणजेच कल्याणचालुक्य राज्यकालखंड मत्स्येंद्राचा कालखंड असला पाहिजे.

---

89. बागची प्रबोधचंद्र, कौलज्ञाननिर्णय, प्रथमावृत्ती, एम.पी.जी. हाऊस लिमिटेड, कलकत्ता, 1934, पृ. क्र. 05
90. मलिक कल्याणी, सिद्ध सिद्धान्तपध्दती, प्रथमावृत्ती, पुना ओरिएंटल बुक हाऊस, 1954, पृ. क्र. 9–10
91. द्विवेदी हजारी प्रसाद, नाथ संप्रदाय, प्रथमावृत्ती, हिंदूस्थानी अकॅडमी, उत्तरप्रदेश, अलाहाबाद, 1950, पृ.क्र. 52–54
92. भारत इतिहास संशोधन मंडळ, तृतीय संमेलन वृत्त, पुणे, 1913, पृ.क्र. 164–166

## मत्स्येंद्रनाथांची विविध नाथग्रंथानुसार नावे

मत्स्येंद्रनाथांच्या स्थल कालाप्रमाणेच त्यांच्या नावांच्या बाबतीत निश्चित एकमत नाही. डॉ.बागची यांनी संपादिलेल्या मत्स्येंद्रकृत ग्रंथाच्या समाप्तिमुद्रांत 'मच्छघ्नपाद' (कौल ज्ञाननिर्णय, पटले 1–11, 14), 'मच्छेंद्रपाद' (कौ.ज्ञा.नि., प.13.15, 17), 'मत्स्येंद्रनाथपा (कौ. ज्ञा.नि., प.16, 22–24) 'मीननाथ' (अकुलवीरतंत्र I), मच्छेंद्रपाद (अकुलवीरतंत्र–ठ) 'मत्स्येंद्र' (कौलानंद) व 'मच्छिंद्रनाथपाद' (ज्ञानकारिका) अशी मत्स्येद्रंनाथाची नाम–रूपे आढळतात. नाथपंथीय हिंदी गीतातून व नाथ विषयक लोकगीतांमधून त्याला 'मछिंदर' अथवा 'मच्छिंद्रनाथ' या नावाने संबोधले आहे. या नाथांपैकी मत्सेंद्र आणि त्याची अपभ्रष्ट रूपे यांचा संबंध मत्स्येंद्रनाथाच्या अविर्भावकथेशी जुळतो. परंतु म.म. हरप्रसाद शास्त्री यांनी असे अनुमान केले आहे की, ''मत्स्येद्रनाथ हा मुलतः मासे पकडणाऱ्या कैवर्तक जातीतील असावा.'' कौलज्ञाननिर्णय या ग्रंथातही असाच उल्लेख आहे.[93]

काहींसे असेच स्पष्टीकरण आपणास काश्मिरी शैव परंपरेतील श्लोकात दिसते.[94] मूळात हा श्लोक अभिनव गुप्ताच्या 'तंत्रलोकातील' आहे. या 'आतानवितानवृत्यात्मक जाल छिन्न' करण्यामुळे 'मच्छन्द' हे नाव निर्माण झाल्याचे सूचित केले आहे. तंत्रलोकांचा टीकाकार जयद्रथ या श्लोकावर टीका करताना तो लिहितो –

'मच्छः पाशाः समाख्याताश्वपलाश्चित्तवृत्तयः।
छेदितास्तु यदा तेन मच्छन्दस्तेन कीर्तितः।।'

वीरशैव लिंगायत श्रीअल्लमप्रभू यांनी श्री गोरखनाथ यांचे संबंध चांगले होते ते दोघेही समकालीन होते. असे म्हणतात की, अल्लमप्रभू जीवनाच्या सुरूवातीस नाथ संप्रदायी होते. त्यांनी आपल्या गुरूचे नाव म्हणजे मत्स्येंद्रनाथाचे नाव अनिमिशदेव

93. ''–मत्स्याभिधातिनैर्विप्रा मत्स्यघ्नमेति विश्रुतः। कैवर्तकत्व कृतं यस्मात् कैवर्तो विप्रनायकः।। (कौलज्ञाननिर्णय, 1637)
94. ''रागारूण ग्रन्थि विलव कीर्णं यो जालामातनाविता नवृत्तिम्। कलोम्भितं बाहयपथे चकार स्थान्मेस मच्छन्दविभुः प्रसन्नः।। (कौलज्ञाननिर्णय, प्रस्तावना, पृ.22–24 सिद्ध सिद्धांत पद्धती, प्रस्तावना पृ.क्र. 14–16

(अनिमिश त्र मत्स्य) असे देतात. असे प्रा.द.रा.बेंद्रे यांनी महाराष्ट्र, साहित्य पत्रिकेच्या जाने. 1935 च्या आवृत्तीत सांगितले आहे.

## मत्स्येंद्रनाथांच्या चरित्र कार्याची वैशिष्टे

प्र.न.जोशी यांनी 'नाथ संप्रदाय उदय व विस्तार' या ग्रंथातून मत्स्येंद्रनाथाच्या चरित्र्याची वैशिष्टे नाथ संप्रदायाशी संबंधित साहित्यातून व कथांच्या आधारे पुढीलप्रमाणे मांडलेली आहेत. यावरून त्यांच्या संबंधिच्या कार्यासंबधिची माहिती उपलब्ध आहे.

1. मत्स्येंद्रनाथाच्या नावाच्या बाबतीत एक वाक्यता नाही. बागची यांनी संपादीत केलेल्या मत्स्येंद्रकृत ग्रंथातील समाप्तिमुद्रांत (कोलोफोन्स) मध्ये मच्छहनपाद (कौलज्ञाननिर्णय, पटले 1–11, 14) मच्छेंद्रपाद (कौलज्ञाननिर्णय, पटले 13, 15, 16), मत्स्येद्रपाद (कौलज्ञाननिर्णय, पटले 16, 24) मीनापाद (कौलज्ञाननिर्णय, पटले 19–21), मीननाथ (अकुलवीर तंत्र–अ), मच्छिद्रपाथ (अपुलवीर तंत्र–ब), मत्स्येंद्र (कौलानंद), मच्छिंद्रनाथपाद (ज्ञानकाटिका) अशी विविध रूपे नावाशी संबंधी आढळतात. मच्छिंदर, मच्छिंदरनाथ, मछिंदर, मछिंद्रनाथ इत्यादी नावे हिंदी–मराठी इत्यादी प्राकृत भाषांतून येतात. मीननाथ व मत्स्येंद्रनाथ या नावाच्या व्यक्ती दोन काय? असाही एक प्रश्न उपस्थित झाला आहे. तिबेटी परंपरेतील लुइपा आणि मत्स्येंद्र हे एकच की काय? 'हठयोग प्रदीपिके' वरील ब्रह्मानंदाच्या 'जोत्स्ना' टीकेत मत्स्येंद्रनाथ व मीननाथ एकच मानले आहेत. तिबेटी दंतकथेनुसार मीननाथ हा मत्स्येन्द्राचा पिता आहे. नेपाळी कथेनुसार तो त्याचा भाऊ आहे. तर मराठी प्रथेनुसार तो त्यांचा मुलगा, कधी मेननाथ या नावाने आहे. कौलज्ञान –निर्णयादी ग्रंथात मत्स्येंद्रनाथ –मीन एकच आहेत. ज्ञानेश्वरी मत्स्येंद्राचा 'मीन' या नावाने उल्लेख करतात. (ज्ञानेश्वरी 18.1755) 'कदली–मञजुनाथमाहात्म्या'तही मत्स्येंद्र–मीन एकच आहेत. अवलोकिश्वर म्हणजेच मत्स्येंद्रनाथ असे नेपाळी परंपरा मानते.

2) बहुतेक सर्व कथांतून मत्स्येंद्रनाथांस उपदेश प्रत्यक्ष शिवाकडून मिळाला. म्हणजे त्यांना मानवी गुरू नाही, असाच निष्कर्ष निघतो. शिवाचे पार्वतीस उपदेश कथन व मत्स्यरूपाने ते ग्रहण करणे, या घटनेस सर्वत्र प्राधान्य आहे. अनेक ठिकाणी मत्स्येंद्र शिवाचा अवतार, तर कधी तो विष्णूचा अवतार असा निर्देश आला आहे.

3) जालंधरनाथ हा मत्स्येंद्रनाथांचा समकालीन नाथसिद्ध होय.

4) मत्स्येन्द्रांचा एक प्रमुख शिष्य म्हणजे गोरक्षनाथ अथवा गोरखनाथ हा होय. जालंधरनाथ हे कानुपा व कृष्णपाद यांचे गुरू होते.

5) मत्स्येंद्रनाथ हे योगमार्गाचे प्रवर्तक खरे; पण संयोगवशात ते कुठल्या तरी (कादली बनातील .......?) एका तांत्रिक स्त्रीपरिवारात व राज्यात सापडले. आपली योग परंपरा विसरून ते एका राणीच्या सहवासात भोगविलासात रमले. गोरक्षनाथाने त्यांची सुटका केली. त्यांना मीननाथ, मेननाथ, धर्मनाथ अशा नावांचा एक पुत्र होता. कधी दोन पुत्रांचाही उल्लेख आहे. राणीची नावे मैनाकिनी, परिमळा, मंगला अशी विविध प्रकारची घेतात. मत्स्येंद्र हा राणीचा पती नसून योग मार्गातील गुरू असाही आग्रह काही ठिकाणी दिसतो.

6) विविध प्रकारच्या सिद्धी, चमत्कार, भस्मदान, परकायाप्रवेश विविध अस्त्राचा वापर इ. अलौकीक बाबींचा प्रारंभ याच मत्स्येंद्रनाथापासून झाला. वाममार्गी तांत्रिकांचा अथवा शाक्तांचाही प्रभाव त्यांच्यावर होता.[95] वरील प्रकारे प्र.न.जोशी यांनी विविध नाथ कथांचा आढावा घेऊन त्यांच्या कार्यावर संक्षिप्त प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला.

## मत्स्येंद्रनाथ –शाक्त कौल मत

इ.स. 10 व्या 11 व्या शतकात समाजात तांत्रिकतेचा प्रसार मोठया प्रमाणात झालेला होता. सर्वच धर्म पंथात तांत्रिकता मोठया प्रमाणात दिसून येते. श्री.मत्स्येंदनाथांनी चार तांत्रिक ग्रंथांची निर्मिती केल्याचे मानले जाते. या ग्रंथावरून त्यांच्यावरही तांत्रिकेतचा प्रभाव पडलेला दिसतो. त्यांनी कौल तांत्रिक मताचा पुरस्कार केलेला आहे. यावर बौद्ध धर्मातील वज्रयान व सहजयान, शैव तांत्रिक व शाक्त मताचा प्रवाह पडलेला होता. मत्स्येंदनाथांनी कौलज्ञान निर्णय, अकुलवीर तंत्र भाग–1 व भाग–2, कुलानंद और ज्ञानकारिका या चार तांत्रिक ग्रंथाची निर्मिती केली. हे चारही ग्रंथ नेपाळच्या दरबार हॉल ग्रंथालयात आहेत. यांचे संपादन डॉ. प्रबोधचंद्र बागचीं यांनी केलेले आहे.

'कौलज्ञान–निर्णय' हे ग्रंथ कौल मताच्या केलेल्या पुरस्काराचे संपूर्ण समर्थन करते व कुलाचाराचे महत्त्व स्पष्टपणे रेखाटते. आपल्या तत्त्वज्ञानात त्यांनी कौल मताचा पुरस्कार केलेला आहे. या कौल ज्ञानाचा विचार शिवनिर्मित आहे. या शिवनिर्मित ज्ञानाचे नाव

---

95. जोशी प्र.न., नाथ संप्रदाय, उदय व विस्तार, द्वितीय सुधारीत आवृत्ती, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, ऑगस्ट 2004, पृष्ठ क्र. 206–207

पहिल्या युगात 'कौलज्ञान' होते. दुसऱ्या युगात त्यास 'सिद्धकौल' म्हणत. तिसऱ्या युगात यास 'सिद्धामृत' म्हणू लागले; तर या चौथ्या युगात त्यास 'मत्स्योंदर ज्ञान' असे म्हणतात. असा समज नाथ अनुयायांमध्ये आहे.

कौल ज्ञानाच्या मार्गाला 'सिद्धज्ञान' या नावानेही ओळखले जाते. या पंथाला ब्रीजमंत्र आदिनाथाकडून मिळाला. या कौलमार्गात दोन मते आहेत. एकात 'द्वैतभाव' आहे तर दुसऱ्या 'सहजभाव' आहे. द्वैतभावात कुलाचार आहे. व सहजभावात साधक व शिव हे एक होवून जातात व मग त्यांच्यात दुसरी प्रकृती राहत नाही. यालाच 'शामरस्य सिद्धी' असे म्हटलेले आहे आणि कौलाचारी साधकांची ही अवस्था प्राप्त करून घेण्याकडे साधनेची घोडदौड असते. कौलमतात या द्वैतभावनेनेच सहजावस्थेत जाता येते व साधक मग अंतिम ध्येय प्राप्त करून घेवू शकतो.

योगीनी कौलमताचा मुख्य ग्रंथ ''कौलज्ञान निर्णय'' हा असून तो देव व भैरव यांच्या संवादात्मक आहे. यात सृष्टी, प्रलय, मानसलिंगाचे मानसोपचाराद्वारे पूजन, निग्रह–अनुग्रह, प्रतिमा जल्पन, घटपाषाणस्फोटन, इ. सिद्धी, भ्रांती–निरसन–ज्ञान, जीव–स्वरूप, जरा–मरण, केशपलिताचे निवारण, अकुलापासून कुलाचि उत्पत्ती, कुलाची पूजा पद्धती, गुरूपंक्ती, सिद्धपंक्ती, योगिनीपंक्ती, चक्रध्यान, अद्वैतपूजा, पात्रचर्या, न्यासविधी, शीघ्र–सिद्धी देणाऱ्या ध्यानमुद्रा, महाप्रलयाच्या वेळी भैरवाचे आत्मरक्षण, आत्मज्ञान, सिद्धपूजन, कुलदीपविज्ञान, देहातील चक्रस्थित देवी, कपाल–भेद, कौलमार्गाचा विस्तार, योगिनी–संचार, देहस्थ–सिद्धाची पूजा इ. विषय आलेले आहेत. ''कुलानंदतंत्रम्'' या भैरव देवीच्या संवादातून योगी क्रियांचे वर्णन आहे. 'ज्ञानकाटीका' या ग्रंथात मोक्षाधिकार, धर्माधर्म विचार, धर्मातीत अवस्था इत्यादीचे वर्णन आले आहे. ''योगविषय'' या एका मत्स्येंद्रविरचित प्रकरणात प्रारंभीच गुरूचे माहात्म्य विषद केले आहे. सामसिध्दी प्राप्त होण्यासाठी गुरू व शिष्य यांच्यातील भेद नाहीसा व्हायला हवा. अष्टचक्रांची स्थाने वर्णिली आहेत. व मग असे म्हटले आहे की, निरंजनपद हे चक्रातीत

आहे. इडा, पिंगला, सुषुम्ना, प्राणायाम, ओम्कार, त्रिकुट, त्रिहट, गोल्हाट, शिखर, कुंडलिनी, ''हंसः–सोऽहम्'' चा जप इ.चे संक्षेपाने वर्णन यात आहे.[96]

## गोरखनाथ / गोरक्षनाथ

नऊ नाथांपैकी सर्व सामान्यपणे सर्वाधिक लोकप्रिय नाथ प्रवर्तक म्हणून गोरखनाथाकडे पाहिले जाते. नाथ संप्रदायाचे आद्य प्रवर्तक मत्स्येंद्रनाथांचा सर्वात आवडता शिष्य गोरखनाथ, मत्स्येंद्रनाथ– गोरखनाथ या गुरू शिष्यांच्या जोडीचा उल्लेख अनेक नाथ संप्रदायिक ग्रंथांमधून आलेला आहे. या गुरूशिष्यासंबंधीच्या सरस कथा आजही समाजात आजही लोकप्रिय आहेत. वीरशैव लिंगायत धर्मसंप्रदायात ज्याप्रमाणे महात्मा बसवेश्वरांचे स्थान आहे. त्याचप्रमाणे नाथसंप्रदायात गोरखनाथाचे स्थान आहे. हे दोघेही समकालीन असून त्यांनी समाजातील अनिष्ठ प्रथांच्या विरोधात पूर्व मध्ययुगात प्रथमतःच आवाज उठविण्याचा प्रयत्न केला. या काळात कल्याणी चालुक्य राजसत्तेला ओहोटी लागली तर मंगळवेढयाच्या कलचुरी शासकानी (राजा बिज्जल) कल्याणी चालुक्यांची जागा घेतली. अशा प्रकारे बाराव्या शतकात राजकीय घडामोडीसोबतच धार्मिक व सामाजिक घडामोडी घडून येत असताना वीरशैव लिंगायत संप्रदायाचे महात्मा बसवेश्वर व नाथ संप्रदायाचे गोरखनाथ यांची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरली.

## गोरखनाथांची विविध नावे व नावांचा अर्थ

### गोरक्षनाथांचे जन्मस्थान व जन्मवर्ष

ठोस साधनाअभावी गोरक्षनाथांचा जन्मवर्ष कोणता आहे, स्पष्टपणे सांगता येत नाही. असे असले तरी विविध अभ्यासकांनी नाथ संप्रदायाचा अभ्यास करून आपाआपली मते मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपण प्रथम विविध विद्वानांची मते जाणून घेवू व त्यातील दोषांची चर्चा करू.

| | | |
|---|---|---|
| डॉ.शहीदुल्ला | : | आठवे शतक |
| डॉ.मोहनसिंग | : | आठवे किंवा नववे शतक |
| डॉ.बागची | : | नववे किंवा दहावे शतक |
| पंडित सांकृत्यायन | : | नववे शतक |

96. ढेरे रा.चिं.,, नाथ संप्रदायाचा इतिहास, प्रथमावृत्ती (सुधारीत), पद्मगंधा प्रकाशन, पुणे, सप्टेंबर 2007, पृ.क्र. 63

| | | |
|---|---|---|
| म.म.हरप्रसाद शास्त्री | : | नववे शतक |
| डॉ.द्विवेदी | : | दहावे, अकरावे शतक |
| डॉ.बडथ्वाल | : | अकरावे शतक |
| डॉ.फर्कुहर | : | बारावे शतक |
| प्रो.ब्रिग्ज | : | बारावे शतक |
| श्रीराम चंद्र शुक्ल | : | अकरावे ते तेरावे शतक |
| डॉ.मलिक | : | अकरावे शतक |
| डॉ.गोविंद त्रिगुनायत | : | बारावे शतक |
| डॉ.सुनितकुमार चटर्जी | : | बारावे शतक[97] |

## प्राचीन नाथ समकालीन ग्रंथाद्वारे आलेल्या गोरखनाथासंबंधिचा कालखंड

| | | |
|---|---|---|
| कौलज्ञान निर्णय | : | अकरावे शतक |
| ईश्वरप्रत्याभिज्ञा | : | अकरावे शतक |
| गोविंदचंद्रेर गान | : | बाराव्या शतकाचा सुरूवातीचा कालखंड |
| प्रबंध चिंतामणी | : | दहावे शतक |
| गोपीचंदेरगान | : | दहावे शतक |
| लीळाचरित्र | : | बारावे शतक |
| अभिनव गुप्तांचा तंत्रालोक | : | आकरावे शतक |
| कर्पूरमंजरी | : | नववे शतक |
| कंथडबोध | : | दहावे शतक |
| प्रभुलिंगलिला | : | बारावे शतक |

## गोरखनाथ व समकालीन राज्यकर्ते

| | | |
|---|---|---|
| उज्जेनीचा परमारभोज | – | इ.स. 1076–1126 |
| कल्याणी चालूक्य विक्रमादित्य सहावा | – | इ.स. 1076–1125 |

97. ढेरे रा.चिं., नाथ संप्रदायाचा इतिहास, प्रथमावृत्ती (सुधारीत), पद्यगंधा प्रकाशन, पुणे, सप्टेंबर 2007, पृ.क्र. 76

| | | |
|---|---|---|
| राजेंद्र चोल | – | इ.स. 1063–1112 |
| मुलराज चालुक्य | – | इ.स. 941–996 |
| चंबळचा राजा साहिल्लवर्मा | – | इ.स. 920 |
| चंद्रनगरचा राजा | – | इ.स. 1027 |

वरील विविध मते ही गोरखनाथांच्या जन्मवर्षासंबंधिची आहेत. साधारणतः इ.स.च्या 9 व्या शतकापासून ते 12 व्या शतकापर्यंतच्या दरम्यान कोणत्या तरी शतकात गोरखनाथ होऊन गेले, याचा शोध घेण्याचा आपण प्रयत्न करू. नाथ संप्रदाय हा गुरूपरंपरा असणारा संप्रदाय आहे. या परंपरेत अनेक नाथ संप्रदायींचा समावेश होतो. आपणास प्रथम यापैकी एखाद्या नाथ संप्रदायी अनुयायांच्या निश्चित काळ उपलब्ध झाल्यास त्या आधारे गोरखनाथाच्या कार्यकाळापर्यंत पोहचता येईल. मत्स्येंद्रनाथांचे शिष्य गोरक्षनाथ हे होते हे सर्वांनीच मान्य केलेले आहे. गोरक्षनाथांचे शिष्य अमरनाथ व गहिनीनाथ. गहिनीनाथाचा संबंध महाराष्ट्राशी आहे. गहिनीनाथाचे शिष्य हे निवृत्तीनाथ. निवृत्तीनाथांनी आपल्या विविध अभंगात गुरू परंपरेचे वर्णन केलेले आहे.[98]

'ज्ञानेश्वर' आपला वडिल भाऊ निवृत्तीनाथ यांना गुरूस्थानी मानतात. निवृत्तीनाथाकडूनच ज्ञानेश्वरादी भावडांपर्यंत नाथ संप्रदाय पोहचला.[99]

ज्ञानेश्वरांच्या जन्मकाळाच्या आधारे गोरखनाथाचा कालखंड शोधता येवू शकतो. ज्ञानेश्वरांचा जन्म काळ शके 1197 म्हणजे इ.स. 1275 असा सांगितला जातो.[100] ज्ञानेश्वरांचे मोठे भाऊ निवृत्तीनाथाचा जन्मकाळ इ.स. 1273 असा सांगितला जातो. निवृत्तीनाथांचे आजोबा गोविंदराव आणि आजी निराई यांनाही गहिनीनाथाकडून उपदेश केल्याचे सांगितले जाते. गोविंदपंताना विठ्ठल पंत (ज्ञानेश्वरांचे वडिल) हा मुलगा वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी झाला. सामान्यपणे गोविंदपंताचा जीवनकाल 75 वर्षाचा ठरतो.

---

98. "निवृत्ती गयनीकृपा जपतो अमुप जाण। सांगितली खूण गोरक्षानें।।"
"निवृत्ती गयनीदेव उपदेशिल सर्व। गोरक्षी गुहयभाव सांगती मज।।"
"निवृत्ती परिवार गुरू गयनी अमर। गोरक्षीं कंदर ब्रहम माझे।।"
"निवृत्ती सधर गोरक्षी गयनी। ब्रह्मरूपें पूर्णी समरसें।।" **(श्री ज्ञानेश्वर महाराजांची गाथा)**

99. "तेणें कळिकळित भूता। आला देखोनि निरूता। ते आज्ञा श्रीनिवृत्तीनाथा। दिधली ऐसी।।
ना आधी गुरू शंकरा। लागोनी शिष्य परंपरा। बोधाचा हा संसरा। जाला जो आमुतें।।
तो हा तूं घेऊनि आघवा। कळीं गिळितयां जिवां। सर्व प्रकारीं धांवा। करीं पा वेगीं।।
**(ज्ञानेश्वरी, 18.1758–1760)**

100. गुरव श्री कृष्ण, श्री ज्ञानेशांचा जन्मकाळ आणि जन्मग्राम, भारत इतिहास संषोधक मंडळ, पुणे, त्रैमासिक, ज्ञानदेव विशेषांक, खंड 57, अंक 1–4 डॉ.चिं.ना. परचुरे, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, डिसेंबर 1976, पृ.क्र. 8

निवृत्तीनाथांचा जन्म (इ.स. 1273) विठ्ठलपंताच्या 35 व्या वर्षी धरला, तर (इ.स. 1273 –35=1238) इसवीसन 1238 हा विठ्ठलपंताचा जन्म काळ येतो. त्यावेळी गोविंदपंताचे वय 55 असल्यामुळे गोंविंदपंताचा जन्मकाळ (1238–55=1183) इ.स. 1183 च्या सुमारास झाला असावा. गहिनीनाथाचा कालखंड या आधारे इ.स. 1180 ते इ.स. 1280 च्या सुमारातील ठरतो. या आधारे गहिनीनाथाचे गुरू गोरखनाथ हे बाराव्या शतकातील ठरतात. साधारणतः त्यांचा कालखंड इ.स. 1130 ते इ.स.1190 असा असू शकतो.[101]

वीरशैव लिंगायत संप्रदायाचे प्रमुख प्रवर्तक महात्मा बसवेश्वर यांचा जन्म काळ इ. स. 1105 ते 1167 असा सांगितला जातो.[102] प्रभुलिंग लीला ग्रंथाच्या आधारे वीरशैव लिंगायत संप्रदायी व महात्मा बसवेश्वरांचे समकालीन अनुयायी अल्लमप्रभू व गोरखनाथ यांच्यामध्ये श्रीशैल्य पर्वतावर तात्त्विक मतभेद झाल्याचे दिसते. याचा अर्थ अल्लमप्रभू व गोरखनाथ हे समकालीन म्हणजे गोरखनाथाचा कालखंड बारावे शतक ठरतो.

## गोरखनाथांचे जन्मस्थान

गोरखनाथांच्या जन्मकालखंडाप्रमाणेच त्यांच्या जन्मस्थानाबद्दलही विश्वसनीय पुराव्याअभावी विद्वानांमध्ये मतभेद जाणवतात. त्या संबंधी आपण पुढीलप्रमाणे चर्चा करू.

1. गोरखनाथाचा जन्म नेपाळमध्ये झाला. कारण नेपाळमध्ये गोरखनाथांच्या जन्मासंबंधीच्या अनेक कथा सांगितल्या जातात.[103]
2. गोदावरीच्या तीरावर एका ब्राह्मण स्त्रीस गर्भसंभव झाला व त्यापासून गोरक्षांचा जन्म झाला. बाराव्या वर्षी त्यांनी मत्स्येंद्रनाथाकडून उपदेश स्वीकारला.

---

101. ढेरे रा.चिं.,, नाथ संप्रदायाचा इतिहास, प्रथमावृत्ती (सुधारीत), पद्मगंधा प्रकाशन, पुणे, सप्टेंबर 2007, पृ.क्र. 115
102. Desai P.B. Basaveshwara and His Times, Second Edition, Basava Samithi, Basava Bhavan, Bengalore, 2006, Page No. 325
103. उदा. त्यांच्या जन्मासंबंधी सांगितली जाणारी नेपाळमधील सर्वात लोकप्रिय कथा अशी – ''महादेवाच्या प्रसादाने एक विप्रस्त्रीस विभूती अथवा भस्म मिळाले. अश्रध्देमुळे तीने ते भस्म शेण्याच्या ढिगाऱ्यात टाकून दिले. 12 वर्षानंतर याच ढिगाऱ्यातून गोरक्षांचा जन्म झाला. मत्स्येंन्द्रानी त्यांना उपदेश दिला व आपल्या सोबत नेले. पुढे गोरक्षनाथ नेपाळाला आले. तेथे त्यांचा अपमान झालेला असल्यामुळे त्यांनी मेघसमुहास कोंडून ठेवून अनावृष्टी घडवून आणली. मत्स्येंद्रनाथ येत आहेत असे पाहून गोरक्षनाथ वंदन करण्यास उठले तेव्हा ढगांचे बंधन सुटले व प्रर्जन्यवृष्टी होवू लागली.'' (कल्याणी मलिक, नाथ संप्रदायेर इतिहास, दर्शन ओ साधनप्रणाली (बंगाली) पृ.क्र. 280

3. 'योगीसंप्रदायाविष्कृती' या ग्रंथाप्रमाणे त्यांचा जन्म गोदावरी नदीच्या तीरावरील चंद्रगीरी नावाच्या गावी झाला.

4. नेपाळ राज्याच्या ग्रंथालयातील हस्तलिखीतावरून दक्षिणेकडे असलेल्या वडव नावाच्या देशात महामंत्राच्या प्रसाद फलावरून गोरक्षनाथांचा जन्म झाला.

5. क्रुक्स व ग्रियर्सन यांनी निर्धारित केलेल्या परंपरेनुसार गोरक्षनाथ यांनी सत्ययुगात पंजाबमधील पेशावर येथे, त्रेतायुगात गोरखपुर येथे, द्वापरयुगात द्वारकेच्या पुढे हुरभुजमध्ये व कलियुगात काठेवाड येथील गोरखमढी या ठिकाणी अवतार धारण केला.[104]

6. नाशिक येथील नाथसंप्रदायी अनुयायांच्या मते गोरखनाथ हे मूळचे नेपाळमधील. पुढे ते पंजाब व तेथून नाशिक परिसरात आले.

वरील विविध मते पाहता गोरखनाथांचे वंशज हे उत्तर भारतातील असावेत या कालखंडात ते दक्षिण भारतात आले. पुढे ते येथेच स्थिर झाले असावेत. नाशिक, त्र्यंबकेश्वरचा परिसर नाथ संप्रदायाने प्रभावित झालेला प्रदेश आहे. त्र्यंबकेश्वर येथील गोरखगुंफा, गहिणीनाथाचा येथील निवास, जवळच चौरंगी नाथाशी संबंधित सप्तशृंगी आणि तेथून अहमदनगर जिल्ह्यातील वृध्देश्वरापर्यंतची नाथ प्रभावित डोंगरी स्थाने यांचा विचार करता गोरखनाथांचा प्रभाव नाशिक–नगर परिसरात झाला आहे असे मत रा.चिं.ढेरे व्यक्त करतात.[105] पूर्व मध्ययुगात म्हणजे 10 व्या ते 12 व्या शतकात कल्याणी चालुक्य–कलचुरी व यादवांची सत्ता महाराष्ट्रात होती. नाथ पंथाचा प्रभाव महाराष्ट्रावर होता आणि आजही आहे. अनेक नाथ संप्रदायी पवित्र स्थाने महाराष्ट्रात आहेत. याशिवाय कल्याणी चालुक्य राज्य परिसरात दक्षिण भारतातील प्रसिध्द तंत्र बिट श्री.शैल्य जे कदलीबन परिसरात आहे या ठिकाणी गोरखनाथाचे गुरू मत्स्येंद्रनाथांचे वास्तव्य होते. पुढे गोरखनाथांनीही या परिसरात वास्तव्य केलेले आहे. येथेच अल्लमप्रभू व गोरखनाथ यांच्यात तात्त्विक भेद येथेच निर्माण झाले. यावरून हे स्पष्ट होते की, गोरखनाथांची

---

104. द्विवेदी हजारी प्रसाद, नाथ संप्रदाय, प्रथमावृत्ती, हिंदूस्थानी अकॅडमी, उत्तरप्रदेश, अलाहाबाद, 1950, पृ.क्र. 96.

105. ढेरे रा.चिं., नाथ संप्रदायाचा इतिहास, प्रथमावृत्ती (सुधारीत), पद्मगंधा प्रकाशन, पुणे, सप्टेंबर 2007, पृ.क्र. 81

जन्मभूमी उत्तर भारत असो अथवा दक्षिण भारत पण त्यांचे सर्वाधिक वास्तव्य व कर्मभूमी महाराष्ट्र कर्नाटकचा सीमाभाग आहे. एवढे मात्र नक्की.

## गोरखनाथांचे चरित्र व कार्य

कथा, आख्यायिका, स्तोत्रे इत्यादी साधनांमधुन गोरखनाथाचे चरित्र व व्यक्तिमत्त्व स्थूल मानाने अनुमानितता येते. गोरखनाथाचे वाङ्मय, त्यांची साधना, त्यांचा शिष्यपरीवार. त्यांची तीर्थयात्रा, त्यांचे सिद्धिसामर्थ्य, त्यांचे तात्त्विक सिद्धांत इत्यादीचा सूक्ष्मतेने विचार करून गोरखनाथांच्या चरित्राची व व्यक्तित्त्वाची साधारण रूपरेषा ठरविता येण्यासारखी आहे. हजारी प्रसाद द्विवेदींच्यामते शंकराचार्यांच्या खालोखाल गोरखनाथांचा प्रभाव भारतीय जनमानसावर आहे. बहुतेक संशोधकांचे असे मत आहे, की गोरखनाथांचा जन्म ब्राह्मण कुळात झाला. मोहनसिंगांच्या मते ते हिंदू विधवेचे अवैध पुत्र होत. ''समाजाच्या खालच्या थरात जन्म घेवून कर्तृत्त्वाने क्रांती करणारा महापुरूष'' असे गोरखनाथांचे वर्णन ते करतात. 'गोरक्षसिंद्धांन्तसंग्रहात' त्यांना 'ईश्वर संतान' म्हटले आहे. 'मतिरत्नाकर' या महानुभावांच्या ग्रंथात गोरक्षांचा जन्म शूद्र कुळात झाल्याचे वर्णन आहे.[106] रा.चिं. ढेरे यांच्या मते तो दक्षिणेत स्थायिक झालेल्या काश्मिरी ब्राह्मण पंडितांच्या कुळात जन्मला असावा[107] गोरखनाथांच्या नावावर जे संस्कृत व प्राकृत ग्रंथ उपलब्ध आहेत, त्यावरून त्यांना संस्कृत भाषेचे ज्ञान चांगले असावे व त्यांचा तत्त्वज्ञानाचा अभ्यास सखोल असावा गोरखनाथ गौरवर्णीय व देखणे असावेत कारण त्यांच्या रूपाचे वर्णन नाथसंप्रदायी ग्रंथात असेच आलेले आहे. रांगेय राघव यांनीही असेच मत व्यक्त केलेले आहे.[108]

गोरखनाथ व त्यांचे गुरू मत्स्येंद्रनाथांशी संबधित अनेक कथा नाथ सांप्रदायी ग्रंथामधून दिसतात. आपले गुरू मत्स्येंद्रनाथ यांच्या शोधासाठी, उध्दारासंबंधी ज्या कथा उपलब्ध आहेत, त्यावरून गोरखनाथ हे बुध्दिमान, प्रसंग ओळखणारे, विविध वेश–भूषा धारण करणारे होते. गोरक्षकालीन धर्मसाधनेचा जो विचार दिसतो त्यानुसार गोरखनाथांचे

---

106. ........ आणि गोरक्ष जन्मला शुद्र कुळी। तो मच्छिंद्राचा शिष्य नाथओळी।
तो जन्मला शिरकमळी। हे असत्य।। **(मतिरत्नाकर, पृष्ट क्र. 25)**

107. ढेरे रा.चिं., श्री गुरू गोरक्षनाथ, चरित्र आणि परंपरा, प्रथमावृत्ती, वोरा ॲन्ड कंपनी, मुंबई, 1956 पृष्ठ क्र. 103

108. राघव रांगेय, गोरखनाथ और उनका युग, प्रथम संस्करण, आत्माराम एण्ड संन्स दिल्ली, 1963 पृष्ठ क्र. 45–46

वर्तन अतिशय उदात्त, पवि़त्र व नैष्ठिक असावे. स्त्री राज्यातून आपल्या गुरूला मुक्त करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, त्यांनी केलेला उपदेश इत्यादी घटकांवरून गोरखनाथ हे विरागी, त्यागी, ब्रह्मचर्य परायण, हट्योगी, नीतीमान असे होते यात शंका नाही याच संयमाचा, शुद्ध अचरणाचा, नितीचा उपदेश गोरक्षांनी केलेला दिसून येतो. समकालीन धर्मसाधना कामक्रिडेत व विकृत अचरणात रमलेली असताना गोरक्षनाथांनी आपल्या प्रभावाने तिला शुद्ध व पवित्र, नैष्टिक व वैराग्यपूर्ण अशा मार्गावर अणून नाथसंप्रदायाचे प्रवर्तन नव्याने केले. त्यांची ही विषयपराङ्मुखता व त्यांचे खडतर वैराग्य पाहुनच ज्ञानेश्वरासारख्या योगीसिध्द त्यांचे वर्णन 'विषयविध्वंसैकवीर' अशा शब्दाने करतात. हे यथार्थच म्हणावे लागेल. त्यांचे आचरण व त्यांचा उपदेश यांच्यात एकरूपता होती. कामिनी आणि कांचन यांचा लोभ नसल्याच्या अनेक कथा त्यांच्या संबंधी नाथसांप्रदायिक ग्रंथात ठिक–ठिकाणी दिसतात. मल्याळ देशात त्यांना राणीच्या आश्रयाने सुखविलासात राहण्याची संधी होती; पण ती त्यांनी अव्हेरिली. पार्वतीने ज्या चार सिद्धांची रूपवती स्त्री पाठवून परीक्षा घेतली त्यात गोरक्षनाथ यशस्वी झाले. त्यांनी त्या स्त्रीस मातृस्थानी मानले. या कथेचे मर्म व ज्ञानेश्वरादी नाथपंथीय संतांचा स्त्रीकडे पहाण्याचा दृष्टिकोन लक्षात घेता गोरक्षांच्या वैराग्याचे महत्त्व ध्यानात येईल. मत्स्येंद्रांच्या झोळीमधील वीट फेकून देणाऱ्या गोरक्षनाथांच्या विरक्तीचे मर्म स्पष्ट आहे.

गोरखनाथांना विविध सिद्धी अवगत असल्यातरी त्यांचा उपयोग लोकांचे दुःख दूर होण्यासाठी व्हावा, असे त्यांना वाटे. सिंध प्रांतामधील लोकांना सिद्धिच्या सामर्थ्याने छळू पाहणाऱ्या दयानाथांना गोपीचंदाच्या आग्रहावरून उपदेश करताना गोरक्षनाथ म्हणाले, 'लोकांना दुःख देवू नकोस मी तुला व तुझ्या आनुयायांना तसेच विरोधकांना वरदान देतो, की तुम्हास स्वच्छ, शुभ्र वस्त्रांची व चांगल्या घोडयांची कधीही वाण पडणार नाही.' त्यांनी दयानाथांना आपले शिष्य केले. त्यांच्या कानांना भोके पाडून त्यात कुंडले घातली. काळया सुताचे पागोटे बांधले व दीनांचा उद्धार करण्यासाठी पाठवून दिले.[109]

गोरखनाथांच्या संप्रदायाचे एक मोठे वैशिष्ट्ये असे, की त्यात चातुर्वर्ण्य अथवा वर्णाश्रम यांचा भेद नसे. गोरक्षांचा संप्रदाय या सर्वांच्या पलिकडचा म्हणजे अतिवर्णाश्रमी

---

109. राघव रांगेय, गोरखनाथ और उनका युग, प्रथम संस्करण, आत्माराम एण्ड संन्स दिल्ली, 1963, पृष्ठ क्र. 51–52

मानला जातो. यवनांना सुद्धा त्यांच्या संप्रदायात प्रवेश आहे. त्यांच्या परिवारात विविध जातींचे, व्यवसायांचे सिद्ध होते. शुष्क कर्मकांड, मंत्रतंत्र, जादूटोणा, पंचमकारादी अनाचार इत्यादी गोष्टी त्यांना मान्य नव्हत्या ज्वालादेवीच्या मंदिरात त्यांनी हिंसाविरहित असे मानवपूजेचे अनुष्ठान केले होते. भांग, मद्य, मांस, इत्यादीच्या सेवनापासून ते अलिप्त होते. द्रव्यदिकांचा संग्रह व नशा आणणारी व्यसने योगी माणसास उपयोगी नसल्याचे त्यांना वाटे. राजास एकदा गोरखनाथ म्हणाले, 'मी जमिनीवर झोपतो, माझ्याजवळ अंथरूण–पांघरून वगैरे काही नाही. मी दगडा–धोंडयात व काटयाकुटयात राहतो.' योगी तर निर्धनच असतो त्यांच्या जवळ द्रव्य नसते, त्याचे स्वतःचे असे निवासस्थान कोठेच नसल्यामुळे ते सतत भ्रमणशील असत. या भ्रमणात त्यांचा असंख्य स्त्री–पुरूषांशी संबंध आला आसावा. युवतीस 'बहन' मानावे, वयस्कर स्त्रीला 'माता' म्हणावे अशी त्यांची शिकवण होती.

## गोरक्षनाथांचे साहित्यिक कार्य

गोरखनाथ विद्वान व साहित्यिक होते. त्यांच्या नावावर लिहिलेली अनेक ग्रंथ आढळतात. गोरक्षकृत संस्कृत ग्रंथात अमनस्क, अमरौघप्रबोध, अमरौघशासनम्, गोरक्षपद्धती, गोरक्षसंहिता, महार्थमंजरी, (महेश्वरानंदकृत?), सिद्धसिंद्धांन्तपध्दती, योगमार्तंड, अवधूतगीता, गोरक्षकल्प, गोरक्षकौमुदी, गोरक्षगीता, गोरक्षचिकित्सा, गोरक्षपंचक, गोरक्षशास्त्र, चतुरशीत्यासन, ज्ञानप्रकाशशतक, ज्ञानशतक, नाडीज्ञानप्रदीपिका, योगचिंतामणी, योगबीज, योगशास्त्र, योगसिध्दासनपध्दती, विवेकमार्तंड, श्रीनाथसूत्र, हट्योग, हट्संहिता, ज्ञानामृतयोग इत्यादी ग्रंथांची नावे प्रामुख्याने घेतली जातात. पितांबरदत्त बडथवाल, कल्याणी मलिक, हजारीप्रसाद द्विवेदी इत्यादी भारतीय विद्वानांनी गोरक्षनाथांच्या ग्रंथांचे भाषांतर व संपादन केलेले आहे. त्यांचे साहित्य ओवीबद्ध असून त्यांना 'सबदी' या नावाने ओळखले जाते. संस्कृत मिश्र हिंदीतूनही साहित्यरचना झालेली आहे.

## नाथसिद्ध व इतर प्रमुख नाथ प्रवर्तक

सामान्यपणे नव नाथांचा व त्यांच्या विचारांचा मिळून त्यांचा नाथ संप्रदाय बनल्याचे मत सर्वसामान्यांचे आहे. पण ते प्रमुख नऊ नाथ कोणते? ते मूळचे कोणते? त्यांचा कालखंड कोणता? या संबंधिची एकवाक्यता मात्र कोणत्या नाथ संप्रदायी ग्रंथात दिसून येत नाही. विविध ग्रंथात नऊ नाथांमध्ये विविध नावे नाथांची आलेली आहेत. त्या संबंधी आपण थोडक्यात चर्चा पुढीलप्रमाणे करू.

### नवनाथभक्तिसार

19 व्या शतकातील नरहरी मालू यांच्या 'नवनाथभक्तिसार' या ग्रंथात नऊ नारायणांनी पृथ्वीवर नऊ नाथांच्या रूपाने अवतार घेतल्याची कथा आहे.[110] त्या नवनाथांची नावे पुढीलप्रमाणे,

| नारायण | | अवतार |
|---|---|---|
| 1) कवी नारायण | – | मत्स्येंद्रनाथ |
| 2) हरी नारायण | – | गोरक्षनाथ |
| 3) अन्तरीक्ष नारायण | – | जालंधरनाथ |
| 4) प्रबुद्ध नारायण | – | कानिफनाथ |
| 5) पिप्पलायन | – | चर्पटीनाथ |
| 6) अविर्होत्र | – | नागनाथ |
| 7) दुमिलनारायण | – | भरथरीनाथ |
| 8) चमसनारायण | – | रेवणनाथ |
| 9) करभाजन | – | गहिनीनाथ |

### योगीसम्प्रदायाविष्कृति

या ग्रंथात वरील नाथांपैकी गोरखनाथांना वगळलेले आहे. हरीनारायण – भरथीरनाथ व दुर्मिल नारायण – गोपीचंद्रनाथ असे बदल दिसतात.

### नवनाथचरित्रमु

110. नरहरी धुंडीसुत मालू, श्री नवनाथ भक्तीकथासार, वरूण एंटरप्रायझर्स, पुणे, 1826, पृ.क्र. 103

15 व्या शतकाच्या सुरूवातीस निर्वाण झालेल्या या तेलगू ग्रंथात पुढीलप्रमाणे नवनाथांचा क्रम दिसतो – 1) शिवनाथ, 2) मिननाथ, 3) सारंगधर, 4) गोरक्षनाथ, 5) मेखनाथ, 6) नागार्जुन, 7) सिद्धबुद्ध, 8) विरूपाक्ष, व 9) कणिक.[111]

## गोरक्षसिद्धांतसंग्रह

या ग्रंथात दोन गणना नाथ प्रवर्तकांच्या दिलेल्या आहेत.

**अ)** 1) आदिनाथ, 2) मत्स्येंद्रनाथ, 3) उदयनाथ, 4) दंडनाथ, 5) सत्यनाथ, 6) संतोषनाथ, 7) कुर्मनाथ, 8) भवनार्जि व 9) गोरक्षनाथ.

**ब)** 1) गोरक्षनाथ, 2) जगन्नाथ, 3) जलंधर, 4) नागार्जुन, 5) सहस्त्रार्जुन, 6) दत्तात्रेय, 7) देवदत्त, 8) जडभरत व 9) मत्स्येंदर.[112]

## सुधाकरचंद्रिका

गोरक्षसिध्दांतसंग्रहाप्रमाणेच याही ग्रंथात थोडासा बदल करून नाथ प्रवर्तकाची संख्या नावानीशी दिलेली आहे. ती पुढीलप्रमाणे – **ब)** 1) आदिनाथ, 2) मत्स्येंद्रनाथ, 3) उदयनाथ, 4) दण्डनाथ, 5) सत्यनाथ, 6) संतोषनाथ, 7) कुर्मनाथ, 8) एकनाथ व 9) गोरक्षनाथ[113]

## महार्णवतंत्र

या ग्रंथातील नाथांची नावे व गोरक्षसिद्धांत संग्रहातील दुसऱ्या यादीत आलेली नाथांची नावे यात समानता आहे. – **ब)** 1) गोरक्षनाथ, 2) जगन्नाथ, 3) जालंधर, 4) नागार्जुन, 5) सहस्त्रार्जुन, 6) दत्तात्रेय, 7) देवदत्त, 8) जडभरत व 9) मत्स्येंदर.[114]

## भक्तमंजरीमाला

राजाराम प्रसादी कृत 'भक्तमंजरीमाला' या ग्रंथात ज्ञानेश्वरोत्तर परंपरेतील नवनाथांची नावे पुढीलप्रमाणे – 1) सत्यामलनाथ, 2) गैबीनाथ, 3) गुप्तनाथ, 4) उध्दोधनाथ, 5) केसरीनाथ, 6) शिवादीनाथ, 7) नरहरीनाथ, 8) प्रतिभा व 9) सुभग.[115]

---

111. श्री हनुमच्छास्त्री अयाचित, राजकमल प्रकाशन, दिल्ली, पृ.क्र. 28
112. पंडित कविराज गोपिनाथ, गोरक्षसिध्दांतसंग्रह, प्रथमावृत्ती, सरस्वती भवन ग्रंथमाला, ग्रथांकाड, 1925, पृ.क्र. 40, 44–45
113. द्विवेदी हजारीप्रसाद, नाथ संप्रदाय, प्रथमावृत्ती, हिंदुस्थानी ॲकडमी, अलाहाबाद, 1950, पृ.क्र. 25
114. द्विवेदी हजारीप्रसाद, उक्त, पृ.क्र. 24
115. द्विवेदी हजारीप्रसाद, उक्त, पृ.क्र. 25

## श्री नवनाथ कथासार

1) मच्छिंद्रनाथ, 2) गोरक्षनाथ, 3) जालंधरनाथ, 4) कानिफनाथ, 5) चर्फटीनाथ, 6) वटसिद्ध नागनाथ, 7) भर्तरीनाथ, 8) रेवणनाथ व 9) गहिनीनाथ.[116]

## कदलीमंजूनाथमाहात्म्य

या ग्रंथात नाथ पंरपरेतील पुढील प्रमुख नाथांची वर्णने आलेली आहेत. 1) मीननाथ, 2) कंथलीनाथ, 3) गोरक्षनाथ, 4) कोकङणनाथ, 5) विरूपाक्षनाथ, 6) अनंगनाथ, 7) जलधंरनाथ व 8) अरूणाचलनाथ[117]

वरील विविध नाथसंप्रदायी ग्रंथातील आलेल्या विविध नऊनाथांची नावे विविध प्रकारची दिसतात. त्यांचा क्रमही वेगवेगळा असल्याचे दिसते. विविध प्रादेशिक ठिकाणी त्या–त्या परिसरातील लोकप्रिय ग्रंथानुसार नऊनाथ विविध नावांनी लोकप्रिय होते. असे असले तरी सामान्यतः मत्स्येंद्रनाथ व गोरखनाथ हे प्रमुख नाथ प्रवर्तक मात्र संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहेत.

## नाथसिद्ध

नाथसंप्रदायात प्रमुख नाथ प्रवर्तकांप्रमाणे नाथसिध्दांनाही महत्त्व प्राप्त झालेले आहे. नवनाथांमध्ये विविध प्रादेशिक ठिकाणी आलेल्या नामभेदाप्रमाणे नाथसिद्धांची विविध प्रदेशानुसार वेगवेगळी नावे दिसतात. प्रामुख्याने नाथसंप्रदायातील सिद्धांची संख्या 84 इतकी सांगितली जाते. इ.स. 800 ते इ.स. 1175 या कालखंडात वज्रयानी परंपरेतील 84 सिद्धांना नाथ संप्रदायात मान्यता मिळवून ते नाथसंप्रदायी बनले. म्हणजे वज्रयानी सिद्धांमधून नाथसंप्रदायी 84 सिध्दांचा उदय झाला हे नाथ संप्रदायी सिद्ध विविध जाती–पंथातील स्त्री–पुरूष होते. कामशास्त्रातील 84 आसनांशी यांचा संबंध असावा असेही सांगितले जाते. या 84 रहस्यमय संख्येशी बारा राशी व सात ग्रह यांच्या

116. श्री नवनाथ कथासार, सरस्वती बुक कंपनी, पुणे, 2009, पृ.क्र. 8
117. व्यवस्थापक, योगप्रचारीनी, महासभा, कदलीमंजुनाथमहात्म्य, योगप्रचारिणी महासभा, गोरक्षटिल्ला, काशी, शके 1878, पृ.क्र., प्रस्तावना 5–7

गुणाकारांचे नाते जोडले आहे. अष्टमहासिद्धी व चमत्काराचे प्राबल्य यांच्या प्रभावामुळे या सिद्धांना लोकप्रियताही मिळालेली होती. हे 84 सिद्ध अजर, अमर मानले गेले आहे.[118] विविध नाथ संप्रदायी ग्रंथात सिद्धांची नामानुक्रम आलेला आहे. ते आपण पुढीलप्रमाणे पाहू.

नाथसंप्रदाय उदय व विस्तार – प्र.न. जोशी, पृ.क्रं.171–173

नाथसंप्रदायाचा इतिहास – रा.चिं. ढेरे, पृ.क्रं. 97–101

श्री नवनाथ तत्त्वज्ञान आणि उपासना–ल.म. जोशी, पृ.113

सर्वसामान्यपणे पुढील 84 नाथ सिद्ध नाथ सांप्रदायिकामध्ये प्रसिद्ध आहेत. भारतीय संस्कृती कोशात जात, काळ व देश यासह 84 सिद्धांची यादी दिलेली आहे. ती पुढीलप्रमाणे,

1) लुईपा – जातीकायस्थ, देशमगध

2) लीलापा – ...............

3) वीरूपा – देशमगध (इ.स. 809– इ.स. 849) समकालीन राजा देवपाल (बंगाल)

4) डोंबीपा – जाती क्षेत्रीय. देश मगध, लुईपाचा शिष्य[119]

84 सिद्ध विविध जाती पंथातील आहेत. त्यातील बरीचशी विद्वान व साहित्यिक होते. नाथ सिद्धांच्या या परंपरेत कायस्थ, क्षत्रिय, ब्राह्मण, धोबी, तंतूकार व वणिक, लोहार इत्यादी व्यावसायिकांचा समावेश होतो. खड्गप्पा, थगनप्पा, छत्रप्पा, राहुलपा, धोकरिप्पा, इत्यादी सिद्ध शूद्र जातीतील होते. लोकभाषेचा आश्रय जेष्ठ सिद्धांनी घेतलेला असल्यामुळे या शूद्रजातीतील साधकांना सिद्धावस्थापर्यंत पोहचता आले. पुरूष सिद्धाप्रमाणे लक्ष्मीकश, मणिभद्रा, मेखलपा, कनकलापा अशा काही स्त्रियांचाही समावेश नाथ सिद्धांमध्ये आलेला आहे.[120]

---

118. जोशी ल.म., श्री नवनाथ तत्त्वज्ञान आणि उपासना, प्रथम संस्करण, राजेश प्रकाशन, पुणे, पृ.क्र. 112
119. जोशी प्र.न., नाथ संप्रदाय उदय व विस्तार, सुधारीत द्वितीय आवृत्ती, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, ऑगस्ट 2004, पृ.क्र.171–172
120. जोशी प्र.न., उक्त, पृ.क्र.178

सर्व सिद्धांमध्ये आदि सिद्ध कोण या विषयी मतभेद असले तरीही सरहपाद यांनाच सर्वसामान्यपणे आद्यस्थान दिले जाते. क्षबर, लुईपा, दारी, वज्रघंटा, कण्हपा, शांतिप्पा इत्यादी सिद्ध प्रभावी असून वज्रयान पंथाचाही प्रसार यांनी केला. धर्म, तत्त्वज्ञान, आचरण यासारख्या विविध जीवनावश्यक बाबींचा क्रांतिकारक विचार नाथ सिद्धांनी लोकभाषेद्वारा सर्वसामान्यापर्यंत पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

## नाथ तत्त्वज्ञान

नाथकालीन व नंतरच्या नाथ संप्रदायी ग्रंथांवरून आपणास नाथ तत्त्वज्ञानासंबंधीची कल्पना येते. तत्कालीन विविध मतांप्रमाणे नाथ तत्त्वज्ञानावरही शांकरद्वैत, अद्वैत, काश्मिरी, शैवाद्वैत इत्यादी तत्त्वप्रवाहाचा प्रभाव पडलेला दिसतो. असे असले तरीही यातूनच एक स्वतंत्र तत्त्वप्रवाह जन्मास येवून पुढे तो विकसित झाला. यासंबंधीची चर्चा आपण पुढीलप्रमाणे करू.

## नाथ तत्त्वज्ञान व शंकराचार्यांचा अद्वैत

नाथ तत्त्वावरती शंकराचार्यांचा प्रभाव जाणवतो. नाथ पंथ हे निरूपाधिक, अवाच्य या स्वरूपात असले तरीही ते मूळ उपनिषदांमधून निघालेल्या अद्वैत तत्त्वज्ञानाशी बरेचसे मिळते जुळते आहे. नाथ सिद्धांनी मांडलेले तत्त्वज्ञान हे अद्वैती आहे. आता हे अद्वैत म्हटले की, प्रस्थानत्रयीचे आद्यभाष्यकार शंकराचार्य, त्यांचे परम गुरू गौंडपादाचार्य इत्यादींनी दृढ व लोकप्रिय केलेल्या अद्वैताचे अथवा वेदांताची आठवण होणे स्वाभाविक आहे आणि मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, ज्ञानेश्वर या परंपरेत नाथ सिद्धांचे तत्त्वज्ञान शांकर अद्वैत तत्त्वज्ञानाशी मिळते जुळते असल्याचे मत सारस्वतकार भावे, पागंरकर, बा.गं. टिळक इत्यादी विद्वानाचे आहे. ज्ञानेश्वरांचा कालखंड तेराव्या शतकातील असून त्यांच्या अगोदर व नंतर शंकराचार्य, अभिनव गुप्त, रामकंठ, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य, निंबर्क आणि ज्ञानेश्वर (1275 –1296 इ.स.) अशा अनेक विद्वानांनी मांडलेल्या मतांचा[121] प्रभाव कमी अधिक प्रमाणात ज्ञानेश्वरांवर पडलेला जाणवतो. वि.म.केळकर यांच्या मते, द्वैती मध्वाचार्यांचा प्रभाव ज्ञानेश्वरांवर पडण्याचा संभव कमीच. रामानुज व निबांर्क यांचीही

121. शंकराचार्य–केवलाद्वैती, अभिनवगुप्त–अद्वैती, रामकंठ–अद्वैती, रामानुजाचार्य– विशिष्टाद्वैती, मध्वाचार्य–द्वैती, वल्लभाचार्य–शुध्दाद्वैती, निंबार्क–द्वैताद्वैती

तत्त्वज्ञाने ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानात भिन्न व हे आपल्या पासून दूरचे आचार्य असल्यामुळे त्यांचाही परिणाम नाथपंथीय ज्ञानेश्वरांवर होणे शक्य नाही.[122] शंकराचार्य, अभिनव गुप्त, रामकंठ हे मात्र अद्वैती असून ज्ञानेश्वरांच्या आधीचे असल्यामुळे त्यांचा प्रभाव शक्य असल्याचेही हे मानतात. वरील मताप्रमाणे शं.दा.पेंडसे, हे ही आपल्या 'श्री ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान' या ग्रंथात शंकराचार्य व ज्ञानेश्वर यांच्या तत्त्वज्ञानांची तुलना 218 स्थळांशी करून ज्ञानेश्वर हे शंकराचार्यांचे अनुकरण करतात असे त्यांनी मत मांडलेले आहे.[123] काश्मिरी शैव तत्त्वज्ञानाच्या बाबतीत ते म्हणतात, 'शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान आणि काश्मिरी शैवाद्वैत ही बहुतेक सारखीच आहेत, हे पंडित मुंकूदरामशास्त्री, डॉ.भांडारकर, प्रो.मिराशी या विद्वानाचे मत बरोबर आहे.'[124] भांडारकर आपल्या ''वैष्णविझम्, शैविझम् ॲन्ड मायनर रिलिजस सिस्टीम'' या ग्रंथात आर.जी.भांडारकर म्हणतात, "These (Kashmir Schools) are very sobre in their doctrienes and practices and may be consiered to have been influnced by the school of Shankar"[125] के.सी.पांडे यांच्या ''अभिनव गुप्तः ए हिस्टॉरिकल ॲड फिलॉसॉफिकल स्टडी'' या ग्रंथातही असेच मत मांडलेले दिसते.[126] शंकराचार्यांची काश्मिरची भेट, तेथील त्यांचा प्रचार, त्यांचे तांत्रिक स्तोत्रे यांचा प्रभाव अभिनव गुप्तांच्या शैवाद्वैत दर्शनावर पडलेला आहे.

वरील विविध मतांचा विचार करता, शंकराचार्यांच्या अद्वैती मताची छाप नाथ तत्त्वज्ञानात दिसते.

## नाथ तत्त्वज्ञान व काश्मिरी शैव तत्त्वज्ञान

या मतांचे प्रवर्तन बाळाचार्य माधवाचार्य खुपेरकर शास्त्री यांनी, 'श्री शैवागम व ज्ञानेश्वर' या ग्रंथाद्वारे केलेले आहे. त्यांच्या मते नाथपंथी ज्ञानेश्वर हे काश्मिरी शैवाद्वैती आहेत. असे वि.मो.केळकर यांच्या विरूद्धचे मत मांडतात. खुपेरकर शास्त्रींच्या मते,

---

122. केळकर वि.मो., ज्ञानेश्वर आणि शंकराचार्य, प्रथमावृत्ती, महाराष्ट्र शासन, प्रकाशन विभाग, 1977, पृ.क्र.186–209
123. पेंडसे शं.दा., श्री.ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान, प्रथमावृत्ती, के.भि.ढवळे प्रकाशन, मुंबई, 1941, पृ.क्र. 38 व 172
124. पेंडसे शं.दा., उक्त, पृ.क्र.350
125. Bhandarkar R.G., Saivism and Vaisnavism & Minor Religious Systems, IV, Bhandarkar Oriental Research Institute, Poona, 1913, Page No. 350
126. We find that Shankar's conception of the ultimate reality is the same as that of the pratyachijna. In fact he uses all the important technical expression in the same sense in which they are used in the pratayachijha.

काश्मिरी शैवाद्वैतातून नाथपंथीय तत्त्वज्ञानाचा उगम झाला. ज्ञानेश्वरांचा विद्यावंश हा मच्छेंद्रनाथ व गोरखनाथ यांचा आहे.

'महेशान्वयसंभुतें। निवृत्तिनाथसुतें।
केलें ज्ञानदेवें गीतें । देशीकार लेणे।''

(ज्ञानेश्वरी 18.1805)

असे स्वतःच ज्ञानेश्वर सांगतात. उपासनेने वैष्णव पण गुरू परंपरेने शैव असणाऱ्या या पंथास नाथ संप्रदाय हे नाव असल्याचे खूपेरकर शास्त्री सांगतात. औदीच्या शैव संप्रदाय म्हणजेच नाथ संप्रदाय असे त्यांचे स्पष्ट मत आहे. शंकराचार्याचा प्रभाव काश्मिरी शैव दर्शनावर पडला असे म्हणण्यापेक्षा शंकरतत्त्वज्ञानाने मायावादी जगन्मिथ्यावाद निर्माण केला होता, त्याला उत्तर देण्यासाठी व खरा वेदांत वा खरे अद्वैत दर्शन उभे करण्यासाठीच काश्मिर देशात शांभवाद्वैत दर्शनाची निर्मिती झाली असे खुपेरकरांना वाटते.[127] शंकराचार्यांच्या वेदांतास उद्देशूनच गोरक्षनाथांनी ''वेदान्ती बहुतर्ककर्करामतिग्रस्तः परं मायसां' असे सिद्धसिद्धांत पध्दती म्हटले आहे. श्रुतीच्या आधारे शैवाचार्यांनी सृष्टीची रचना केवळ ईष्वराच्या क्रीडेतून झाली असा सिद्धांत मांडल्याचे खुपेकरांना वाटते. ज्ञानेश्वर आणि त्यांचे नाथपंथीय सिद्ध शंकराचार्याच्या मताला अनुसरत नाहीत असे भा.पं. बहिरट यांनाही वाटते.[128] मोक्ष कल्पना, स्त्री शुद्रांकडे पाहण्याची दृष्टी याचा विचार करता शांकरदर्शनापेक्षा नाथपंथीय ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान बहिरट यांना वेगळे व उच्च प्रकारचे वाटते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनाही नाथ तत्त्वज्ञानावर शंकराचार्यांच्या तत्त्वापेक्षा काश्मिरी शैव दर्शनाचा प्रभाव असल्याचे वाटते.[129] गोपिनाथ कविराज, हजारी प्रसाद द्विवेदी, कल्याणी मलिक, नागेंद्रनाथ उपाध्याय इत्यादी उत्तर भारतातील अभ्यासक, नाथपंथाचे तत्त्वज्ञान, काश्मिरी शैव दर्शनाशी मिळतेजुळते असल्याचेच सांगतात, नागेंद्रनाथ उपाध्याय यांनी तर स्पष्टपणे म्हटले आहे की, नाथ मार्गास काही अभ्यासू, विद्वान लोक अद्वैतवादी मानतात; परंतु शंकराचार्याच्या अद्वैतवादाशी नाथ मार्गी अद्वैतवादाची भिन्नता

---

127. ढवळे वि.ग., नाथ संप्रदाय आणि ज्ञानेश्वर, ज्ञानदेवोपासक आणि कंपनी, नागपूर, 1969, पृ.क्र. 10
128. बहिरट भा.पं., संतवाणीचा अमृतकलश, पंढरपूर संशोधन मंडळ, पंढरपूर 1955, पृ.क्र. 48–54
129. नवभारत, ऑगस्ट 1976, मुंबई

आहे. काश्मिरी शैवाद्वैत दर्शनाशी हा अद्वैतवाद पुष्कळसा जुळतो. सामरस्य, शक्ती–कल्पना, परमशिव, सगुणशिव, जगताचे अमिथ्यापण, परम शिवाची इच्छाशक्ती, तिचा विकास, पिंड–बह्मांडवाद इत्यादींचे विचार व सिद्धांत अशाच प्रकारचे आहेत.''[130]

मत्स्येंद्रनाथाकडून ज्ञान मिळवून गोरखनाथांनी या नाथ पंथाचा प्रसार भारतामध्ये ज्या वेळी केला त्यावेळी कौल –कापालिकांचे मार्ग अस्तित्वात होते. तसेच शंकराचार्यांनी प्रतिपादिलेले 'अद्वैत' तत्त्वज्ञान हा तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील महत्त्वपूर्ण विचार स्पष्ट झालेला होता. गोरक्षनाथांनी तात्त्विकदृष्टया पण जरा वेगळेपणाने 'द्वैताद्वैत विलक्षण' या नावाखाली त्या तत्त्वविचारांचे प्रतिपादन केले आहे.

## वीरशैव–लिंगायत संप्रदाय

भारताच्या धार्मिक इतिहासाचे एक वैशिष्टय असे आहे की, भारतातील धर्माचा व संप्रदायाचा उदय हा प्रतिकुल परिस्थीतीत झालेला आहे. ज्या ज्या वेळी समाजात अनिष्ठ रूढी, परंपरा निर्माण होतात, त्या त्या वेळी समाजाला योग्य दिशा दाखविण्यासाठी नवीन धर्माचा किंवा संप्रदायाचा उदय होतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे मध्ययुगात उदय झालेला 'वीरशैव' अथवा 'लिंगायत' संप्रदाय. वीरशैव संप्रदाय यातील 'संप्रदाय' हा शब्द अधिक आशयधन आहे. कारण या संज्ञेतून पारमार्थिक अनुभूतीचा साठा आणि तो प्राप्त करून उपभोगण्याचा साधनमार्ग हा प्रमुख आशय व्यक्त होतोच, परंतु त्या बरोबर या साधनमार्गाचे संरक्षण संवर्धन आणि एका पिढीतून दुसऱ्या पिढीत श्रध्दा, विश्वास, आचार, तत्त्वज्ञान, उपासना, स्थाने विभुती आणि विशेष करून देवतस्वरूप यासह अधिकृतपणे होणारे संक्रमण आणि त्यातून आकारास येणारी एक विशिष्ट परंपरा, एवढा व्यापक आशयही व्यक्त होतो.[131]

## वीरशैव संज्ञेचे स्पष्टीकरण

'वीरशैव' किंवा 'लिंगायत' या संज्ञांचे वेगवेगळया प्रकारांनी स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न अभ्यासकांनी केलेला आहे. त्याआधी आपण 'वीर' या शब्दाचे स्वरूप जाणून घेवून

130. उपाध्याय नागेंद्रनाथ ; गोरक्षनाथ, त्यांचे जीवन, दर्शन आणि साधना, 'अमनस्कयोग', याला जोडलेला लेख, सिद्धसाहित्य प्रकाशन, पुणे, 1968, पृ.क्र. 40
131. मंचर रत्नाकर बापुराव, वीरशैव संप्रदाय, प्रथम आवृत्ती, डॉ.वा.ग.कल्याणकर, गौरव समिती, प्रकाशन, श्रीरामपुर, सप्टेंबर 1989, पृ.क्र. 51.

साधारणतः अलिकडे 'वीर' या शब्दाचा अर्थ शूर, यौद्धा असा सांगितला जातो. ऋग्वेदामध्ये 'वीर' हा शब्द शूर या अर्थाने आलेला दिसतो. सर्व सामान्यांचे दैवत 'म्हसोबा' ही वीरदेवता आहे.[132] वीरशैव लिंगायतांमधील 'वीरभद्र' देवता वीरयोध्दाचे प्रतिनिधित्व करते. या देवतेने यज्ञ, आहुती या सारख्या वैदिक कर्मकाडांना विरोध केलेला आहे. 'वीर' या शब्दाचा बळीशी व रठ्ठ या मुळनिवासी समाजाशी निगडीत असल्याने बसवेश्वरांनी 'वीरशैव' असे नाव आपल्या मतप्रवाहाला लावलेले असल्याचे मत डॉ. नीरज साळुंखे 'दैत्यबळी व कुंतलदेश महाराष्ट्र' या ग्रंथात नमुद करतात.[133] 'वीर' ही संज्ञा सर्वसामान्यांची निगडीत असणारी आहे. शिवाय व्यापारी संस्कृतीचे प्रतिनिधित्वही यातून केले जाते. लिंगायत शब्द वीरशैवांचाच पर्यायवाचक आहे. ज्याच्या जीवनाचा उत्तरकाल, अर्थात अनशिष्ट, आयुवस अधिकतर शिवलिंगाची पूजा, ध्यान आदींमध्ये व्यतीत होते. तोच लिंगायत होय.' असे डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य यांचे स्पष्टीकरण आहे. 'लिंगायत हे वीरशैवांहून प्राचीन आहेत. वीरशैव ही संज्ञा बसवप्रणीत शैव आंदोलनात उदय पावली असावी. लिंगधारक शैव परंपरा अतिप्राचीन आहे.' असे डॉ.रा.चिं.ढेरे यांचे प्रतिपादन आहे. शंकराचार्य, वाचस्पती, आनंदगिरी हे आठव्या शतकातील तत्त्ववेत्ते वीरशैवांचा उल्लेख करीत नाहीत. अगदी चौदाव्या शतकातील माधवाचार्य यांच्या सर्वदर्शन संग्रह मध्ये पाशुपत व आगम शैव यांचा उल्लेख असला तरी वीरशैवांचा नाही. त्यामुळे शैवांच्या संप्रदायाला वीरशैव ही विशिष्ट संज्ञा नंतर प्राप्त झाली असावी. असे प्रा.रा.ना.दांडेकरांना वाटते.[134] सिध्दान्त शिखामणि 5/5–16 मध्ये रेणुकाचार्यांनी केलेले वीरशैव शब्दाचे दार्शनिक निर्वाचन डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य यांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे. '––– गत्यर्थक 'वी' धातूचा ज्ञान अथवा विद्या असा अर्थ होतो. 'र' शब्दाचा अर्थ रमणे असा आहे अशा प्रकारे जिवाच्या अभेदाचा बोध करणारी विद्या आहे तिच्यात रमणारे शिवभक्तचं वीरशैव म्हणवतात.[135] वीरशैव मधील 'वीर' हा शब्द जेवढे कुतूहलजनक आहे. इतरांच्या विरूद्ध लढायला जेवढे धैर्य लागते त्या पेक्षा जास्त धैर्य स्वतः विरूद्ध लढायला लागते. या

---

132. साळुंखे नीरज , दैत्यबळी व कुंतलदेश महाराष्ट्र, द्वितीय आवृत्ती, लोकायत प्रकाशन, सातारा, ऑक्टोंबर 2007, पृ.क्र.147 व 149.
133. सांळुखे नीरज , दैत्यबळी व कुंतलदेश महाराष्ट्र, द्वितीय आवृत्ती, लोकायत प्रकाशन, सातारा, ऑक्टोंबर 2007, पृ.क्र. 151.
134. मंचरकर रत्नाकर बापुराव, वीरशैव संप्रदाय, प्रथम आवृत्ती, डॉ.वा.ग.कल्याणकर, गौरव समिती, प्रकाशन, श्रीरामपुर, सप्टेंबर 1989, पृ.क्र. 212.
135. मंचकरकर रत्नाकर बापुराव, उक्त, पृ.क्र.213

जाणिवेने जैनांनी स्वतःच्या वैराग्य उपासनेला वीर उपासना मानले आणि वर्धमानाला महावीर म्हटले. शैवांनी वीर हा शब्द तेथून उचलला आहे. असे प्रा.नरहर कुरूंदकर सुचवितात.[136] वीरशैव म्हणजे 'लिंगायसामरस्यात रममाण होणारा वीर पुरूष म्हणजे वीरशैव अशी वीरशैव शब्दाची व्याख्या असली तरी; लिंग आणि आयत याचा अर्थ असा की, शरीरावर इष्टलिंग धारण करणारा तो लिंगायत', विशेष असे की, वीरशैव या पेक्षा लिंगायत हा शब्द बहुजन समाजात अधिक रूळलेला आहे आणि अर्थाच्या दृष्टीने तो व्यापक व अर्थपूर्ण आहे. त्यामुळे वीरशैव आणि लिंगायत हे दोन्ही शब्द एकाच नाण्याच्या दोन बाजू सारखेच महत्वाचे आहेत.[137] सिद्धांत शिखमणि ग्रंथात 'वीर' या शब्दाचा अर्थ स्पष्ट करतांना 'वी' अर्थात अभेद विषयक ज्ञान व 'र' म्हणजे असे ज्ञान जे जनित आनंद आहे. जर यास योग्य ठरवले तरी अशी शब्द उत्पत्ती वीर न बनता 'विर' असे होईल. विद्या शब्दाचा वि कशा प्रकारे दीर्घ वी होतो. या संबंधी अर्थ या ग्रंथात दिसत नाही.[138] या विषयी डॉ.दासगुप्त भारतीय दर्शन का इतिहास या ग्रंथात स्पष्ट करतांना म्हणतात, 'अतः मेरे लिए यह स्वीकार करना कठिन है कि यह शब्द व्युत्पत्ती विषयक व्याख्या वीर शब्द के वीरशैव में प्रयोग का समर्थन करती है. इसके अतिरिक्त वेदांती विचार धारा की अनेक पध्दतीयॉ इस व्याख्या के अनुसार वीर कहला सकती है. क्यों कि अनेक प्रकार के वेदान्त तादात्म्य ज्ञान से सुख तथा आनंद का अनुभव करेंगे, अत' वीर शब्द कोई विशेष चिन्ह नहीं हे, जिससे हम वीर शैवों को अन्य धर्मां के अनुयायियों से विभिन्न कर सके. अनेक अगामानुयायी शैव भी जीवों की बाहय अथवा शिव से अभिन्नता में विश्वास करेंगे. सत्ता मे यह प्रस्ताव करणे का साहस करूंगा कि वीरशैव अपने मत के अनुमोदन में आक्रमणात्मक अथवा सुरक्षा की वीर प्रवृत्ती के कारण वीर कहलाते थे.[139] वीरशैवात 'ईरवीर' जेवू घालण्याची फार पुरातन परंपरा आहे. सिद्धांत शिखामणि या ग्रथात वीर शैवातील वीर हा शब्द विद्यावाचक असल्याचे म्हटले आहे. परंतू वीरशैवांचा 'वी' हा ऱ्हस्व

---

136. मंचर रत्नाकर बापुराव, वीरशैव संप्रदाय, प्रथम आवृत्ती, डॉ.वा.ग.कल्याणकर, गौरव समिती, प्रकाशन, श्रीरामपुर, सप्टेंबर 1989, पृ.क्र.213
137. मोगलेवार सुधाकर, वीरशैव धर्म पंथ, इतिहास व तत्वज्ञान, प्रथम आवृत्ती, नटराज प्रकाशन, सिताबर्डी नागपुर, एप्रिल 1976, पृ.क्र.71.
138. सिद्धांन्त शिखामणीत वीरशैव शब्दाची मीमांसा पुढील प्रमाणे केलेली आहे.
'वी' शब्देनोच्यते विद्या शिवाजी वैक्य बोधिका तत्सा रमन्तेये शैवा वीरशैवास्तु ते मत' .
139. दासगुप्त एस.एन., मिश्रा पि. (अनुवादक), भारतीय दर्शन का इतिहास, प्रथम संस्करण, राजस्थान हिंदी ग्रंथ अकादमी, 1975, पृ. क्र. 42.

नसून दीर्घ आहे म्हणून वीर हा 'शूर' या अर्थाने घ्यावा लागतो.[140] संस्कृत मधील विशेष अर्थ प्रकाशिका मध्ये वीरशैव शब्द वापरून त्या शब्दाचे अगदी बालिश पणे स्पष्टीकरण दिले आहे. बहूधा कन्नड विद्वांनानी वीरशैव या शब्दाचे दिलेले हे पहिले स्पष्टीकरण होय. त्यांनी लिहिलेल्या कन्नड शिवाधवशतका मध्ये जय बसवेश भक्तजनभाग्य शुभौधय वीरशैव निर्णय परमावतार असे सांगितल्यामुळे त्या काळात वीरशैव शब्द बसवेश्वरांसह शरणांच्या नावांना जोडला गेला असावा असे वाटते. या संदर्भात आणखी एक ग्रंथ म्हणजे लक्कण दंडेश यांचा कन्नड शिवतत्त्वचिंतामणी हा होय. या ग्रंथातील वातुलतंत्र 1–15 या भागामध्ये वीरशैव हा शब्द बऱ्याच वेळा येतो. कर्नाटकामध्ये वचनकारानंतर नव्हे तर हरिहर, राद्यवांक, केरेय, पदमरस नंतरच्या भीमकवीकडून वीरशैव शब्दाचा वापर करण्याचा अधिकृत आणि अन्वयक प्रयत्न गुब्बी मल्लण्णा आणि गुब्बी मल्लणार्थ यांनी केला. हे विव्दान कल्ले, गुब्बी गुम्मळापूर या हलगेदेव यांच्या शिवगंगा परिसरातील आहेत. या परिसरात निर्माण झालेल्या सोळाव्या शतकातील कन्नड साहित्यात हा शब्द सर्वत्र वापरलेला आहे. या शब्दाचा शीर्षकामध्ये वापर करून रचलेले पहिले काव्य म्हणजे वीरशैवामृत महापुराण इ.स. 1530 हे होय. हे काव्य सोळाव्या शतकातीलच आहे.[141]

वीरशैव अभ्यासक रत्नप्पा कुंभार, सुधाकर मोगलेवार, शिवलिंग शिवाचार्य आदिलोक 'वीरशैव संप्रदायाला' संप्रदाय न म्हणता ते वीरशैव धर्म असे म्हणतात. मोगलेवारांच्या मते वीरशैव हा एक धर्म आहे. वीरशैव धर्माला लिंगायत धर्म असेही म्हणतात. लिंगायत धर्म, लिंगानुभवधर्म, लिंगपथ धर्म इष्टधर्म, जंगम धर्म, शरण धर्म, वचन धर्म, बसव धर्म, शिवानुभव धर्म, शिवपथधर्म, शिवसमय धर्म, शिवाचार धर्म, शिवयोग धर्म, शिवधर्म अशी देखील विविध नावे या धर्मासाठी उपयोगिली जातात. या प्रत्येक नावाला विशिष्ट अर्थही लाभलेला आहे. वीरशैव आणि लिंगायत या दोन नावांनी हा धर्म समाज अधिक परिचित आहे. डॉ. पी.जॅश यांनीही वीरशैव संप्रदायाला धर्माची उपमा दिलेली आहे. ते म्हणतात, 'दक्षिण भारताच्या मध्ययुगात झालेले पुररूत्थान ही दक्षिण भारताच्या आणि मुख्यतः कर्नाटक व तेलगू प्रांतातल्या संस्कृती तसेच धर्म विषयक इतिहासातील एक

---

140. देव प्रभाकर (संपादक), कोरे बस्वराज, 'गोदाखोरे' इतिहास आणि संस्कृती, प्रथम आवृत्ती, प्रा. दिनकर कोरान्ने, औरंगाबाद, डिसेंबर 2006, पृ. क्र.151.

141. कलबुर्गी एम.एम., पाटील डी.टी., रामकृष्ण मराठे (अनुवादक), वीरशैव साहित्य आणि भूगोल, प्रथम आवृत्ती, लिंगायत अध्ययन ॲकडमी, बेळगांव, जूलै 2005, प्रथम आवृत्ती, पृ. क्र.7. .

अत्यंत महत्त्वाची घटना होय.वीरशैव हे लिंगायत म्हणूनही ओळखले जातात की जे नाव अधिक लोकप्रिय आहे'.[142]

वीरशैवांची स्वतंत्र ग्रंथ असली तरी ती शैवाशी निगडीत आहेत. वीरशैवांची मुख्य देवता ही 'शिवच' आहे. बसवेश्वरांनी आपल्या वचनात मान्य केलेले आहे.[143] ते आपल्या वचनाच्या शेवटी 'कुडलसंगम' या शैव तीर्थस्थळाचा उल्लेख करतात. प्राचीन साहित्यामध्ये वीरशैवांचा उल्लेख धर्म असा केलेला आढळत नाही. अनेक शिलालेखांमध्ये वीरशैवांचा उल्लेख आढळतो. पण धर्म या स्वप्नातील उल्लेख मात्र आढळत नाही. आज बहुतांशी विद्‌वानांनी शैव पंथातील एका संप्रदाय म्हणून वीरशैवाकडे पाहतात. आधुनिक काळात अनेक धर्माची सरमिसळ झालेली दिसते. बौद्‌ध धर्माचे संस्थापक गौतम बुद्‌धांना हिंदू धर्मात विष्णूचा दर्जा प्राप्त झालेला आहे. अनेक जैन, महावीरांसोबत विष्णू, शंकराचीही पूजा करतात. वीरशैव हा तर शैव पंथाशी खूपच मिळताजुळता पंथ आहे. आज बहुतेक वीरशैव स्वतःला हिंदू लिंगायत अथवा वीरशैव असेच म्हणून घेतात. विद्यापीठ अनुदान आयोगानेही विद्यापीठीय अभ्यासक्रमात शैव पंथातील एक संप्रदाय वीरशैव लिंगायत पंथाचा समावेश केलेला दिसतो.

'बसवेश्वरांनी वीरशैव संप्रदायाची स्थापना केली'. या मताला भिन्न स्वरूपाचे ऐतिहासिक पुरावे, वाङ्‌मयीन उल्लेखांची विफलता, बुद्‌धीनिष्ठता व तर्कसंगती यांचे भक्कम आधार आहेत. विशेष म्हणजे हे मत असंख्य भारतीय तसेच अनेक पाश्चात्य विचारवंतानी निःसंकोच पणे मान्य केलेले आहे. शिवाय बहुजन समाजाची देखील अशी धारणा आहे की, 'बसवेश्वर' हे 'वीरशैव लिंगायत संप्रदाया'चे संस्थापक होते. बसवेश्वरांची ओळख करून देताना माते महादेवी म्हणतात, 'जनमनात अपूर्व जागृती उत्पन्न करून केवळ जन्मानेच कोणीही उच्च नाही, निच्च नाहीय सर्वच जन्मतः समान असून व्यक्तित्त्व, नीती व ज्योती यांच्या प्राप्तीनेच श्रेष्ठ आहेत. अशा तत्त्वाचा, प्रचार करून समस्त मानव कोटीला धर्म संस्काराचा लाभ मिळावा म्हणून मानवी स्वातंत्र्यासाठी जिद्दीने लढून

---

142. संपादक मंडळ, वीरशैव विश्वकोश, खंड पहिला, प्रथम आवृत्ती, अखिल भारतीय मराठी वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर, डिसेंबर 07, पृष्ठ क्र.7.

143. शिवचिते, शिवज्ञान, भ्रमे, तिळिदवगल्लदे आचार, शिवाचार, तमतमगे, सुरेये? कुडलसंगमदेवन पूजिसिदवंगल्लदे. **(कन्नड बसव वचन 656 – माहेश्वरस्थल)**

मानवाला मनूज धर्मात व विश्वधर्मात देणारे क्रांतिपुरूष म्हणजे बसवेश्वर'.[144] बसवेश्वरांना वृषभ म्हणजे नंदीचा अवतार, नंदीकेश्वर, द्वितीय, शंभू म्हणतात, या बाबत प्रा. साखरे यांनी असा मुद्या उपस्थित केला. वीरशैव धार्मिय बसवांना द्वितीय शंभू म्हणतात. ते जर धर्म संस्थापक संप्रदाय संस्थापक नसते तर त्यांना द्वितीय शंभू म्हणण्याची काय गरज होती? विशेष म्हणजे द्वितीय शंभू म्हणून एकाही आचार्यांचा उल्लेख केलेला नाही. पुढे प्रा. साखरे यांनी मारीतोंटदाचार्य यांच्या 'वीरशैवानंद' चंद्रिका या ग्रंथातील एक उल्लेख नमुन्यादाखल सांगितलेला आहे तो असा,

'ननु वीरशैवनमप्रकृताष्टावरण्या पंचाचर स्थानैकाग्रहदय
श्रीपत्परमेश्वररानुज्ञा त्रनंदीश्वरापरावतारः श्री बसवेश्वर'[145]

बसवेश्वरांना 'वृषभ' व 'बसव' असेही म्हणतात. या दोन नावांचा उल्लेख करून बसवेश्वरांविषयी बेंझामिन वाल्कर यांनी असे म्हटले आहे. लिंगायताच्या नव्या चळवळीचे संस्थापक 'बसव' होते की, जे 'बसव' अथवा वृषभही म्हणूनही ओळखले जातात. त्यांना व्दितीय शंभूही मानले जाते. बसवांनी तरूणपनीच उपनयन हा विधी स्पष्टपणे नाकरला आणि नंतरच्या काळात लिंगायत संप्रदायातील आराध्यांच्या ब्राह्मणवादी कर्मकांडाला सक्रिय विरोध केला. आणखी एक पाश्चिमात्य विचारवंत डॉ.आर.एन.सॅलेटेर यांनी तर वीरशैव संप्रदायाची स्थापना आणि त्यांचे पुनरूत्थान या दोन्ही गोष्टींना बसवेश्वराचे प्रयत्न मुलतः कारणीभूत असल्याचा निर्वाळा दिला आहे. डॉ.सॅलेटोर म्हणतात, 'बसवेश्वर हे लिंगायत पंथाच्या संस्थापकापैकी एक होते. ते बिज्जल राजाचे पंतप्रधान होते. वीरशैव धर्माच्या पुनरूध्दाराला देखील मुख्यतः बसवेश्वर जबाबदार होते.' वैसामिन वाल्कर यांनी डॉ.सॅलेटोर यांच्या विचारांशी सहमती दर्शविली. डॉ.आर.सी. झीनर हे देखील सहमत होतात. या संदर्भात डॉ.झीनर यांनी असे नमुद केले आहे. 'लिंगायताच्या अथवा वीरशैवांच्या स्थापना बसवांनी केली. बसवांनी प्रथमतः जातीयतेला प्रचंड विरोध केला आणि नंतर त्यांनी जातिव्यवस्था तशीच मुर्तिपुजा नाकरली त्या नंतरच्या काळात तर

---

144. महादेवी माते, विश्वगुरू बसवण्णा, चौथी आवृत्ती, (कन्नड) बसव धर्मपीठ, (रि.) महामने मठामठ, कुडलसंगम, 1993 (कन्नड) पृष्ठ क्र. 1.

145. मोगलेवार सुधाकर, वीरशैव धर्म पंथ, इतिहास व तत्वज्ञान, प्रथम आवृत्ती, नटराज प्रकाशन, सिताबर्डी नागपुर, एप्रिल 1976, पृष्ठ क्र.37

त्यांनी ब्राह्मणवादी प्रवृत्तीविरूध्द बंड पुकारले'.[146] एल.बी.भोपटवार वीरशैव संप्रदायाच्या संस्थापकत्त्वाबद्दल म्हणता, 'बसव का व्यक्तित्त्व सचमुच असाधारण था. वे स्पष्टतः उस समय के बने व्यक्ति है जिस समय उन्होने जीवन यापन किया, भ्रमण किया और अपना अस्तित्त्व बना लिया. उन्होने वीरशैव मत की स्थापना की'.[147] वीरशैव संप्रदायाचे प्रख्यात संशोधक डॉ.एस.सी.नंदीमठ, बसवेश्वरांचे वीरशैव संप्रदायाच्या निर्मितिबद्दल मत मांडताना म्हणतात, 'लिंगायतात बसवेश्वरांना तेच स्थान आहे. जे महम्मदांना मुस्लिमामध्ये आणि गुरूनानकांना शिखांमध्ये आहे.'[148] डॉ.ओ.पी.सिंह यांनी असे नमूद केले आहे. ''भारतात बाराव्या शतकात लिंगायत नावाची आणखी एक चळवळ उदयास आली होती. बसव हे लिंगायत धर्माचे संस्थापक होते. सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून हा कालखंड अत्यंत महत्वाचा होता. कारण भारतातील सामाजिक व धार्मिक क्षेत्रात या कालावधीपासून अनेक मुलभूत परिवर्तन घडू लागली.'' वीरशैव धर्माचा उत्पत्तीकाल मध्ययुगात 12 वी शकतच असल्याचा निर्वाळा देतांना आचार्य पंडीत बलदेव उपाध्याय म्हणतात, ''वीरशैव धर्माच्या संस्थापकांचे नांव बसवेश्वर होय. 12 वे शतक हाच या धर्माच्या उत्पत्तीचा कालखंड होय.'' शक्तिबिशिष्टव्दैत हे या धर्माचे तत्त्वज्ञान आहे. बसवेश्वरांनी वीरशैव धर्माची संस्थापना केली याला अनेक प्रकारचे पुरावे उपलब्ध असल्याचा दावा माता महादेवी यांनी केला आहे. याधर्माच्या प्राचीनत्त्वाबाबत त्या म्हणतात, 'लिंगायत धर्माची प्राचीनता 12 व्या शतकापर्यंतच मागे जाते. लिंगायत धर्माची उत्पत्ती आणि उन्नती ही भगवान बसवांचे जीवन आणि कार्य यांच्याशी निगडित आहे. निःसंशय भगवान बसव हेच लिंगायत धर्माचे संस्थापक होत, वीरशैव धर्माच्या कट्टर एकेश्वरवादाचा पुरस्कार बसवांनी केला की जो बहुदेव उपासक हिंदू धर्माला अगदी नीव होता.[149] एच.एम. सदाशिवय्या यांनी असे म्हटले आहे, 'बसवेश्वर आणि त्यांच्या सहकार्यांनी केलेल्या जोरदार प्रभावी व चेतनादायी कार्यामुळे त्यांच्या काळात वीरशैव धर्म विलक्षण लोकप्रिय बनला त्यामुळे बसवेश्वरांचा

146. मोगलेवार सुधाकर, वीरशैव धर्म पंथ, इतिहास व तत्वज्ञान, उक्त, पृष्ठ क्र.38.
147. मल्लप्पा टी.एन., प्रभाशंकर टी.जी. (अनुवादक) बसव दर्शन, प्रथम आवृत्ती, बसव समिती, बेंगलोर, 1983, पृष्ठ क्र.131.
148. संपादक मंडळ, वीरशैव विश्वकोश, खंड पहिला, प्रथम आवृत्ती, अखिल भारतीय मराठी वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर, डिसेंबर 07, पृष्ठ क्र.39.
149. पाटील भीमराव, करजकर विजयकुमार (संपादक), युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर, प्रथमावृत्ती, ब्रम्हाजी भीमराव पाटील, किणी, अहमदपुर, एप्रिल 2006, पृ.क्र.423.

संस्थापक म्हणून लोकांनी केलेला उल्लेख हा निश्चीतच आश्चर्यकारक नाही'. एकंदर पाहता 12 व्या शतकापूर्वी या धर्माचे स्वरूप, वैशिष्टय, अवस्था, तत्त्वज्ञान, काय होते इ. अनेक गोष्टीबाबत पध्दतशीर माहिती उपलब्ध नाही. तसेच वरील सर्व आवश्यक गोष्टीबाबत समाजाचे किमान प्रबोधन देखील नीटपणे झालेले नाही.

वीरशैव धर्म, तत्त्वज्ञान आणि समाज यांची संघटना तसेच पुनर्बाधणी अतिशय समर्थपणे प्रथमतः बसवेश्वरांनी केली. काहिंशा मृतप्राय अवस्थेतील वीरशैव धर्माला बाराव्या शतकात बसवेश्वरांनी एका अर्थाने जीवदान दिलेले आहे. याच पार्श्वभूमीवर अनेक विचारवंत, संशोधक, व बहुजन समाज बसवेश्वरांना वीरशैव धर्माचे संस्थापकत्व देतात. अर्थात बसवेश्वरांच्या संस्थापकत्त्वाकडे विशाल दृष्टीकोनातून पाहण्याची आवश्यकता आहे. डॉ.मल्लेदेवरू यांच्या मते, 'ग्राहय धरण्यासारख्या सबळ पुराव्यांअभावी वीरशैव धर्माचे संस्थापक कोण हे निश्चितीपणे सांगणे कठीण आहे. तरीपण ही घटना सिंध्द करण्यासाठी असंख्य पुरावे उपलब्ध आहेत की, 12 व्या शतकात बसवांनी वीरशैव तत्वज्ञान तसचे धर्म यामध्ये विलक्षण सुधारणा घडवून आणल्या आणि वीरशैव समाजाला सध्याचे सुस्वरूप मिळवून दिले.[150]

## महात्मा बसवेश्वर चरित्र व कार्य

महात्मा बसवेश्वरांची माहिती आपणसं तत्त्कालीन पुरातत्त्वीय व पुराभिलेखीस साधनांद्वारे प्राप्त होते. म.बसवेश्वर कल्याणीच्या चालुक्य राजवटीत पंतप्रधान या महत्त्वाच्या पदावर होते. या शिवाय काही काळ ते मंगळवेढा येथील कलचुरी शासकांच्या दरबारात नौकरी केली. यामुळे कल्याणी परिसरातील 12 व्या शतकानंतरची जी कांही शिलालेख व ताम्रपट उपलब्ध झालेली आहेत. या शिलालेखांमधील काही शिलालेखांत बसवेश्वरांबद्दलची माहिती मिळते. 'अर्जूनवाड' शिलालेखात मादिराजांचे द्वितीय पुत्र आणि देवाराजाचे धाकटे बंधू म्हणून संगम बसव यांचा उल्लेख येतो. संगम बसव म्हणजेच श्री बसवेश्वर प्रभू. श्री बसवेश्वरांच्या प्रभुलिंगलिले, सिंगीराज पुराण आदी चरित्र ग्रंथात त्यांच्या मातापित्याची नावे

150. संपादक मंडळ, वीरशैव विश्वकोश, खंड पहिला, प्रथम आवृत्ती, अखिल भारतीय मराठी वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर, डिसेंबर 2007, पृ.क्र.264, 266.

'मादिराज' आणि 'मादलांबिका' अशीच येतात. तेव्हा अर्जूनवाड शिलालेखालील संगम बसव म्हणजेच श्री बसवेश्वर प्रभू असेच निश्चित होते.[151] कर्नाटकातील बागेवाडी जवळच्या मतगोळी खेडयात ताम्रपट मिळालेला असून त्यास बसवेश्वरांचा उल्लेख आढळतो. या ताम्रपटाचा कालखंड हा इ.स. 1456 असून ताम्रपटात बसवेश्वर हा वीरशैव मताचा प्रथम आचार्य 'रेवणसिध्द' नाव आणि 'चंदीरामचा' मुलगा म्हणून उल्लेखीलेला आहे. या ताम्रपटात बसवेश्वरांचे वर्णन सदगुणी क्षमाशिल, व सदाचारी म्हणून केले आहे.[152] या प्रमुख शिलालेख व ताम्रपटात शिवाय होयसळ नृपती सोमेश्वर यांच्या राज्यकाळातील कृष्णानूर शिलालेखात इ.स.1251 शिवभक्तांच्या मांदियाळीत बसवेश्वरांचे नांव भक्तिपूर्वक आले आहे. या शिवाय होयसळ नृपति 'नरसिंह तृतीय' यांच्या हिरियुरू शिलालेखातही 1258–59 इ.स. त्याचा उल्लेख आहेच. यादव नृपती महादेवराय यांच्या राज्यकाळातील चोडदामपूर शिलालेखांत इ.स. 1262 बसवेश्वरांचा उल्लेख असून त्यांना शिवाच्या नंदीचा वृषभाच अवतार म्हणले आहे. याच गावी याच काळातला दुसरा शिलालेख आहे. त्यातही बसवेश्वरांची स्तुती आली आहे. यादव रामचंद्रदेव यांच्या शासनकाळातील कल्लेदेवपूर येथील लेखातही श्री बसवेश्वराचे नाव यते. विजापूर जिल्हयातील मुदद्रबिहाळ तालुक्यात गुडीगिरी नामक गाव आहे. गुडगिरी आणि कुटोजी या दोन गावांच्या मध्ये सीमा दाखविणारी शिला आहे. ही शिला ज्या जमिनीत रोवली गेली ती जमीन संगमनाथ बसवराज देव यांच्या मालकीची होती असे त्यावरील लेखात म्हटले आहे. हे शेत श्री बसवेश्वर देवांचे असावे. लेख इसनाच्या चौदाव्या शतकातील आहे. सोरांटॅन जिल्हा येथील लेखात तर इ.स. 1356 गब्बीनायक नामक अधिकाऱ्याने बसवेश्वर देवाचे मंदीर बांधल्याचा उल्लेख आहे.[153] श्रीमती शालिनी दौडमनी यांनी संपादीत केलेल्या महामानव बसवण्णांनी समग्र वचने या ग्रंथात बसवेश्वरांचा उल्लेख असलेल्या शिलालेखांची एक यादीच प्रकाशित केलेली आहे.[154]

---

151. संपादक मंडळ, उक्त, पृ. क्र.54.
152. पाटील भीमराव, करजकर विजयकुमार (संपादक), युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर, प्रथमावृत्ती, ब्रह्माजी भीमराव पाटील, किणी, अहमदपुर, एप्रिल 2006, पृ. क्र.233.
153. अभ्यंकर वासुदेव, भक्तीकोश (खंड तृतीय), प्रथमावृत्ती, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, मार्च 2001, पृ. क्र.1302.
154. 1. इ.स. 1259 हिलियुट शिलालेख, 'बसवय्या'
   2. इ.स. 1260 अर्जूनवाड शिलालेख बसवराज, 'संगमबसव'
   3. इ.स. 1263 चौडदानपुरचे दोन शिलालेख 'संगमेशन पुत्र, बसवय्या, बसवय्या, संगमबसवय्या'

वरील पुरातत्त्वीय साधनांशिवाय तत्त्कालीन पुराभिलेखीय सांधनामध्येही बसवेश्वरांचा उल्लेख आढळतो. बसवेश्वरांच्या समकालीन असणाऱ्या काही कन्नडी वचनकारांनी आपल्या वचनांत बसवेश्वरांचा उल्लेख करतात.[155] वरील वचनाशिवाय भक्तस्थळावरील चौथ्या भागातही बसवेश्वरांबद्धलची माहिती मिळते.

वरील साधनांवरून हे सिद्ध होते की महात्मा बसवेश्वरांचा उदय 12 व्या शतकातील असून ते एक ऐतिहासिक पुरूष असून त्यांचा संबंध वीरशैव संप्रदायाशी आहे.

वीरशैव संप्रदायातील अनेक घटनांबद्धल विद्वानांमध्ये मतभेद आहेत. म. बसवेश्वरांमध्ये मतभेद आहेत. वेगवेगळी मते मांडली आहेत. म. बसवेश्वरांचा जन्म इ.स. 1105, 1106, आणि 1131 या वर्षी झाल्याचे वेगवेगळया विव्दानांनी सांगीतले आहेत. इ.स. 1131 च्या वैशाख महिण्यातील अक्षयतृतीया ही डॉ.गोसावी यांनी बसवेश्वरांची जन्मतिथी मानली आहे.[156] माजी कुलगूरू डॉ.आर.सी. हिरेमठ यांनी श्री बसवेश्वर ए बायोग्राफी ग्रंथात म.बसवेश्वरांचा जन्म 1131 तर लिंगैक्य 1167 इ.स. असे नमूद केले आहे.[157] आर.सी. हिरेमठ यांनी संपादन केलेल्या बसवण्णानंबव वचनगळ या ग्रंथातील एका वचनात असे नमुद केले आहे.[158]

---

4. इ.स. 1279 कल्लेदवरपूर शिलालेख, 'बसवराज, संगनबसवय्या'
5. इ.स. 1280 मरडीपूर शिलालेख, 'संगनबसवय्या'
6. इ.स. 1400 गुडिहाळ शिलालेख, 'बसवराजदेवरू'
7. इ.स. 1660 आनंदपूर मठाचा ताम्रपट, 'बसवेश्वर'
8. इ.स. 1686 जोडीदारून हळ्ळीचा शिलालेख, 'बसवराजेंद्र'
9. इ.स. 1700 कानकानहळ्ीचे दोन शिलालेख 'बसवेश्वर स्वामुलू, कल्याणचे बसवप्पा'

155. करपूर निरहंकार–सुज्ञानि देवियर
'करपुरचे निरहंकार सुज्ञानी देवीच्या पोटी जन्मणाऱ्यास प्रभूदेव म्हणावे का?
मंडिगेच्या मादिराज–मादलांबिकेच्या पोटी जन्ममरणाऱ्यास बसवेश्वर म्हणावे का?
अक्कनागलांबिकेच्या पोटी जन्मणाऱ्यास सिद्धरामेश्वर म्हणावे का?
मोरडिच्या मुधगौंड–सुग्गवाच्या पोटी जन्मनाऱ्यास सिद्धरामेश्वर म्हणावे का?
हे सगळे एकटयामुळेच झाले नाही. तुमच्यामुळेच झाले. चिक्कया प्रिय सिद्धलिंग नांही नाही म्हणू नका. (घाटीवाळय्या 451 सं.7) – पाटील भीमराव, करजकर विजयकुमार (संपादक), युगप्रवर्तक, महात्मा बसवेश्वर, प्रथमावृत्ती, ब्रह्माजी भीमराव पाटील, किणी, अहमदपूर, एप्रिल, 2006, पृ.क्र. 233, 234.

156. दौडमनी शालिनी श्रीशैल्य, महामानव बसवण्णांची समग्र वचने, प्रथम आवृत्ती, श्रीशैल्य सोमनिंग दौडमनी, ऑगस्ट 2007, पृष्ठ क्र. 1.

157. मंचर रत्नाकर बापुराव, वीरशैव संप्रदाय, प्रथम आवृत्ती, डॉ.वा.ग.कल्याणकर, गौरव समिती, प्रकाशन, श्रीरामपुर, सप्टेंबर 1989, पृष्ठ क्र. 227.

158. 'अय्य, भक्तीगे बीडादुदु, कल्याण मुवत्तारू वरूषा।
अय्या, अनुभवक्कक, शिवसदन, वादुदु इप्पत्तेळु, वरूश।
अय्या, हिंदीनंतनुभव, हिंदीनंते भक्ती इल्ला, ....कुंडलसंगमदेवा'।

"हे प्रभू, कल्याण छत्तीस वर्षापर्यंत भक्तीचे केंद्र होते।

हे प्रभू, कल्याण सत्तावीस वर्षापर्यंत अनुभव मंडपाचे केंद्र होते।

हे प्रभू आज अनुभव आहे ना भक्तीचे केंद्रे ... कुडलसंगमदेवा।"

बसवेश्वरांच्या वरील वचनांवरून त्यांचा जिवित कालावधी 36 वर्षाचा होता हे उचित वाटत नाही. 36 वर्ष कल्याणमध्ये बसवेश्वरांचा निवास होता.[159] 27 वर्ष अनुभव मंडपाचे निर्माण व विनूतन कार्य चालले होते तर वय 36 वजा कार्य 27 म्हणजेच 09 वर्ष शिल्लक राहतात. अवघ्या 09 वर्षाच्या बाल वयात अनुभव मंडपाची स्थापना, क्रांतीकारी कार्य होणे अशा अल्पावधीत शक्य आहे का?[160] या प्रश्नांचे उत्तर डॉ.पांडूरंग भिमसेनराव देसाई यांच्या 'बसवेश्वर ॲन्ड हिज टाईम्स' या ग्रंथात मिळते. देसाई यांनी तत्त्कालीन पुराभिलेखलय व पुरातत्त्वीय साधनांचा अभ्यास करून त्यांचा जीवन काळ सिध्द केलेला आह. त्यांच्या मते इ.स. 1105 बसवेश्वरांचे जन्मवर्ष तर मृत्यूवर्ष हे 1167 आहे.[161]

बसवेश्वरांच्या माता पित्याबद्दलही वाद दिसतो. तत्त्कालीन साहित्यातही मतभेद दिसतात. मादिराज हे त्यांच्या पित्याचे नांव आणि मादालांबिका हे त्यांच्या मातेचे नांव. मादिराज हा शैव ब्राहमण होता. तो बांगेवाडीचा (बागलकोट) अधिकारी होता. पुरवराधीश्वर आणि ग्रामकरणीक असे त्याला संबोधले जाई. ही बिरूदे सर्वश्रेष्ठ अधिकाऱ्यासच चालुक्यराजांकडून दिली जात. मात्र बागेवाडीस आणि आसपास जे कोरीव लेख सापडले आहेत. त्यात मादिराजाचा उल्लेख आढळत नाही. मणिगवळ्ळीतील एका कोरीव लेखात 'महाप्रभू मादिराजांचा' उल्लेख आढळतो. **(अर्जूनवाडा इन्स्क्रिप्शन, इएल. व्हॉ. 5 नंबर 9–31)** पंरतू संशोधकांच्या मते यातील मादिराजाचा काही संबंध नाही. या कोरीव लेखात बसवेश्वरांचाही उल्लेख आहे. मणिगवळळीच्या या कोरीव लेखातील बसपरया हा

---

**(वचन क्रमांक 162 पान क्र. 523)**

159. Hiremath R.C., Shri.Basavesvara, A Commemoration Volume, 1st Edition, Government of Mysore, Bangalore, 1967, Page No. 12
160. पाटील भीमराव, करजकर विजयकुमार (संपादक), युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर, प्रथमावृत्ती, ब्रम्हाजी भीमराव पाटील, किणी, अहमदपुर, एप्रिल 2006, पृष्ठ क्र. 36.
161. Desai P.B., Basaveswara & His Times, 2nd Edition, Basav Samithi, Bangalore, 2006, Page No. 184
162. Hiremath R.C., op.cit, 1967, Page No. 10.

चांदिराजाचा आणि चंद्रांबिकेचा पुत्र होता. त्यांचे गोत्र कश्यप होते आणि तो वाजी वंशातील होता.[162]

हरिहर पालकुटके सोमनाथ कवी स्पष्टपणे सांगतात की, 'मादिराज आणि मादलांबा' हेच बसवेश्वरांचे जन्मदाते माता पिता होते. अतिशय विश्वासाई असा अर्जूनवाडा येथील कोरीव लेख मारिजाचा बसवराजाचा पिता असल्याचे सांगतो. मादिराज तनुजमा असा त्यात त्यांचा स्पष्ट उल्लेख आहे. [163] डॉ.पी.बी.देसाई अर्जुनवाडा शिलालेखांचा संशोधनाअंती मादिराज हेच बसवराज उर्फ संगण्ण बसवा याचे जन्मदाते पिता असल्याचे "Basaveswara & His Times" या ग्रंथात सांगितले आहे. [164] ते पुढे म्हणतात, मादिराजास 'देवराज' व 'बसवराज उर्फ बसवा' असे दोन पुत्र होते. पुढे देसाई इ.स.1260 च्या अर्जुनवाडा शिलालेखातील संदर्भानुसार बसवेश्वरांचे पूर्वचरित्र स्पष्ट करतात,[165]

मंगळवेढयाचे कलचुरी हे घराणे कल्याणींच्या चालुक्यांच्या अधिपत्याखाली राज्य करीत होते. कलचुरी राजांनी इंगळेश्वर बागेंवाणी विभागाचे पुरवराधिकारी पद बागेवाडीच्या मादिराजाला दिलले होते. पुरवराधिश्वर हा परिसरातील बारा गावांचा प्रमुख असे बागेवाडी या ठिकाणी एक शिवमंदीर आहे. मादिराजाची पत्नी मादलांबिका ही शिवभक्त इ.स.1105

---

163. मोगलेवार सुधाकर, वीरशैव धर्मपंथ इतिहास व तत्त्वज्ञान, प्रथमावृत्ती, नटराज प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर, एप्रिल 1976, पृ.क्र.89.

164. Desai P.B., Basaveswara & His Times, 2nd Edition, Basav Samithi, Bangalore, 2006, Page No. 149.

165. 'The Inscription furnishes some more details about these personges. They are like this; Madiraja, the earlist ancestor of the family, was the lord of the foremost town of Bagavadi situated in the tract of Tardavadi. Bagavadi is modern Bagevadi and Tardavadi roughly corresponds to the ared of modern Bijapur District. Basavaraja, an eminent Personage of hallowed memory was known as sangana Basava on account of his absorption in deep devotion to puratanas (ancient deveotees of siva), jangaas (itendrant monks) and Linga (god siva in his symbolic form at kudala sangama) and actions solely dedicated for communion with him Devaraja is described as Munipa, lord of the ascetics. Kalidecarasa and wala Basavideva are instraduced with similar epithets of spiritual signaificance. Kavaraja is called Jangama-parsua (fulfiller of the wishes of the jangama devotees of siva) Hala Basavedeva was ardent follower of this faith.' - P.B.Desai, Basaveswara & His Times, 2nd Edition, Basav Samithi, Bangalore, 2006, Page No. 144.

मधील वैशाख शुध्द तृत्तीय, रोहिणी नक्षत्रावर अक्षय तृत्तीयेच्या दिवशी मादलांबिकेला मुलगा झाला. नंदीच्या कृपाप्रसाद म्हणून मुलाचे नांव 'बसव' असे ठेवण्यात आले.[166]

आपल्या कारकिर्दची सुरूवात बसवेश्वरांनी प्रथम बिज्जलाच्या कचेरीतून सुरू केले. त्यांच्या तीव्र बुद्‌धिमत्तेमुळे ते मंगळवेढा येथील उच्च अधिकारी प्रभावित झाले. खजिनदार तथा भांडारी सिध्दरस हा तर फारच प्रभावित झाला. त्यांना घेवून तो बिज्जलाकडे गेला. पुढे या दोघांचा नातेसंबंध घडून आला. थोडयाच दिवसात भांडारी हे सिद्‌धरांसाचे पद त्याच्या पश्चात बसवेश्वरांना मिळाले इ.स. 1154 साली बिज्जल हा चालुक्य राजा तिसऱ्या तैलपचा महाप्रळधान झााला. बिज्जल हा परमशिवभक्त असल्याचे तत्त्कालीन साहित्यात आढळते. बिज्जल हा परम शिवभक्त होता. त्यामुळे त्याचे बसवेश्वरांशी जिव्हाळयांचे संबंध आले. त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वामुळे बिज्जल भारावून गेला. म्हणूनच तो कल्याणीला महाप्रधान म्हणून गेल्यावर बसवेश्वरांना त्यांनी भांडारी म्हणून बोलावून घेतले. बसवेश्वरांनी भांडारी म्हणून काम केल्याचे उल्लेख त्यांच्या वचनात साडपला. बलदेवाच्या मृत्यूनंतर इ.स. 1162 साली बसवेश्वर बिज्जलाचे मंत्री झाले. मंगळवेढा येथील बसवांचा मुक्काम कुडलसंगम आणि कल्याणी येथील मुक्कामाच्या तुलनेने अल्प होता. परंतु त्या मुक्कामातच त्यांनी बिज्जलांचा चांगलाच स्नेह संपादन करून घेतला.[167]

इ.स. 1154 पासून बसवेश्वरांचा कल्याण येथील वास्तव्य अनेक घटनांनी भरलेला दिसून येतो. कुडलसंगम येथे त्यांनी पाहिलेले स्वप्न आता प्रत्यक्षात येवू घातले होते. राज्यातील अभिजनांवर आणि जनसामान्यांवर त्यांचा परमार्थिक व्यक्तित्त्वाचा, बुद्‌धीमत्तेचा, आणि कर्तृत्त्वाचा विलक्षण प्रभाव पडला होता. एव्हाना त्यांनी पारंपारिक शिवोपासनेत अनेक इष्ट बदल घडवून आणले होते. त्यांच्या भक्ती चळवळीकडे भारतातील अनेक थोर शिवभक्त शैवपंथीय आकृष्ट झाले होते. त्यांनी धर्म, पंथ, जात, स्त्री, पुरूष इत्यादी भेद पारमार्थिक आणि सामाजिक क्षेत्रात झुगारून दिले आणि माणसाला माणुसकीच्या,

---

166. Hiremath R.C., Shri.Basavesvara, A Commemoration Volume, 1st Edition, Government of Mysore, Bangalore, 1967, Page No. 12
167. Hiremath R.C., Shri.Basavesvara, A Commemoration Volume, 1st Edition, Government of Mysore, Bangalore, 1967, Page No. 24 .

विश्वबंधुत्वाच्या समान पातळीवर आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या या कार्यास धार्मिक आणि सामाजिक दृष्ट्या क्रांतिकारक स्वरूप प्राप्त झाले.

शिवानुभव गोष्टी आध्यात्मिक विषयावरील जी चर्चा कुडलसंगमी आणि मंगळवेढा येथे सांघिकरित्या होत असे, तिला महामने येथिल अनुभव मंडपात नवपंथ प्रवर्तनाचे स्वरूप प्राप्त झाले. कल्याणी येथील अनुभव मंटपात पंथीय तत्वज्ञानांची, सामाजिक धारणेची मुलभूत तत्त्वे चर्चिली जात होती. त्यातून त्यांची वचने आकारण येत होती. या तत्त्वविचारांचा दुरवर प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून कार्यवाही होवू लागली. आता बसवेश्वर केवळ मंत्री म्हणून थोर राहिले नव्हते. तर लोकमानसात त्यानी एक नवीन धार्मिक चळवळ उभी करणारा नेता म्हणून श्रेष्ठ स्थान प्राप्त करून घेतले.[168]

## महात्मा बसवेश्वरांचे कार्य

## बसवेश्वरांचे धार्मिक कार्य

समाजात आमुलाग्र परिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर बुरसटलेल्या जुनाट समाजाच्या धारणेचा मूळ पाया खिळखिळा केला पहिजे. त्याशिवाय नविन विचाराचे बीजारोपण शक्य होत नाही. हे लक्षात आल्यावर म. बसवेश्वरांनी वैदिकांच्या वेद, उपनिषिदे, यज्ञशास्त्रग्रंथ, आरण्यके, श्रुति, स्मृती, पुराणे, सुत्रे यांनी समर्थिलेली तांत्रिकता, कर्मकांड, बळीप्रथा, यज्ञसंकल्पना, झुगारून दिले. बसवेश्वर विद्यार्जनाच्या काळात कुडलसंगम येथे असतांना वरील विषयांचा त्यांनी चांगला अभ्यास केलेला होता.[169]

## तांत्रिकतेला विरोध

बसवेश्वरपुर्व काळात दक्षिण भारतात शैव, वैष्णव, जैन व बौद्ध, हे प्रमुख धर्म पंथ अस्तित्त्वात होते. त्यातल्या त्यात चालुक्य राज्यात जैन व शैव संप्रदायाचा बोलबाला होता. बौद्ध धर्मातील अनेक पंथ, उपपंथ, समाजात अस्तित्त्वात होते. तांत्रिकतेचे अवडंबर समाजात मोठया प्रमाणात दिसून येते. शैव पंथातील पाशुपत, कालामूख, कापालिक, अघोर

168. मंचर रत्नाकर बापूराव, वीरशैव संप्रदाय, डॉ.वा.ग.कल्याणकर, गौरव समिती प्रकाशन, श्रीरामपूर, सप्टेबर 1989, पृ.क्र.99. .
169. मंचर रत्नाकर बापुराव, उक्त, पृष्ठ क्र.100

या सारखी तांत्रिक पंथाचे अस्तित्त्व समाजात मोठया प्रमाणात होते.[170] अशा अनेक तांत्रिक पंथीयांना व धर्मगुरूना राजाश्रय मिळालेला होता.' तत्कालीन अनेक शिलालेखामध्ये याचा संदर्भ मिळतो. बसवेश्वरांनी उपरोक्त सर्व अघोरी कृत्यांवर कडाडून टीका केलेली आहे.[171] बसवेश्वरांना तत्कालीन समाजात धर्माच्या नांवाखाली केल्या जाणाऱ्या अघोरी तपावर आपली नापसंती व्यक्त करतात.[172]

वीरशैव लिंगायत संप्रदायात मांसभक्षण निषिध्द मानलेले आहे. पुण्यासाठी व देवी दैवतांना प्रसन्न करण्यासाठी प्राण्याची बळी दिली जाते काही काही प्रसंगी तर नरबळीचेही उल्लेख आढळतात. प्राणी बळी देवून त्यांचे मांस खाण्याची प्रथा तांत्रिक पंथात दिसते. अशी प्रथा बसवेश्वरांना मान्य नाही.[173]

जन्माला येणारा प्रत्येक जीव मृत्यूपावणारा आहे हे जगच नष्टमय आहे. हे सांगतांनाच ते अघोरी व बळीप्रथेसारख्या कर्मकांडांना विरोध करतांत.[174] पुढे ते एका वचनात वेद व वचनातील अघोरी तत्त्वांना विरोध दर्शविलेला आहे.[175] बसवेश्वरांनी शैव तांत्रिक पंथातील साधुवर टिका करतात. हे साधू धर्माच्या नांवाखाली प्राण्यांची बळी

---

170. मेनकुदळे अशोक गंगाधर, बाराव्या शतकातील आद्य समाज सुधारकः महात्मा बसवेश्वर, प्रथम आवृत्ती, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, फेब्रुवारी 2003, पृष्ठ क्र.56.

171. 'ओसाड टेकडी गावाच्या वाटेत। तळे विहीरी फुलझाडी झुडपात,।।
मोठया वृक्षात ग्रामाच्या मध्यभागात,। शहराच्या वेशीत मोठया वटवृक्षात,।।
बसवूनी घरी,दुभत्या गुरांची आटवितीधार,।। अनेक गर्भिणी, बाळंतीण, कुमारीस छळून,।।
करिती भयभीत आपले पोर भरण्याप्रत,। मारया , बिरया, खेचर गाविल अंतर बेंतर,।।
काळया, माळया, केतय्यादि,। शत मडक्याच्या न लागती नदी'।।
**(बसव वचन 557, माहेश्वर स्थल)**

172. 'मरेल काय साप, वारूळाला मारल्यास हो,! अघोर तप करूनही काय मिळे खास,
अंतरंग व आत्मशुध्दीविना कैसा होई विश्वास हो,कुडलसंगमदेवास?'[172]
**(महात्मा बसवेश्वर वचन क्र.118 भक्ताचे ज्ञानीस्थल)**

173. 'देह सुखासाठी मद्य–मांस खातात, नयनसुखासाठी परस्त्रीवर नजर ठेवतात,
लिंगपथावर न चालणाऱ्यांनी लिंगधारणा करून काय उपयोग?
जंगमांनी दोषी ठरविले तर मृत्यूपासून सुटका होणार नाही कुडलसंगमदेवा'.
**(म.बसवेश्वर वचन क्र.106, तामसनीरसनस्थल)**
'झाडाच्या ढोलीत राहणाऱ्या क्षुद्र देवाला बकरीचा बळी देवून नाचतात,
बकरी मरून शिवाचा कोप दुर करणार आहोत? बकरी नको, कोकरू नको,
फक्त बेलपत्र आणून न विसरता पूजा कर, आमच्या कुडलसंगमदेवाची.
**(वचन क्र.560, महेश्वर स्थल)**

174. 'नवस फेडीसाठी सणाला आणलेला बकारा तोरणाची पाने खाऊ लागला,
येणाऱ्या मृत्यूची त्याला जाण नाही पोटाच्या भुकेची त्याला चिंता नाही,
जसे जन्मले तसेच मेले त्याला मारणारे वाचणार आहेत कुडलसंगमदेवा?'
**(बसव वचन क्र.129,महेश्वर स्थल)**

175. 'प्रत्येक शब्दाला मारून टाकतात तुला अरे बोकडा रड रे बाबा!
वेद वाचणाऱ्यासमोर रड रे बाबा! ते तुझा रडण्याचा योग्य बदला घेतील कुडलसंगमदेव'
**(बसव वचन क्र. 573, महेश्वर स्थल)**

तलवारीने देतात. त्याचे प्रसाद म्हणून मांस खातात मद्य प्राशन करतात. अशांना बसवेश्वर ढोंगी म्हणतात.[176]

बसव काळात समाजात सर्वसामान्य लोक अनेक देवीदेवतांची पुजा करीत अनेक–नव नविन देवी देवतांचा उदय तत्त्कालीन समाजात झालेला होता. एकाच कुटुंबातील वेगवेगळया सदस्यांची वेगवेगळी दैवते असत. अशा दैवतांना प्रसन्न करून घेण्यासाठी प्राणी हत्या, मांस, मदिरा भक्षण, कामक्रीडा अशा अघोरी प्रथांचा वापर बहुजन समाज करी. बसवेश्वरांना मनोमन वाटे की, समाजाने अशा अघोरी कर्माचा त्याग करावा.[177]

अशा प्रकारे महात्मा बसवेश्वरांनी तत्त्कालीन अनेक अनैतिक धार्मिक रूढी, परंपरांवर टीका केली आहे. 12 व्या शतकाचा व त्या अगोदरचा काळ हा धर्माच्या दृष्टीने अंधकारमय होता. समाजात सर्वत्र धार्मिकेतच्या नांवावर अघोरी प्रथा निर्माण झाल्या. सर्वसामान्य समाज यात भरडला जावू लागला. अशा या तत्त्कालीन समाजाच्या धर्माला नविन व समाज उपयोगीं रूप देण्याचे कार्य बसवेश्वरांनी केले.

## बसवेश्वरांची देव विषयक परिकल्पना

बसवेश्वरांनी देव विषयक कल्पना तत्त्कालीन समाजाने मानलेल्या देव या कल्पनेपेक्षा वेगळी होती. बसवेश्वरांचा देव दगड मातीतला नव्हता, विश्वरूपी होता. कुडलसंगम निवासी असतांना अनेक अध्यात्मिक ग्रंथाचा त्यांनी सखोल अभ्यास केला. यारून त्याची देव विषयक कल्पना स्पष्ट होते. बसवेश्वरांचा देव विश्वंभर असून तो सर्वत्र पसरलेला आहे. तसेच तो आपल्या शरीरातील मन, भाव व प्राण यांना आधारभुत असा जिवात्मा होऊन राहिला आहे. विश्वात्मा अग्नी, तर जीवात्मा ठिणगी होय. म्हणजे

176. 'डाव्या हातात तलवार, उजव्या हातात मांस, तोंडात सुरापात्र, गळयात शिवलिंग असेल तर त्याला लिंग म्हणतो, संगमदेवा म्हणतो, कुंडलसंगमदेवा, त्यांना मुखलिंगी मानतो'
**(बसववचन क्र. 720, माहेश्वराचे भक्तस्थल)**

177. 'पती शिवलिंग देवाचा भक्त, पत्नी मरि मसणीची भक्त, पती पादोदक प्रसाद सेवतो,
पत्नी सुरा, मांस सेवती,
शुध्द मनोभावाविना भक्ती म्हणजे मदिरापात्र बाहेरून धुतल्याप्रमाणे होईल कुंडलसंगमदेवा'
**(बसव वचन,104 तामसनिरसनस्थल)**

विश्वात्म्याचा एक अंश म्हणजे जीवात्मा होय. त्याशिवाय दोहोंमध्ये काही फरक नाही. आणवमल, मायामल, व कार्मिकमल या मलयत्रयांनी हा अंश आवृत्त होवून जीवात्मा होतो.

देव निराकार (निर्गूण) व साकार (सगुण) या दोन्ही रूपात असून दोन्ही एकच होत निराकार परमात्म्याची साकार अभिव्यक्ती म्हणजे विश्व होय. त्यामुळे शाश्वत व अशाश्वत हा प्रश्न उद्‌भवत नाही. देव एक असून त्याला वेगवेगळी नावे दिली गेली. यावर बसवेश्वर म्हणतात. देव एक, नांवे अनेक, म्हणून त्यांनी एकदेवोपासनेचा सिध्दांत मांडून एकाच देवाची उपासना करायला सांगितली आहे. इष्टलिंगाच्या रूपाने देवाची उपासना करावी म्हणून त्यांनी उपदेश केला आहे.[178] म्हणून अनेक देवाची उपासना, मुर्तिपुजा त्यानी निशिध्द मानली आहे. देवाची उपासना इष्टलिंगाच्या रूपानेच करावी, अन्य रूपामध्ये नको असेही ते म्हणतात.[179]

## एकेश्वरवादाचे समर्थन व बहुदेववादांवर टीका

वीरशैव हा मुलतः एकेश्वरी धर्म पंथ आहे. वीरशैव धर्मशास्त्रानुसार बसवेश्वर हे एकेश्वरवादी होते. ईश्वरवादी याचा अर्थ मानवी जीवन आणि निसर्ग यांचे नियंत्रण करणारी एखादी दैवी शक्ती (Divine Power) मानणे होय. बसवेश्वर हे एकेश्वरवादाचे समर्थक होते. बसवेश्वर हे केवळ शिवोपासक होते. शिवाच्या विश्वनाथ, जगन्नाथ, आदिनाथ, पृथ्वीनाथ, पृथ्वीपती इत्यादी विश्ववाचक नावांवरून देखील यांची प्रचिती येते. ते एकेश्वरवादाचे समर्थन करतात.[180] ते हिंदू धर्मातील अनेक देवी दैवतांच्या आराधना

---

178. 'जगभरित, आकाशाव्यापी, त्या पलीकडे तुमचा विस्तार,
पाताळापलीकडे तुमचे पवित्र चरण,
ब्रहंमांडापलीकडे तुमचा मुकुट
अगम्य, अगोचर, अप्रतिम, लिंगा, कुडलसंगमदेवा,
माझ्या तळहातावर तुम्ही इवलेसे झाला आहात',।
179. दौडमनी शालिनी श्रीशैल्य, महामानव बसवण्णांची समग्र वचने, प्रथम आवृत्ती, श्रीशैल्य सोमनिंग दौडमनी, ऑगस्ट 2007, पृष्ठ क्र.14.
180. 'रूद्र हा विश्वापेक्षाही श्रेष्ठ, असे सांगतात शास्त्रे
विश्वरूपी विश्वेश्वरा करतो आम्ही वंदन त्रिवार,
जये असो आदितत्त्वाचा, जय असो विश्वाच्या मुलस्त्रोताचा,
विजय असो सर्वश्रेष्ठ शिवतत्वाचा, हे कुडलसंगमदेवा'.

करणाऱ्या बहूजन समाजावर टिका करतात.[181]

जगातील बौद्ध, इस्लाम, ख्रिश्चन, पारशी, असे काही धर्म एकेश्वरवादी धर्म म्हणून ओळखले जातात. बसवेश्वरांनी एकेश्वरवाद मान्य केला आहे. बसवेश्वरांना 'शिव' ही एक देवता विश्वरूपती असल्याचे भासते. या शिव देवतेशिवाय इतरांचे अस्तित्त्व बसवेश्वर 'शून्य' मानतात.[182] हिंदू धर्मात सजीव व निर्जीव प्रतिके दैवते म्हणून पुजली जातात. अशा प्रतिकांची संख्या हजारो आहे. प्राणी, देव, पक्षी देव, वृक्ष देव, अग्नि देव, वायुदेव, वरूणदेव, सूर्यदेव, चंद्रदेव, दगडदेव, अमूक वस्तू देव, तमुक वस्तू देव मानण्याची संकल्पना बसवेश्वरांनी नाकारली आहे. वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक जीवनाला उपयोगी पडणाऱ्या गोष्टींना बसवेश्वरांनी देखील महत्त्व दिले आहे. तथापि उपयुक्त ठरणाऱ्या सर्वच गोष्टींना देव मानणे आणि त्यावर श्रध्दा ठेवून काही विधीवर्तन करणे त्यांनी चूकीचे व विसंगत मानलेले आहे. सजीव, निर्जीव गोष्टींना देवदेवता मानून त्यांची प्रार्थना, उपासना, करण्याच्या प्रवृत्ती व पध्दतीतून बऱ्याच अंधश्रध्दा रूढ झाल्या.[183] अनेक देवदेवतांची उपासना ही आवश्यक तशीच निरर्थक असल्याचे बसवेश्वरांनी म्हटले आहे.[184]

## होम, हवन, यज्ञयाग, अग्निपुजा, निषिद्ध

बसवपूर्व काळात व बसव काळात समाजात ब्राह्मण धार्मियांकडून (वरिष्ठ जातीकडून) होम हवन, यज्ञयाग, अग्निपूजा, आदी क्रियाकर्म, धर्माच्या नांवावर केली जात असत. या पद्धती खर्चिक होत्या. शिवाय समाजातील अस्पृश्यांना यात सहभागी होण्यास निषिद्ध मानले जाई.

---

181. मी विष्णुला मानू का श्रेष्ठ? पण, तो तर वैतागला दहा अवतारांत,
मी ब्रहमाला मानू का पर्याय? पण, त्याला तर एक तोंड गमवावे लागले.
मी वेदांना मानू का सर्वोच्च? पण , त्यांना तर प्राणीहत्येची आस
मी शास्त्रांना मानू का उत्तम? पण, ती तर अतिपाल्हाळिक,
मी पुराणंना तरी मानू का....? पण, ती तर पुर्वजन्म कर्मात गुरफटलीत
एकटाच तु स्वयंभू, एकटाच तु परिपुर्ण परमेश्वर तुला नच पर्याय हे कुडलसंगमदेव'.

182. 'देव असे एकची एक, तया नावे जरी अनेक पमर पतिव्रतेचे चित्त, केवळ पतिठायी असे रत
काय म्हणू तयांना? आचारती जे व्यर्थ बहुदेव उपासना, नाना दैवत पुजती साधक, होईल
जीवन तयांचे निरर्थक. तू तर एकच ईश्वर, हे कुडलसंगमेश्वर'

183. 'मडके देव, सुप देव, अन् रस्त्याबाजूचा दगड ही देव,.......
हा देव अन् तो देव म्हणत म्हणत पाऊल ठेवण्यासाठीही नाही ठेवली जागा,
म्हणावे काय साऱ्यांना देव? पहा बंधूनो, देव तर एकच एक, कुंडलसंगमदेव',

184. 'बांबूची ती चावून पाने रसोत्पति नच होई त्याने व्यर्थ चावुनी चावुनी दमणे.
घुसळुनी घुसळुनी पाणी रविने, लोणी कधी का मिळेल त्याने? व्यर्थ घुसळूनी हात दाखविणे.
वळुनी वळुनी वाळू कवणे दोर गुंफिला काय सांगणे? उगाच सारे वाटे श्रमणे.
कुडलदेवसंगम देवा विरहित अन्य देवात भजना नच हित कुरता भुसकट दुखती हात
हे कुडलसंगमनाथ'.

बसवेश्वरांना असे कर्मकांड मान्य नव्हते. बसवेश्वरांनी वैदिकांच्या यज्ञसंस्था, पौरोहित्य, याज्ञिकजन, स्मार्त, अग्निहोत्र, यांच्यावर सडकून टीका केली आहे. ब्राह्मण पुरोहितांचे शोषण कार्य, यज्ञातील अपव्यय, सोवळ्याचा अतिरेक, बाहय कर्मकांड, दुष्टाचरण, यातून निर्माण झालेली मानसिक गुलामगिरी यांना बसवेश्वरांनी टीकाविषय बनवले.[185] अशा प्रकारे बसवेश्वरांनी धर्माच्या नांवाने केल्या जाणाऱ्या प्रथा समाजातून दूर सारण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

## मंत्र तीर्थस्नांना विरोध

आजच्या सारखेच बसव व बसवपूर्वकांळातही समाजात धार्मिक श्रेष्ठींकडून मंत्र तंत्राचा वापर केला जात असे. याशिवाय तीर्थयात्रा व तीर्थस्नान केल्याने पाप धुवून जाते व पुण्य मिळते अशी समाजात धारणा होती. बसवेश्वरांनी अशा गोष्टींना विरोध केलेला आहे.

पुरोहित वर्गाने वेगवेगळया प्रकारच्या पुराणग्रंथातील मंत्राचा मायाजाळ उभे करून अंधश्रध्दांना खतपाणी घातले आहे. बसवेश्वरांच्या मते मनाच्या एकाग्रतेसाठी 'ओम नमः शिवाय' हा एकच शिवमंत्र पुरेसा आहे. ईश्वरासंबंधीची निष्ठा जोपासण्यासाठी वैदिक मंत्रानां अनाठायी महत्त्व देण्यात कांही प्रयोजन नसल्याचेही स्पष्ट केले आहे. शिवमंत्राचे महत्त्व स्पष्ट केले आहे.[186] तीर्थक्षेत्रांच्या नद्यांमध्ये स्नान केले तर आपले सर्व रोग व पाप कमी होवून पुण्यसंचय होतो. अशीही एक स्नानाविषयीची समजूत भारतीय जनमानसात रूढ झालेली आहे. कुंभमेळा, महाशिवरात्री, एकदाशि, पर्वकाल, यात्रा, महायात्रा, तसेच सूर्यग्रहण, चंद्रग्रहण, यासारख्या दिवशी तर तीर्थस्नानाला विशेष महत्त्व दिले जाते. गंगानदीत पुनः डुबकी मारून स्नान करणाऱ्या लोकांमुळे गंगासुध्दा अक्षरशः मैली झाल्याचे

---

185. 'अग्नीदेवाला हवी देणाऱ्या ब्राहमणांच्या घराला,
नैवैद्य, बळी, समिधा वगैरे टाकीत नाहीत,
किंवा रस्त्यावरची माती धूळही चालते
आग लावल्यावर काय करतात?
मग मोरीचे घाणेरडे पाणीही चालते
हे दुटप्पी वागणे नव्हे काय?'

186. 'ओम नमः शिवाय मांत्राला घाबरले
ओम नमः शिवाय, मंत्राला घाबरले
'ओम नमः शिवाय' मंत्राला घाबरले,
शिवमंत्र, महिमा जे न जाणती
हे कुडलसंगमेश्वर'
अन् टिकूही न शकले, वेदमंत्र
अन् तोकडे पडले, शास्त्र, मंत्र
अन् भ्रमातही पडले, मंत्र–तंत्र
जीवन त्यांचे व्यर्थ ठरती,

आज उत्तर भारतातील गंगा यमुनेसह इतर नद्यांकडे पाहिल्यावर जाणवते. आज नद्यांच्या स्वच्छतेसाठी लाखो रूपये खर्च करावे लागत आहेत असा अनुभव ठिकठिकाणी येतो. तीर्थस्नान करून एक वेळ शरीर स्वच्छ होईल पण त्यापासून पुण्यप्राप्ती होईल, ही समजूत खोटी, चूकीची व निराधार असल्याचे बसवेश्वरांनी सांगितले आहे. पुण्यलाभाच्या अभिलाशाने नद्यांमध्ये स्नान करणारे आणि वृक्षांना फेरे मारणारे देवाला खऱ्या अर्थाने ओळखू शकत नाहीत. असेही त्यांनी म्हटले आहे.[187]

## बसवेश्वरांची स्वर्ग—नरक विषयक संकल्पना

हिंदू धर्मात स्वर्ग, नरक, अशा भ्रामक समजूती मोठया प्रमाणात दिसून येतात. जमिनीतून वर आलेला जीव जमिनीत गाढला जाणारा असतो याची जाणीव व्यक्तीला नसते. व्यक्ती 84 योनीची कल्पना करून जीवन जगत असतो पण अशा भ्रामक गोष्टींवर शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार न करता दैवी योग, नशीब अशा गोष्टीच्या तो आश्रयस्थानी जातो. व्यक्तीला स्वर्गाचे आकर्षण वाटते. आकर्षण वाटणे हा मानवी स्वभाव, त्या पोटी पुराणातील गोष्टी सत्य मानून तसे वर्तन करण्याचा प्रयत्न करतो. व्यक्तीला नरक नको वाटते कारण त्याला तिथे त्रास वाटतो कष्ट करावे लागते असे आचार बसवेश्वरांना मान्य नाहीत. मोक्ष, स्वर्ग, नरक, देवलोक, मृत्यूलोक, पुण्य, पाप, दैव, कर्म, यासारख्या गोष्टीकडे श्रध्दावादी, अनुभववादी, प्रत्यक्षवादी, दृष्टिकोनातून पाहण्याचा आग्रह बसवेश्वरांनी धरला. देव इथे अन दानवही इथेच. पुण्य अन् पापही इथेच. आनंद इथे अन दुःखही इथेच. शाबासकी इथे अन शिक्षाही इथेच.स्वर्ग इथे अन नरकही इथेच. याच जन्मी व याच देही येत असतो. तेंव्हा सुखरूपी स्वर्गाच्या लाभासाठी आणि दुःखरूपी नरकाच्या त्यागासाठी बसवेश्वरांनी शुध्द भक्ती, नीती व कर्तव्यपूर्तीचा मार्ग सांगितला आहे. त्यांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे 'कायकवे कैलास' अर्थात प्रयत्न हाच परमेश्वर होय. प्रामणिक प्रयत्नांमुळे

---

187. 'नद्यांतील जल पाहून लोक बुडी मारतात, अन् वृक्ष पाहून फेरे घालतात,
जल आटत असते अन् वृक्ष वठत असते
आटणाऱ्या जलावर अन् वठणाऱ्या वृक्षावर
श्रध्दा ठेवून जगणारे तुला कसे जाणू शकतील?
हे कुडलंसगमेश्वरा'। **(मेनकुदळे अशोक गंगाधर, बाराव्या शतकातील आद्य समाजसुधारक : महात्मा बसवेश्वर, प्रथमावृत्ती, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, फेब्रुवारी 2003, पृ.क्र.63)**

आणि कर्तव्यपूर्तीसाठी सर्व सिद्धी लाभतेच, अशी वास्तववादी श्रद्धात्मक विश्वासाची शिकवण बसवेश्वरांनी दिलेली आहे.[188]

## गुरू, लिंग, जंगम, विषय बसवेश्वरांचे विचार

जेथे गुरू म्हणजे धार्मिक किंवा आध्यात्मिक मार्गदर्शक होय. तो शिवयामधील आणवमल, मायामल व कार्मिकमल निवारून त्यांच्या मस्तकामधील सहस्त्रदलकमल चक्रमधील जीव चैतन्यरूप चित्कला शिष्याच्या हातातील इष्टलिंगामध्ये प्रतिष्ठापित करून हे इष्टलिंग प्राणस्वरूप असून ते सदा अंगावर धारण करून त्याची उपासना कर असा उपदेश करतो.

इष्टलिंग म्हणजे मूर्ती नसून तो निराकार देवाचे साकर स्वरूपातील प्रतिक होय. आत्मदर्शनाचे ते दर्पण (आरसा) होय. चेहरा पाहण्यासाठी आरसा एक साधन आहे. आरसाच सर्वस्व नव्हे. त्याप्रमाणे स्वरूपाच्या दर्शनासाठी इष्टलिंग एक साधन होय. म्हणून त्याचे महत्त्व कमी होत नाही. बसवेश्वरांच्या दृष्टीने साध्य, साधन व साधक ही त्रिपूरी सारखीच महत्त्वाची आहे. त्यात कमी जास्त असा भेदभाव नाही. म्हणूनच गांधीजींनी देखील साधन शुचितेचे महत्व प्रतिपादले होते. त्या दृष्टीने इष्टलिंग साधन असले तरी साध्यही तेच आहे.म्हणून सदा सर्वदा ते अंगावर धारण करून नियमितपणे त्याची उपासना केली पाहिजे.

जंगम ही एक उच्च दर्जाची आध्यात्मिक स्थिती असून ती एक जात आहे. साधनेच्या बळावर जंगमत्त्व प्राप्त होते. जंगम गुरूचाही 'गुरू' असून इष्टलिंगामध्ये यथार्थ स्वरूप दाखवून देतो. त्या दृष्टीने इष्टलिंगाचाही तो गुरू ठरतो. म्हणून लिंगायतामध्ये जंगमाला अत्यंत श्रेष्ठ स्थान देण्यात आले आहे. गुरूचा, लिंग, भक्त व समाज या सर्वांना जंगम मार्गदर्शन करतो. त्यांच्या शंकाचे निवारण करतो आणि त्यांच्या अडचणींवर उपाय सांगतो. म्हणून जंगम साऱ्या समाजाचा मानवजातीचा गुरू, मार्गदर्शक व भवसागरातून

---

188. 'देवलोक आणि मृत्यूलोक, भिन्न नव्हे, ते दोन्ही एक.
सत्य बोलणेच देवलोक, मिथ्या, बोलणेच मृत्यूलोक
'अहो' म्हणजेच स्वर्ग, 'अरे' म्हणणेच नरक.
स्वर्ग इथे अन नरकही इथेच.
याला तुच साक्षीदार हे कुडलसंगमेश्वर'. (घुगरे सुर्यकांत, वीरशैव व इतर धर्म आणि समाज, प्रथमावृत्ती, साधना बुक स्टॉल, गडहिंग्लज, कोल्हापूर, 1999, पृ.क्र.27)

तारून नेणारा नावाडी होय. तो भवरोगाचा वैद्य शल्यविशारद होय. तो चालता बोलता जिवंत देव होय. म्हणून बसवेश्वरांना जंगम प्राणी म्हणतात. त्यांना जंगम आपल्या प्राणापेक्षा प्रिय वाटतो.[189] बसवेश्वरांनी अगदी सरळ भाषेत, अगदी सोप्या मार्गाने व शस्त्रशुध्द रीतीने देवाची कल्पना करून दिली. सुमारे 900 वर्षानंतर देखील त्याचे धार्मिक तत्त्वज्ञान जुने झाले नाही. उलट त्याला वैज्ञानिक नियमांचा भक्कम पुरावा मिळाला आहे. उदाहरणार्थ, विज्ञानामध्ये कोणत्याही जड वस्तू, अचेतन, स्थिर किंवा निर्जीव नाही. भौतिक शास्त्रीय किंवा रासायनिक वस्तू देखील चलनशील व सजीव आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे या विश्वातील कोणतीही वस्तू किंवा त्यातील अणू नाशवंत नाहीत. फक्त त्यांच्यात सतत बदल होत असतो. ही वैज्ञानिक सत्य बसवेश्वरांनी आपल्या धर्मविषयक तत्त्वज्ञानात सांगितली आहेत. आज बहुतेक सर्व विद्वान व धर्ममार्तंड बसवेश्वरांचे विचार मान्य करतांना दिसतात.

## बसवेश्वरांचे सामाजिक विचार व कार्य

### जातिभेद, वर्णभेद अमान्य

बसवेश्वर सामाजिक समतेचे पुरस्कर्ते होते. त्यांना जातिभेद, धर्मभेद, पंथभेद मान्य नव्हता. आपल्या जीवनकाळात त्यांनी उच्च–नीचता, जातिभेद, स्पृश्य अस्पृश्यता अशा बाबींना कडाडून विरोध दर्शविला. तत्त्कालीन एका अस्पृश्याच्या मुलाचा विवाह समाजात उच्च समजल्या जाणाऱ्या वर्गातील मुलीशी घडवून आणला अनेक सनातन्यांनी बसवेश्वरांना व त्यांच्या अनुयायाविरूद्‌ध राजा बिज्जलाकडे तक्रार केली. पुढे यातून 'कल्याण क्रांती' घडून आली.

बसवेश्वरांनी जातिविरहीत समाजाचे स्वप्न पाहिले होते. म्हणून त्यांनी समाजात जाती उपजातीत विभागणाऱ्या जातिव्यवस्थेचा कडाडून निषेध केला. आपल्या एका वचनात

189. 'गुरू रागावल्यास एक दिवस सहीन,
लिंग रागावल्यास काही दिवस राहीन.
पण जंगम रागवल्यास क्षणभरही सहन करीन.
पण त्याच क्षणी माझे प्राण जावोत, कुडलसंगमदेवा', (घुगरे सुर्यकांत, वीरशैव व इतर धर्म आणि समाज, प्रथमावृत्ती, साधना बुक स्टॉल, गडहिंग्लज, कोल्हापूर, 1999, पृ.क्र.30)

ते म्हणतात, 'लोह तापवून झाला लोहार, कपडे शिवून झाला देवांग, कोष्टी, विणकर, कपडे धुवून परीट–धोबी झाला. तसाच वेदपण करून झाला ब्राह्मण!'

बसवेश्वरांनी समतेच्या उपदेशाचे डोस न पाजता प्रत्यक्ष कार्य केले. ते स्वतः महार मांगाच्या घरी जात. त्यांचे भोजन (प्रसाद) आनंदाने स्वीकारित. ढोर कक्कयाला ते वडिल मानत. तर मातंग चन्नयाला आदरपूर्वक आजोबा म्हणत. जातिवर्णव्यवस्थेविषयी माणसाला अंतर्मूख करण्यासाठी ते म्हणतात, 'हे मानवा! तू विटाळातून जन्म घेवून कुलगोत्र शोधतोस? मृतास वाहून नेणाऱ्यास शुद्र समजतोस आणि स्वतः मात्र बोकडाचा बळी घेतोस? केवळ वेदमान्य झाल्यामुळे? असल्या शास्त्र वेद पुराणांनी तुला कसे आंधळे करून टाकले आहे रे?' आज समाजाने थोर व विद्‌वान मानलेल्या ऋषीमुनींचा जन्म हिन कुळात झालेला ते मान्य करतात.[190]

जातीपाती विसरून विभिन्न जातीत रोटी बेटी व्यवहार व्हावेत. मनोमिलन व्हावे यासाठी ते आजन्म प्रयत्नशील राहिले. जातिभेद नष्ट झाल्याशिवाय समाजात एकोपा शक्ती निर्माण होणार नाही. हे ते जाणून होते. यासाठी त्यांनी जातिपाती निर्मुलनाविशयक विचार केवळ ग्रंथातून व्यक्त केले नाहीत, तर प्रत्यक्ष कृतीपर पावलेही टाकली.[191]

## आंतरजातीय विवाहाला कृतीने समर्थन

बसवेश्वरांचे स्वतःचे लग्न एका क्षत्रिय मुलीबरोबर झाले होते. 'जैन राजा बिज्जळाच्या पदरी असलेले सिध्दरस हे क्षत्रिय होते. ब्राह्मण काळात जन्मलेल्या बसवेश्वरांनी दुसरा विवाह क्षत्रिय कुळातील मुलीशी केला. निलांबीका ही दुसरी पत्नी करून घेतांना त्यांनी स्वतःचा आंतरजातीय विवाह केला. रूढीचे भंजन करण्यात आणि सामाजिक समतेचा ध्वज उंचावण्यासाठीच त्यांनी ब्राह्मण मधुवरस या पंडिताच्या मुलीचा

---

190. अ) 'कोळिणीचा पुत्र नांव त्याचे व्यास,। मार्कंडेय खास मांगिणीचा।।
मंडूकाची कन्या थोर मंदोदरी,। जातीची थोरी काय किजे,।।
बेरडाचे पोटी अगस्तीचा जन्म,। चांभार उत्तम तो दुर्वास,।।
काश्यप लोहार, कौंडिण्य तो न्हावी,। तिन्ही लोकी बरवी प्रसिध्दी ती,।।
जातिचे श्रेष्ठत्व हाचि वेडाचार,
ब) 'खाण्यापिण्यात म्हणती झाला क्रियाहीन, कन्या देण्याघेण्यात हुडकती जातपात,
कसा म्हणू तयांना भक्त? कसा म्हणू तयांना मुक्त?
ऐक बा कुडल संगम देवा।'

191. पाटील भीमराव, विजयकुमार करजकर (संपादक), युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर, प्रथमावृत्ती, ब्रह्माजी भीमराव पाटील, किणी, अहमदपुर, एप्रिल 2006, पृ.क्र. 121.

विवाह जातीने ढोर असलेल्या हरळयाच्या मुलाशी लावून देण्यात पुढाकार घेतला होता. अनुभव मंटप व कुलगूरू अल्लमप्रभुंचीही संमती मिळाली होती. वीरशैव पंथातील शिवशरणांच्या मुलांमुलींचा तो विवाह होता. त्यांनी राजा ढोर व ब्राह्मण या जाती वीरशैव धर्म स्वीकारल्याने पुसल्या गेल्याचे सांगितले व आपल्या कृतीचे समर्थन केले.'

बसवेश्वरांची शिष्या अक्कमहादेवींना तिच्या पतीचा वाईट अनुभव आल्यावर बसवेश्वरांनी त्यांना आपल्या अनुभव मंटपात आश्रय दिला आणि केले ते योग्यच केले असे म्हटले. म्हणजे अन्यायी पतीला स्त्रीने सोडणे हे प्रगतिशील बसवेश्वरांना अयोग्य वाटले नाही. म्हणजे त्यांचे घटस्फोटाला प्रोत्साहन होते असा अर्थ होत नाही. पती पत्नीचा तत्त्वांमुळे संघर्ष असेल तर स्त्रीला स्वतंत्र विचार करून निर्णय घेण्याचा अधिकार त्यांना मान्य होता.[192]

## स्त्रीविषयक समतावादी दृष्टिकोन

बसवेश्वर समतावादाचे पुरस्कर्ते होते. लिंगभेदाच्या नावाखाली स्त्रियांकडे दुय्यम किंवा हीन भावनेने पाहणे बसवेश्वर अमान्य करतात. बसवेश्वरांनी स्त्रीविषयक गौणत्व प्रवृत्तीला तसेच सर्व प्रकारच्या अंधश्रध्दांना विरोध केलेला आहे. बसवेश्वरांच्या मते स्त्री ही कोणत्याच बाबतीत पुरूषापेक्षा कमी अथवा गौण असूच शकत नाही. बसवेश्वरांच्या स्त्रीविषयकच्या या समतावादी दृष्टिकोनावर भाष्य करतांना डॉ.निर्मलकुमार फडकुले म्हणतात. 'भारतीय समाजात स्त्रीच्या कपाळी शतकानुशतके गुलामगिरीच लिहिली गेली. माता, भगिनी, पत्नी, आणि कन्या या नात्यांनी पुरूषांच्या जीवनात वावरणारी स्त्री नेहमीच पुरूषांपेक्षा कनिष्ठ प्रतिची मानली गेली. स्त्रीचा उल्लेख प्राचीन काळापासून शूद्रांच्या बरोबरींनेच केला गेला. धर्माच्या नांवाखाली तिच्यावर बंधने घालण्यात आली होती. स्त्रीच्या जीवनाला व व्यक्तिमत्त्वाला पुरूषा इतकीय प्रतिष्ठा आहे. पुरूषाहून स्त्री कोणत्याही अर्थाने कमी दर्जाची असत नाही. स्त्री पुरूष समान आहेत. असा उद्‌घोष बसवेश्वरांनी केला आणि स्त्रीच्या ठायी असलेल्या शक्तिची, बुध्दीची, प्रतिभेची व कर्तृत्त्वाची जाणीव साऱ्या समाजाला करून दिली. सुधारलेल्या युरोप खंडात देखील 18व्या व 19 व्या शतकात स्त्री

---

192. जयशेट्टी भालचंद्र, वचन, प्रथम आवृत्ती, कर्नाटक साहित्य अकादमी, बेंगलूर, 1998, पृ.क्र. 131.

पुरूषांची समानता मान्य करण्यात आली; पण बाराव्या शतकात स्त्रीच्या भोवती उभारण्यात आलेल्या अशास्त्रीय व अधार्मिक कुंपणे मोडून काढून स्त्रीमुक्तीचा नवा विचार रचनात्मक दृष्टीकोनातून मांडणारे बसवेश्वर काळाच्या कितीतरी पुढे पाहू शकत होते. याबद्दल संशय उरत नाही.[193]

## बालविवाहाला विरोध

अक्कमहादेवी बारा वर्षाची झाल्यावरच ती लग्नाला आली असे वाटून अनेक लोक तिच्या वडिलांना लग्नाचा आग्रह करू लागले होते. पण बसवेश्वरांच्या पुरोगाची विचारांचा प्रभाव तिच्या वडीलांवर असल्याने त्यांनी ती स्वतंत्र विचार करण्याऐवढी मोठी होईपर्यंत तिचे लग्न न करण्याचे ठरविले होते. सोळाव्या वर्षी लग्न झाले तेही जबरदस्तीनेच आणि पती म्हणजे सलणारा काटा वाटल्याने तिने काढून फेकून दिला व सरळ बसवण्णांचे कल्याण गाठले. ही घटना बसव पुराणात विस्तृत स्वरूपात वर्णिलेली आहे. [194] बसवेश्वरांनी तिचे आदराने स्वागत करून अनुभव मंटपात तिला स्थान दिले.

## वेश्यांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न

बसवेश्वरांच्या अनुभव मंडपात 'संकव्वा 'ही पुर्वायुष्यातील वेश्या होती. नंतर बसवादी शिवशरणांच्या पवित्र सहवासात आल्यानंतर तिला उपरती झाली.[195]

अशा प्रकारे बाराव्या शतकात बसवेश्वरांनी व त्यांच्या सहकारी शरणांनी वेश्यांना मार्गदर्शन करून, त्यांचे विवाह घडवून आणून, त्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध करून दिलेले होते. आजच्या भाषेत त्यांचे 'पुनःर्वसन' केले.[196]

---

193. पाठक प्रभाकर पा., चेतना चिंतामणी, श्री बसवेश्वर, प्रथमावृत्ती, सुविध्या प्रकाशन, सोलापूर, ऑक्टोंबर, 2005, पृ.क्र. 122

194. घोडके बालाजी एम. (संपादक), जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती स्मरणिका, 2007, सदाशिव मस्कले, नांदेड, एप्रिल 2007, पृ.क्र.31.

195. 'जे कर्म सोडून नवे व्रत घेतले, हे पूर्ण न करता
पुन्हा जूनेच कर्म करू लागले, तर तापलेल्या सुरीने
कान कापतील माझे, निर्लज्ज्वर.'
**( जयशेट्टी भालचंद्र, वचन, प्रथम आवृत्ती, कर्नाटक साहित्य अकादमी, बेंगलूर, 1998, पृ.क्रं.131.)**

196. पाठक प्रभाकर पा., चेतना चितामणी, श्री.बसवेश्वर, प्रथम आवृत्ती, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, ऑक्टोंबर 2005, पृष्ठ क्र.123.

'बसवेश्वर म्हणजे समष्टी जीवनामध्ये आमुलाग्र बदल घडवून आणणारी युगप्रवर्तक शक्ती होय. त्यांनी नवसमाज निर्माण करण्यासाठी कायक व दासोह यांचा पाया घातला. मानव कुळाला संकटाच्या खाईत लोटणारी जातियता नाहीशी करून सारी मानवजात एक म्हणून घोषणा करणारा उपाय म्हणजे इष्टलिंगत्त्व. बसवेश्वर पुढील हजार वर्षानंतरचे चिंतन करणारे दूरदृष्टीचे दृष्टे होते. ते नेहमी प्रयोगशील राहिले होते. बारावे शतक त्याचे प्रगतीशील विचार पचविण्याइतके पक्व झाले नव्हते. परंत त्यांच्या सखोल चिंतनाचे फळ आजच्या आधुनिक युगात सर्वांना चाखावयास मिळत आहे. जात, कूळ, वर्ण, वर्ग यांचे भूत पळवून लावून साऱ्या मानवजातीला एका धर्मामध्ये मानव धर्मामध्ये, आश्रय देण्यासाठी अहोरात्र राबलेल्या महामानवतावादी बसवेश्वरांना एका जातीपुरते मर्यादित करण्याचा कांही लोकांचा प्रयत्न खरोखर दुर्दैवी म्हटल्याशिवाय राहवत नाही. 'कन्नड विचारवंत टी.आर. महादेवाय्या यांच्या वरील वाक्यावरून बसवेश्वरांची सामाजिक थोरवी किती मोठी होती हे दिसून येते.

## बसवेश्वरांची 'कायकवे कैलास' संकल्पना

बसवेश्वरांनी श्रमाची प्रतिष्ठा वाढविणारी, श्रमाचे महत्त्व प्रतिपादनारी 'कायकवे कैलास' ही सकंल्पना मांडली.[197] श्रमाची प्रतिष्ठा वाढविणारे व प्रतिपादणारे आचार सूत्र ही त्यांच्या दिव्य प्रतिभेतून निघालेली थोर संजिवनीच आहे. प्रत्येक शिवशरणाने आपापले कर्तव्य कायेने, वाचेने व मनाने करावे. कायकाने आचारलेले व्यवसायकार्य म्हणजे 'कायक'. कायकाने म्हणजे कर्मान, कैलास म्हणजे 'मोक्ष' मिळेल असे आश्वासन यात आहे. उद्योगाची, श्रमाची, महंती त्यांनी आपल्या आचरणाने प्रतिपादिली आहे. घोर परिश्रम, कठोर कष्ट, म्हणजेच स्वर्गसुख हे सांगतांना त्यात ते उद्योगशील व्यक्तीला उ़द्योगातील, व्यवसायातील भेदाभेद टाळून प्रत्येक श्रमाचा क्षण हा मोक्षाकडे नेणारा सोपान मानला. कोणताही व्यवसाय हीन नसून श्रमाने त्याला पवित्र, श्रेष्ठत्त्व येते. म्हणून कपडे धुणारा, आपला पिढीजात धंदा करणारा माचय्या त्यांना आपला सखा वाटतो. तर तो धोबी

---

197. Diwakar R.R., Shri. Basavesvara, A commemoration Volume, 1st Edition, Government of Mysore, Bangalore, 1967, Page No. 80.

असल्याचे इतर वेळा मला कळतही नाही असे बसवेश्वर म्हणत. तो कोणत्याही जातीचा असला तरी माझा जीवनात काय फरक पडतो. मला तर त्यांचा स्नेह मिळतो.[198]

श्री बसवेश्वर प्रवृत्तिवादी, इहवादी, होते हेच स्पष्ट होते. धार्मिकतेबरोबर ते प्रपंचाचाही विचार करीत. बसवेश्वरांनी कर्तव्यपूर्तीला अध्यात्मिक महत्त्व दिले.[199] कायक आणि श्रममहात्म्य या संकल्पना एकमेकांशी संबंधित असल्याचे बसवेश्वर मान्य करतात. मानवाची प्रगती ही कायक म्हणजे कार्य या तत्त्वातून झालेली दिसते. आपल्या कार्याबद्दल व्यक्तीत चिकाटी, कार्याबद्दलची निष्ठा, परिश्रम, असे गुण असणे गरजेचे आहे आपण केलेल्या कार्याचे फळ हेच भौतिक स्वरूपातील कैलास म्हणजेच 'स्वर्ग' आहे.[200]

## अनुभव मंडपाची स्थापना

धार्मिक, सामाजिक, आर्थिक, कार्याचे केंद्र म्हणजे अनुभव मंटप. बसवेश्वरांनी अनुभव मंटपाची स्थापना करून खऱ्या अर्थाने आपल्या कार्यास प्रारंभ केला. आधुनिक काळातील लोकनियुक्त संसदेच्या तोडीचे अनुभव मंटप हे व्यासपीठ 12 व्या शतकात वीरशैव समाजात अस्तित्वात होते. वीरशैवाच्या सर्व जिव्हाळयाच्या प्रश्नांची गंभीरपणे चर्चा अनुभव मंटपामध्ये चालू होती.

महात्मा बसवेश्वरांच्या अविस्मरणीय कार्यात शिवानुभव मटपाच्या स्थापनेची विशेष नोंद घ्यावी लागते. 12 व्या शतकात त्यांनी केलेल्या व सामाजिक तसेच धार्मिक क्रांतीची बीजे या मंटपात अंर्तभूत होती. वर्ण, पंथ, हे भेद विसरून सर्व जाती स्त्री, आणि पुरूष एकत्र येवून धार्मिक, नैतिक, अध्यात्मिक तसेच सांस्कृतिक विषयावर या मंटपात चर्चा करीत असत. चर्चेतील निष्कर्ष हे दैनदिंन जीवनात आचरणात आणित असत. मंटपाची

---

198. 'मर्त्यलोक हा निकशामानवा। या भठ्ठित तावून यावा,।
शुध्दाशुध्द परिक्षून घ्यावा। कुडलसंगमदेवा,।।
इथे खरा तो चढतो वरती। न कळी खोटा तया न बढती।
किंमत ठरते या भूवरती। कूडलसंगमदेवा।।' **(बसवेश्वर वचन क्र.34)**

199. मेनकुदळे अशोक गंगाधर, बाराव्या शतकातील आद्य समाज सुधारकः महात्मा बसवेश्वर, प्रथम आवृत्ती, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, फेब्रुवारी 2003, पृ.क्र.13.

200. 'ज्याने आपल्या घामाने ही काळी माती भिजवली
अखंड श्रमाने ज्याने आपला देह राबवला कष्ट उपसले पोटासाठी
ज्याने आपले तन आणि मन श्रमपुर्वक झिजविले
श्रमाची पुजा करून ज्याने शिवाची पुजा केली श्रमिकांच्या झोपडीला जो कैलास मानतो
ज्याची वाणी तशी करणी। हे कुडलसंगमदेवा, तोच जगदगुरू झाला.' **( जयशेट्टी भालचंद्र, वचन, प्रथम आवृत्ती, कर्नाटक साहित्य अकादमी, बेंगलूर, 1998, पृ.क्र.27.)**

सदस्य संख्या सुमारे 300 एवढी होती. त्यात 20 टक्के महिला होत्या.[201] अल्लमप्रभंच्यॎ अध्यक्षतेखाली धर्मनिरपेक्ष अनुभव मंडपात सर्व जातीच्या सदस्यांना सामावून घेतले त्यापैकी मडिवाल माचीदेव– धोबी, मेघार केतरूया–बुरूड, मादर चन्नय्या–मांग, किन्नर बम्मय्या–सोनार, शिवनागमय्या–महार, शंकर दासिमय्या–शिंपी, ढोर कक्कया–ढोर, समगार हरळय्या–चांभार, चन्नबसवेश्वर हा ब्राह्मण तर मनुवाद्यांनी नाकारलेल्या स्त्री स्वातंत्रालया देखील महत्त्व देऊन अक्कामहादेवी सत्यका, गंगाबिका, नागलांबिका, अशा अनेक महिला सदस्यांना देखील महत्त्वाचे स्थान दिले. कित्तुरची राणी चन्नम्मास देखील महत्वाचे स्थान दिले. कित्तुरची राणी चन्नम्मा याच विचाराच्या होत्या.[202] मंडपाचे जवळपास सारेच सदस्य एकाहून एक शरण त्यागी, ज्ञानी, विद्वाने होते. सर्व सभासद स्त्री पुरूष परस्परांना अनुक्रमे 'अक्का' आणि 'अण्णा' या नांवाने संबोधत.

बसवेश्वरांच्या महामनेचा (मोठावाडा) एका भागात सर्व सदस्य एकत्र येत. बसवेश्वरांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या या प्रगत कार्याचे कार्यक्षेत्र त्यांचा वाडाच बनला हे विशेष! वाडयात सदस्यांना वास्तव्यासाठी काही अंतरावर कुटीर, खोल्या, गुहा बनविण्यापत आल्या होत्या. बिदर जिल्हयाच्या बसवकल्याण नगरीच्या आसपास मंडपाचे अवशेष आजही पहावयाला मिळतात.[203]

## अनुभव मंडपाची मार्गदर्शक तत्त्वे

1. सर्व स्त्री पुरूष समान आहेत.
2. कोणतीही व्यक्ती जन्माने, लिंगभेदाने, वर्णभेदाने किंवा व्यवसायाने श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही.
3. पुरूष किंवा स्त्री – पुरूष यात कोणताही भेद नाही.
4. स्त्रियांना पुरूषांसारखीच आपली उन्नती करून घेण्याचा अधिकार आहे.
5. प्रत्येकाने स्वेच्छेने आपल्या व्यवसायाची निवड करावी.
6. स्त्रियांसुद्धा आपल्या आवडीचे अर्थाजर्नाचे कार्य करू शकतात.

---

201. दंडे जयश्री, जगजंपी सुषमा, (अनुवादक) बसव पथ, बसव जयंती विशेषांक, मे 2008, बसव समिती, बेंगलोर, मे 2008 पृ.क्र.8.
202. पाटील भीमराव, करजकर विजयकुमार (संपादक), युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर, प्रथमावृत्ती, ब्रह्माजी भीमराव पाटील, किणी, अहमदपुर, एप्रिल 2006, पृ.क्र. 242.
203. घोडके बालाजी एम. (संपादक), जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती स्मरणिका, 2007, सदाशिव मस्कले, नांदेड, एप्रिल 2007, पृ.क्र.21.

7. सर्वच व्यवसाय प्रतिष्ठेच्या दृष्टीने समान आहेत.

8. जात, वर्ण व आश्रम यांचा त्याग करावा. श्रेष्ठ कनिष्ठता पाळू नये.

9. आपला व्यक्तिविकास आपल्या कायकातून घडवून आणावा.

10. ध्यानधारणेसाठी, लिंगार्चनेसाठी स्वर्गसंग परित्याग करून अज्ञावासात जाण्याची गरज नाही.

11. आंतरजातीय विवाह आणि सर्व जातिवर्णातील समूह भोजनास उत्तेजन देण्यात यावे.

12. अस्पृश्यतेला समाजात कोणतेही स्थान नाही.

13. प्रत्येक मानवाला आध्यात्मिक आणि सामाजिक प्रश्नांबाबत मुक्तचिंतन करण्याची मुभा आहे.

14. अनुभव आणि कारणे हे मार्गदर्शक तत्त्व मुक्त चिंतनासाठी आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी आहे.

15. धार्मिक शिक्षणासाठी ‘लोकभाषा’ हे उत्तम माध्यम आहे.

16. सर्व व्यक्तींना आत्मिक उन्नतीसाठी अध्यात्मिक चर्चेत भाग घेण्याचा सारखाच अधिकार आहे.[204]

अनुभव मंटप हा संघटनेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण प्रयोग होता. अनुभव मंटपात, कोणी ब्राह्मण नाही, कोणी शुद्र नाही. सगळेजण शिवशरण असेच वातावरण त्यांनी तयार केले. त्यामुळे शिवशरण ही एकमेव सुसंघटीत शक्ती उभी करण्यात त्यांनी यश मिळविले सर्व जाती जमातींचे लोक एक झाले. एका अर्थी जातिव्यवस्था खिळखिळी करण्याचे ते यशस्वी प्रयत्न होते. अनुभव मंटपामुळे, एकत्र येवून वैचारिक आदान प्रदान झाले.[205] वातावरण खेळीमेळीचे होवून सर्वजन सुसंघटीत स्वरूपांत उभे राहिले. संकुचित विचारांपासून पुर्णतः दूर होवून प्रत्येकजण एकसंध आणि एकात्म समाज अस्तित्वात आणायला जणू प्रयत्नशील झाला होता. श्री बसवेश्वरांनी संघटनेचा पाया असलेल्या

---

204. पाटील भीमराव, करजकर विजयकुमार (संपादक), युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर, प्रथमावृत्ती, ब्रह्माजी भीमराव पाटील, किणी, अहमदपुर, एप्रिल 2006, पृ.क्र. 243.

205. Hunashal M., Shri.Basavesvara, A Commemoration Volume, 1st Edition, Government of Mysore, Bangalore, 1967, Page No. 488

समतेच्या विचाराला ध्येया पर्यत नेण्यासाठी खूप कष्ट घेतले आपल्या अनुभव मंटपात सर्वांसाठी विचार केला. सवर्ण दलित यांचा समावेश करणारा त्यांचा हा राष्ट्रहिताचा विचाराच राष्ट्रधर्माला पोषक ठरणारा होता. या अनुभव मंडपामुळे समाजातील फुटीरपणावर मात करून सर्वसमावेशकता आणण्यात त्यानी यश मिळविले. आपोआपच एका व्यापक पायावर सर्वसमावेशक अशी संघटना उभी रहावी अशी भूमिका बसवेश्वरांनी आरंभापासूनच घेतली. समता व न्याय यावर आधारित ही समाजरचना अस्तित्त्वात आणण्याचा अभिनिवेश त्यांच्यात नाही. स्वाभाविकपणे, सहजतेने सर्व गोष्टी घडाव्यात असे त्यांना वाटे व तसे झालेही.

## कल्याण क्रांती

भारताच्या इतिहासामध्ये आजपर्यंत अनेक धार्मिक, सामाजिक, आणि राजकीय क्रांत्या झाल्या. बाराव्या शतकात कर्नाटकातील कल्याण येथे झालेली क्रांती ही एक अनोखी, अजोड व सर्वकक्ष क्रांती होती. या क्रांतीने धार्मिक, सामाजिक, नैतिक, आर्थिक व राजकीय अशा सर्व बाबतीत अमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. यामुळे भारतातीच नव्हे तर जगातील या एक महत्त्वपूर्ण सामाजिक क्रांती म्हणून या क्रांतीकडे पाहिले पाहिजे.

12व्या शतकात कर्नाटकात, जातिव्यवस्था, अस्पृश्यता मोठया प्रमाणावर अस्तित्त्वात होती. धर्माच्या नांवावर समाजाचे शोषण सुरू होते. जातीवरून मनुष्याचे श्रेष्ठत्त्व तसेच कनिष्ठत्त्व मानले जात होते. स्त्रियांना कुठलाही अधिकार नव्हता. अशा परिस्थितीत कर्नाटकात बाराव्या शतकात बसवेश्वररूपी क्रांतिकारकाचा उदय झाला.

समाजमान्य नैतिक व्यवसाय, नोकरी किंवा शेती प्रत्येकाने करावी. सर्वच व्यवसाय समान, पवित्र आहे. व्यवसायात श्रेष्ठ–कनिष्ठ असे वर्गीकरण करण्यात येवू नये. दुर्देवाने यातूनच जातींची निर्मीती झाली आहे. दुसऱ्यांचे शोषण करण्याच्या प्रवृत्तीचा, दुसऱ्यांच्या श्रमावर जगण्याच्या प्रवृत्तीचा बसवेश्वरांनी धिक्कार केलेला आहे. भिक्षावृत्ती तशी त्याज्यच, अतिरिक्त कमाविलेल्या धनाचा उपयोग समाजातील गरजू, लुळया, पांगळया, शोषीत पिडीतांसाठी करण्यात यावा हाच दासोह होय.

बळी प्रथा, होम हवन, प्राणीहिंसा, संन्यास प्रवृत्ती देहाला कष्टविणारे जप–तप, अनुष्ठाने, मंत्र–तंत्र या गोष्टींना ही बसवेश्वरांनी टीकाविषय बनविलेले होते. वरील समता

विचारांचा प्रसार, प्रचार करतात, लिंगदीक्षा देण्यासाठी संत फिरणारे चरंती निस्पृह उपासक वा प्रचारक म्हणजेच 'जंगम' होत. अशा निरलस समतेचे प्रचाकार्य करणाऱ्या जंगमांना व स्वामींना सर्वांनी उदार हस्ते सर्वतोपरी मदत करावी. आश्रय द्यावा असे आवाहन व सक्रिय प्रोत्साहन बसवेश्वरांनी दिलेला होता.

बसवेश्वर समाजातील सर्व जातीं धर्माच्या लोकांना भेटायला जात. एकत्रित राहणे, खाणे, पिणे, अशा बाबीबद्दल बसवेश्वरांना वावगे वाटत नसे. हा त्यांच्या मानवतावादी धोरणाचा नैमित्तीक परिपाठ असे बसवेश्वरांच्या विचाराने, कृतीने व आचरणाने अत्यंत प्रभावित होवून 'नागीदेव कांबळे' या अस्पृश्याने अनेक देवतोपासना त्यागून बसवेश्वरांच्या वीरशैव चळवळीत सामील झाला. एकदा त्याने बसवेश्वर व अनुभव मंटपातील सर्व सदस्यांना जेवणासाठी आमंत्रित केले. त्यांचे आमंत्रण बसवेश्वरांनी स्वीकारले हे पाहून कर्मठांना बसवेश्वरांचा राग आला.

बसवेश्वर बहुजन समाजात त्यांच्या कार्यामुळे लोकप्रिय बनले. बसवेश्वरांचे अस्पृष्य उध्दाराचे कार्य व त्यांच्या  लोकप्रियतेबद्धल राजा बिज्जलच्या दरबारातील सनातनी व कर्मठ  मंत्र्यांच्या मनात मत्सर निर्माण झाला. बसवेश्वरांनी आपल्या प्रामाणिक कार्यामुळे करणीक पदापासून ते महामंत्री पदापर्यंत पोहचल्यामुळे काही जेष्ठ मंत्राचा अहंकारही दुखवला गेला. बिज्जळाच्या जवळच्या वर्तुळतात वावरणाऱ्या स्तुतिपाठक व धर्मरक्षकांचा खोटा आव आणाणाऱ्या सनातनी लोकांची नावे बाराव्या शतकातील हरिहर कवीने अशी दिली आहेत. (बसवराज, देवतरगळे कन्नड चरित्र, ग्रंथ) नारायण भट्ट, (बिज्जळाच राजगुरू), अशी ही अठरा लोकांची नावे दिलेली आहेत. हे बहुतेक वेदाध्ययनी कर्मठ ब्राह्मण होते काहीजण दरबारात अधिकारी व मंत्री होते.[206]

दरबारातील वरील सनातन्यांनी बिज्जळाकडे बसवेश्वराविंरूध्द तक्रार केली. एका बाजुला बसवेश्वरांच्या सामाजिक कार्यामुळे त्यांची बहूजन समाजात लोकप्रियता वाढत होती तर दुसऱ्या बाजुला त्यांचे विरोधक एक होवून बसवेश्वरांच्या विरोधात बिज्जलाचे कान फुंकत होते. बसवेश्वरांसाठी सर्व समाज सर्व जाती समान होत्या. ते आपल्या शरणांच्या भेटी गाठी घेत फिरत. त्यांना महार, मांग, ब्राह्मण, चांभार अशा जाती माहित

---

206. Wadiyae Jayaobamaraja, Shri.Basavesvara, A Commemoration Volume, 1st Edition, Government of Mysore, Bangalore, 1967, Page No. 20

नव्हत्या. त्यांना फक्त माहित होते तो फक्त मानव धर्म, आणि हेच हेतू डोळयासमोर ठेवून त्यांनी अनुभव मंटपाचे दोन सदस्य हरळया व मधुवरम यांच्या मुलांचा विवाह झाला. हा विवाह मुलगा व मुलगी दोघांच्या सम्मतीने झाला. जन्माने चांभार असलेल्या हरळयाचा मुलगा शीलवंत व जन्माने ब्राह्मण असलेल्या मुधवरसची कन्या कलावती. जन्माने मिळालेल्या जाती सोडल्या तर रूप, गुण, विद्या व स्वभाव या दृष्टीने एमेकांना अनुरूप होते. मधुवरय हरळयाच्या शुद्ध व पवित्र आचरणाने भारावून गेला होता. त्याला हरळयाशी नातेसंबंध जुळून यावेत असे मनापासून वाटत होते. म्हणून मंत्री असलेल्या मधुरसाने आपली मुलगी हरळयाच्या मुलाला द्यावी अशी इच्छा व्यक्त केली. जन्माचेही कांही संस्कार असतात. त्याचा परिणाम हळ्यावर होता तो संकोची वृत्तीचा होता. पण अनुभव मंटपातील बसवेश्वरासंह अनेक शिवशरणांनी, शिवशरण मधुवरस, यांची इच्छा पूर्ण व्हावी असाच विचार मांडला. बसवेश्वरांचे म्हणणे दोन्ही लिंगायत तत्त्वाची असल्याने, त्यांच्या पुर्वाश्रमीच्या जातींचा विचार करण्याचे मुळीच कारण नाही. जाती पातीचे बंधन मानण्याची गरज नाही. त्यामुळे शीलवंत आणि कलावती याचा शिवशरण कुटूंबातील मुलांचे लग्न होण्यास हरकत नाही. चूक तर मूळीच नाही. श्री बसवेश्वरांची ही आज्ञाच आहे हे प्रमाण मानून हरळया व त्याची पत्नी कल्याणी मुलगा शिलवतांच्या लग्नाला तयार झाले. येणाऱ्या संकटला तोंड देण्याची तयारी देखील त्यांनी केली. श्री बसवेश्वरांनी प्रस्थापित केलेली तत्त्वे पाळायचा निश्चय केला. त्यांच्या या धाडसी निर्णयाने शिवशरणात नवचैतन्य सळसळू लागले आणि हरळ्यापुत्र व मधुवत्साची कन्या यांचा विवाह अनेक शरण शरणींच्या उपस्थितीत अनुभव मंटपाच्या सभागृहात मोठया थाटात पार पडला. या आंतरजातीय विवाहाची बातमी वाऱ्यासारखी कल्याण नगरीत पसरली. उच्चवर्णीयांच्या गटात जळफळाट झाला. अनेक कर्मठांनी चक्क राजाचा महाल गाठला व झालेली घटना सांगून न थांबता शिवशरणांकडे कानाडोळा केला तर महाराजांचे राजा बिज्जळ आसनही धोक्यात यायला वेळ लागणार नाही. त्यांच्यावर व विशेषतः त्यांचे नेते बसवेश्वरांवर कार्यवाही झाली नाही. तर आपला समाज उध्दवस्त होईल. वर्णसंकट काढेल. राजाने सावध व्हावे. असे इशारे देण्यात आले. बीज्जलाला बसवेश्वरांचे कर्तृत्त्व माहित होते. पण या घटनेने तोही बिथरला. त्याने प्रथम बसवेश्वरांनाच याचे स्पष्टीकरण विचारले. लिंगदीक्षा घेतल्यावर दोघेंही हरळ्या व मधुवरस एकाच धर्माचे झाले होते. तर दोघेही लिंगायत असतील तर त्यांच्या मुलांचा विवाह हा

विलोम पध्दतीचा किंवा आंतरजातीय विवाह नव्हे. हा जातीचा विवाह होय असे बसवेश्वरांनी सांगितले व तेथे उपस्थित शेकडो शिवशरणांनी त्यांना पाठींबा दिला पण कारस्थानी, बसवेश्वर द्वेष्टे मंत्री या कर्मठ सनातनी लोकांनी राज्यात आधीच गोंधळ उडवून दिला होता. त्यांनी राजाला बिज्जळाचे मत परिवर्तन करून बसवेश्वरांच्या विरूद्ध उभे केले. बिज्जळाला वाटू लागले कि आपले राज्य बसवेश्वर शरणांच्या सहायानेच मिळवेल. मुळात कळचुर्यवशी बिज्जलाने चालुक्य राजा चालुक्य तैलप तृतीय (बीज्जळाचा मामे भाऊ) धोका देवून सत्तेवर आला होता. हे तत्कालीन पुराव्यावरून सिद्ध होते.[207]

आर.सी. हिरेमठ यांनी पालकुरकी सोमनाथाच्या तेलगू भाषेतील बसवपुराण ग्रंथाच्या आधारे 'श्री बसवेश्वर' या ग्रंथात आंतरजातीय विवाहाप्रसंगी घडलेल्या घटनेचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. बिज्जलाच्या दरबारातील मांचण्णा व नारायण या वर्णाश्रम व जातिव्यवस्थेचे पुरस्कर्त्या मंत्रांच्या सांगण्यावरून हा आंतरजातीय विवाह थांबविण्यास बिज्जलाने सांगितले पण यास बसवेश्वरांनी नकार देवून महामंत्री पदाचा राजीनामा दिला.[208] मधूवारस हरळयाचा यांचे बलिदान म्हणजे भारतीाल जातिव्यवस्था मोडून काढणाऱ्या बाराव्या शतकात होणाऱ्या आंदोलनातील बलिदान होय.[209]

कल्याण मध्ये या घटना घडत असतांना बसवेश्वरांचे मन उदास झाले. त्यांनी कल्याण त्यागण्याचा निर्णय घेतला. त्यांनी कल्याण सोडून आपल्या गुरूकडे कुडलसंगम येथे आले.त्याचे चित्त थाऱ्यावर नव्हते. त्यांना शांतता हवी होती.त्यांना वाटू लागले. आपले जिवत कार्य पूर्ण झाले आपण चालविलेल्या संघर्ष आपले सहकारी पुढे चालवतील असे त्यांना वाटू लागले. निलोचना ही त्यांची पत्नी त्यांच्यासोबत नव्हती ती कल्याण येथे होती. या मागची कारणे मात्र समजू शकत नाही. बसवेश्वरांनी तुंगभद्रेत उडी घेतली. व आपली जीवनयात्रा संपविली.[210] बसवेश्वरांचा सहाकरी माचय्या म्हणल्याप्रमाणे तो तेजोमय होवून

---

207. Hiremath R.C., Shri.Basavesvara, A Commemoration Volume, 1st Edition, Government of Mysore, Bangalore, 1967, Page No. 28

208. हे सगळे घडून आल्यानंतरही राजा बिज्जल स्वस्थ न बसता त्यांनी मधुवरस व हरळया या वधूवनर पित्यांना शिक्षा फर्माविली. प्रथम दोघांचेही डोळे काढण्याचा अमानुश हुकूम दिला एवढे होवूनही बिज्जलाचे मन समाधान झाले नाही. या दोघांनाही पकडून एळेहोटे शिक्षा दिली. एळेहोटे शिक्षा म्हणजे या दोंघानाही हत्तीच्या पायी बांधून फरफरत मृत्यू होईपर्यंत ओढण्याची शिक्षा.

209. मेनकुदळे अशोक गंगाधर, बाराव्या शतकातील आद्य समाज सुधारकः महात्मा बसवेश्वर, प्रथम आवृत्ती, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, फेब्रुवारी 2003, पृ. क्र.44.

210. 'तत्कालिन वीरशैव साहित्यात या घटनेस ''लिंगैक्य'' असा शब्द वापरलेला दिसते.'

'शुन्यात' विलीन झाला.[211] त्यांच्या मृत्यूची वार्ता कळल्यावर निललोचनेने शोक केला आणि म्हटले, की ते आता देहहीन अस्ती झाले आहे. आणि ती शुद्‌ध बसवांच्या मागोमाग गेली. शरण लोकांनी कल्याण नगराची तुलना बसवेश्वरांच्या भक्तिरूपी तेलाने प्रज्ज्वलित केलेल्या दिव्याशी केली. ते म्हणाले की, 'या दिव्याने असंख्य लोकांना प्रकाश दिला. फुटला होता, तेल सांडले होते परंतु दिव्याचा प्रकाश आता दैवी तेजात विलीन झाला होता.'[212]

इकडे कल्याण मध्ये एकच गोंधळ सुरू झाला. बिज्जलाने केलेली निष्पाप शरणांची हत्या, शरणांचे पुढारी बसवेश्वरांचा राजत्याग, व कल्याणत्याग, राजा सोविदेवाच्या' सैनिकांची वचन वाडमयाची चालविलेली होळी, राज्यातील शरण शरणींचा चालविलेला अमानूष छळ यामुळे बसवेश्वरांच्या अनुयायात संतापाची प्रचंड लाट निर्माण झाली होती. सुडाचा, क्रोधाचा विस्तव सूप्तपणे धुमसत होता. धगधगत होता. राज्यातील लिंगायताची आणि गणाचारी वृत्तीच्या शरणांची मनःस्थिती प्रक्षुब्ध होती. अभिनिवेशी कडव्या बसववाद्यांचे गट सुप्तपणे गावोगावी वाढतच होते. अशाच एका उसळत्या स्वतःच्या प्रक्षुब्ध गटाचा प्रमुख होता. जगदेव, त्यांचे जीवाला जीव देणारे दोन सहकारी होते. मोलय्या व बोमय्या.

डॉ.अशोक गंगाधर मेनकुदळेंनी आपल्या 'बाराव्या शतकातील आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर' या ग्रंथात बसव अनुयायी जगदेवाकडून कलचुरी राजा बिज्जलाच्या हत्येचे वर्णन पुढीलप्रमाणे केलेले आहे. 'एका मध्यरात्री तळपत्या तलवारी घेवून जगदेव सहकाऱ्यासोंबत झपाझप राजवाडयाच्या पायऱ्या चढून गेले. डोळयात व डोक्यात सुडाचे प्रचंड थैमान होते. त्यांच्या दृष्टिसमोर हत्तीच्या पायांना बांधून फरफटत ओढल्या जाणारे निष्पाप हरळया व मधूवारस फक्त दिसत होते. पहाऱ्यावरील सैनिकांना क्षणार्धात लोळवून डोळयाची पापणी लवते ना लवते एवढया वेळात त्यांनी अतःपुरात झोपलेल्या शरणांचा कर्दनकाळ ठरलेल्या बिज्जळाचे शिर एका घावात धडावेगळे केला. या आकस्मिक व नाटयमय घटनेमुळे तमाम बसवानुयायी शिवशरणांनी बिज्जळाचे मारेकरी ठरवून कल्याण

211. 'वीरशैव तत्त्वानुसार ईश्वर रूपवान (आकार) व रूपविहीन असा दोन्ही असतो. त्याचे वर्णन नेहमी 'शून्य' असे करतात, ज्याचेच दुसरे नाव 'पूर्ण' आहे.'

212. मुर्ती एम.चिदानंद, किंबहुने रविंद्र, अनुवादक, श्री.बसवेश्वर सुधारीत आवृत्ती, 2004, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नई दिल्ली, 2004, पृ. क्र.68.

राज्यात राजा सोविदेवाच्या सैनिकाचा हैदौस व हिंसाचार सुरू झाला. या कल्याण क्रांतीतूनच रक्तपाताला व सूडसत्राला आरंभ झाला.'[213]

बिज्जळाच मृत्यू विवादास्पद होता. 'देव कुठल्यातरी धर्माची गुरूकिल्ली ही आहे'. असे म्हणणाऱ्या बसवेश्वरांनी बिज्जळाच्या हत्येला मान्यता दिली असणे शक्य नाही असेही एक मत आहे. कोणी असेही म्हणतात की, बसवांच्या विनंत्या व आर्जवे धुडकावून बिज्जळाचा वध करण्यात आला. बसवाच्या या घडोमोडींशी कसलाच संबंध नव्हता असे मानणारेही बरेच लोक आहेत. त्यांच्या मते या हत्येमागे निखळ राजकीय हेतू होते आणखी कोण्याही वीरशैवाने हा वध केला नव्हता.[214] चालुक्य राजकुमार व त्यांचे मांडलिक हा गोंधळ सुरू झाल्यावर गूप्तवेशात कल्याण नगरीत येवून राहिले होते. चालुक्यांच्या राजाचे अपहरण करण्याऱ्या कलचुरी राजा बिज्जळाचा त्यांना सूड घ्यावयाचा होता. तो त्यांनी राजाला मारून घेतला. शिवशरणांनी त्याला मारले नाही.[215] या बाबत डॉ.मेनकुदळे म्हणतात, 'बिज्जळाचा खून हा बसवेश्वरांच्या सामाजिक समतेच्या चळवळीला केलेल्या विरोधाची प्रतिक्रिया होती. कल्याणच्या सिंहासनाच्या प्राप्तीसाठी नातेवाईक व इतर महत्त्वाकांक्षी मंत्री यांच्या कटाचा तो भाग नव्हता. बिज्जळाने भिन्न जातीत विवाह घडवून आणणाऱ्यांची निर्घृण हत्या केली होती. दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला होता. या क्रूर व निर्दयी हत्येचा निषेध म्हणून धर्मांध सनातनी राजसत्तेला मानवी हक्काच्या संरक्षकांनी दिलेले ते चोख प्रत्युत्तर होते.'

## कल्याण क्रांतीची व्याप्ती

बिज्जलाच्या वधानंतर राज्यात अधिकच अंदाधूंदी व अस्थैर्यता माजली. जिकडे–तिकडे यादवीचा वणवा पेटला यात हजारो वीरशैव लिंगायताचा बळी गेला. घरेदारे

---

213. मेनकुदळे अशोक गंगाधर, बाराव्या शतकातील आद्य समाज सुधारकः महात्मा बसवेश्वर, प्रथम आवृत्ती, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, फेब्रुवारी 2003, पृष्ठ क्र.53.

214. मुर्ती एम.चिदानंद, किंबहुने रविंद्र, अनुवादक, श्री.बसवेश्वर सुधारीत आवृत्ती, 2004, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नई दिल्ली, 2004, पृ. क्र.70.

215. पाठक प्रभाकर पा., चेतना चितामणी, श्री.बसवेश्वर, प्रथम आवृत्ती, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, ऑक्टोंबर 2005, पृ. क्र.44.

राजसैनिकांकडून जाळली गेली. अशा परिस्थतीत वचन साहित्याच्या सुरक्षेसाठी अनुभव मंडपाचे अल्लमप्रभू, अक्कामहादेवी, श्रीशैल, पर्वताकडे गेले. चन्नबसवेश्वरांसह अक्का नागलांबिका, गंगाबिका, गंगाबिका, मडिवाळ माचया, अंबियार चौडया, ढोर कक्कया, मांग चन्नया, इ. शरणांनी गणाचारी वृत्तीने विरोध करून गोव्याच्या पूर्वेकडील सहयाद्रीच्या निबिड वनातील उळवी (जि.कारवाड), क्षेत्राकडे लपत छपत त्यांच्या सोबत अमुल्य असे वचन साहित्य होते वाटते बऱ्याच ठिकाणी बिज्जळाच्या सैन्यासोबत युद्‌ध झाली.

कल्याणमधून उळवीकडे जात असतांना सोलापूर येथील गणाचारी दलास सोलापूरचे सिद्‌धरामेश्वर व चामलादेवी राणीने मदत केली. या दलाचे नेतृत्त्व शुरविर माडियाळ माचय्या चिन्मयज्ञानी, चन्नबसवेश्वर व अक्कानागम्म, गंगाबिका व शरण डोहार कक्कया करीत होते. सोलापूरहून पूढे गेल्यावर बिज्जल सैन्याने शरणांचा पाठलाग सुरू केला.बिज्जल सैन्यास हुलकावणी देवून शरण कडकोळ, सुत्तीगेतर, सांगल, मुरगोकडे प्रयाण केले. मुरगोड ता.बैलहोंगल जि.बेळगांव, येथे प्रथम युद्‌ध झाले. या युध्दात शुरविर मडिवाळ मावय्या ठार झाला. शरणांनी त्यांचा कारीजने येथे अंतिम संस्कार केला. पुढे त्या ठिकाणी मडिवाळांची शरणीन समाधी बांधली. पुन्हा शरण व बिज्जल सैन्याची कादरोळी येथे भेट होवून दुसरे युध्द झाले. कल्याणम्म व बसव पत्नी गंगाबिका बिज्जल सैन्याशी लढत होत्या. या युध्दात गंगाबिका व कल्याणम्म जखमी झाल्या त्यांची प्राणज्योत मालवली. शरणांनी कल्याणम्माचा अंत्यसंस्कार रूद्रमुनींच्या हस्ते तिगडी गावी केला. आज तिगडी येथे कल्याणम्म समाधीस्थळ आहे. गंगाबिकामातेचा अंतिम संस्कार मलप्रभा नदीकाठी एम.के. हुबळी येथे करण्यात आल. त्यानंतर शरण कक्कयांना वीरमरण पत्करावे लागले. ते ज्या स्थळी लिंगैक्य झाले. तेथे आज कक्केरी नावाचे गाव आहे. पुढे बसवेश्वरांच्या शरणांना दानाम्म राणीने मदत केली. दानम्माने शरणांना घोडे, शस्त्रे, सैन्ये देवून त्यांना उळवीस पाठविण्यास सर्वोतोपरी सहकार्य केले. अशा संकटांना तोड देत बसवेश्वरोचे अनुयाची उळवी या इच्छीत स्थळापर्यंत येवून पोहोचले. बिज्जलाचा जावाई रायमुरासीस शरणांनी पकडले परंतु अक्कनागम्माच्या आदेशानुसार त्यास जीवदान देण्यात आले. उळवी या गोव्याचे कदंब राजे पेमीडी यांनी आश्रय दिला.[216]

216. पाटील भीमराव, उळवी क्षेत्र, प्रथम आवृत्ती, शरण साहित्य मंडळ, लातूर, मे 2008, पृ.क्र.4.

बसवेश्वर एक प्रेषित होते. सगळयाच प्रेषितांप्रमाणे त्यांच्यात कांही वैगुण्ये होते. पुर्णत्त्व प्राप्त होण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न आणि संघर्ष केले यातून ते जन्मतःच सिध्द नव्हते हेच स्पष्ट होते. त्यांनी व्यक्त केलेल्या आणि आचारलेल्या सर्वच गोष्टी आपल्याला पटतील असे नाही. त्यांची वचने आणि आचार त्यांच्या काळाच्या संदर्भात तपासून पाहिल्यावरच अर्थवाही ठरतील. त्यांच्या वैगुण्यामुळेच खरे तर बसवाची मानवता झळाळून उठते आणि ते आपल्याला प्रिय वाटतात.

सध्याचा वीरशैव समाज बसवेश्वरांचा आदर्श स्वप्नातील समाज नसेलही कदाचित. पण कुठल्या प्रेषिताची स्वप्ने त्यांच्या धर्माने आणि समाजाने पूर्ण केली आहेत? पण बसवेश्वरांच्या शिकवणूकीचा वस्तुनिष्ठ अभ्यास केला तर त्यांच्या विचारांची आजही आवश्यकता असल्याचे जाणवते. त्यांचा प्रेमाचा संदेश, सत्याचा आग्रह, दयाशीलता आणि माणसामाणसातील समानतेचे तत्त्व, कार्याविषयीचा सर्व समाजाला बंधनकारक केलेला आग्रह, त्यांची समाजवादी दृष्टी, त्यांचे गरिबांवरचे प्रेम आणि पद्दलितांविषयीची कणव केवळ भूतकाळातील माणसाची शिकवण म्हणून टाळता येणार नाही.

## 12 व्या शतकातील वीरशैव साहित्य – ऐतिहासिक साधन

अनेक वीरशैव साहित्यामध्ये वीरशैव संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाबद्धलची माहिती मिळते. जीव व शिवाचे ऐक्य स्थान, ज्ञान परमात्मा, परमविश्वास जाणण्याचे अत्यंत सोपे व स्पष्ट ज्ञान आहे. षटस्थल आत्मा व परमात्मा संबंधिचा एक ज्ञान सांगणारा षटस्थल ज्ञान ईश्वरापासून म्हणजे शिवापासूनच मानवास प्राप्त झाल्याचे सांगितले जाते.

जीव व शिवाचे ज्ञान सर्वप्रथम शिवाने पार्वतीस सांगितले तेच षटस्थल सर्वप्रथम आगम शास्त्रात आहे. वीरशैव लिंगायताचे हे षटस्थल ज्ञान प्राचीन समजले जाते. षटस्थल ज्ञान हे वीरशैवांचे धर्मतत्त्व समजले जाते हे ज्ञान तत्त्व, संस्कृत व कन्नड साहित्यात आढळते.

श्री सिद्धांत शिखामणी ग्रंथात वीरशैवांचे तत्त्वज्ञान व्यवस्थित व क्रंमवार दिसून येते. हा ग्रंथ संस्कृत भाषेत असून वेदतत्त्वज्ञानाच्या जवळ जाणारा दिसतो. या ग्रंथात रेणुकाचार्य आगस्त ऋषी यांच्यातील संवाद आहेत. यास 'रेणुकगीत' असेही म्हणतात. मुळ

शंकराने पार्वतीस सांगीतलेले ज्ञान आगम ग्रंथात असून तेच ज्ञान जगदगुरू रेणकाचार्यांनी आगस्त ऋषींना उपदेश केलेला आहे. हा संवाद श्रीसिद्धांत शिखामणि होय.[217]

शिवसंप्रदायात प्रसिध्द असलेले सर्व शिवगणाचे, अधिपती, रेणुकाचार्यांनी तेच पुन्हा पृथ्वीवर अगस्ती ऋषीला सांगितले आहे. रेणुकाचार्यांनी अगस्ती मुनीला सांगितलेले पिण्डस्यलापासून वीरशैव अनुग्रहाय लोकानामभ्यधात सुधियांवर.1.1–3 ज्ञानशुन्यस्थालापर्यंत असलेल्या एकशे एक स्थलांत वर्णीलेले वीरशैव, महातंत्र, पंडीतगृणी अशा शिवयोगी शिवाचार्यांनी वीरशैवावर अनुग्रह करण्यासाठी सांगितले आहे.[218] वीरशैव तत्त्वज्ञानाचा गाभा म्हणून या सिद्धांत शिखामणि ग्रंथाकडे पाहिले जाते.

## वचन साहित्य

आगम, सिद्धांत शिखामणि या संस्कृत ग्रंथाशिवाय बसवेश्वर कालीन कांही वचनकारांनी निर्माण केलेल्या वचन साहित्यांमध्येही वीरशैवाच्या तत्त्वज्ञानाबद्धलची माहिती मिळते.

वचन साहित्याची निर्मिती लोकभाषेतून करण्यात आली आहे. वचनसाहित्य हे एक लोकसाहित्य आहे. तत्कालीन समाजातील बहुजनांनी आपल्या बोलीभाषेतून व्यवहारिक साधी सोपी उदाहरणे देवून वचनांव्दारे वीरशैवपंथाचे तत्त्वज्ञान स्पष्ट केलेले दिसते. वचन साहित्याच्या माध्यामातून विपूल साहित्य निर्माण झाले. वीरशैव संप्रदायाच्या विकासात व प्रसारात वचनकारांचे मोठे योगदान असलेले दिसून येते.

शंकरदासीमया, एकांतराया, याशिवाय स्वतः बसवेश्वरांनी अनेक वचनांची निर्मिती केली. अनूभव मंटपाच्या माध्यमातून जवळ जवळ 770 शिवशरणांनी वचनांची निर्मिती केली. या स्त्रियांचा सहभाग महत्त्वाचा होता. या ठिकाणी देशभरातून आलेले लोक अनुभव मंटपाचे सभासद होते. बसवेश्वरांसोबत असलले त्यांचे प्रमुख सहाकारी अल्लमप्रभू, चन्नबसवेश्वर, सोलापूरचे सिद्धरामेश्वर, अक्कमहादेवी, अक्कनागम्मा, निलांबिका, गंगाबींका, मडीवाळ माचीदेव, अशा अनेकांनी हजारोंच्या संख्येने वचनांची निर्मिती केली.

---

217. 'तत्सम्प्रदायसिध्देन रेणकुन महात्मन।
गणश्वरेण कथितमगस्यत्याय, पुःक्षितौ'। श्री.सि.शिः 1–29।।

218. Kalajate B.M., Diwakar, Shri.Basavesvara, A Commemoration Volume, 1st Edition, Government of Mysore, Bangalore, 1967, Page No. 172-

आज दुर्दैवाने अनेक वचन नष्ट झालेली आहेत.[219] बसवेश्वरांच्या नंतर म्हणजेच 13 शतकानंतर वीरशैव साहित्यात मोठी प्रगती झाल्याचे दिसते.[220]

## बसवपुराण

तेलंगणातील पालकुरकी सोमनाथ यांनी तेलगूमध्ये बसवपुराण हा ग्रंथ लिहिला. यात बसवेश्वर व त्यांच्या समकालीन शिवशरणांचे चरित्र आहे. त्यानंतर शंकराचार्य यांनी संस्कृत मध्ये बसवपुराणांचे भाषांतर केले. पुढे शिवदास महाराजांनी मराठीत बसव पुराणांची निर्मिती केली.[221] या वीरशैव साहित्यातून वीरशैव तत्त्वज्ञानाबध्दलची माहिती प्राप्त होते.

## आगम ग्रंथ

बौद्ध, वैष्णव, शैव, धर्मपंथाचे तत्त्वज्ञान आपणास आगमात भेटते. वेगवेगळया धर्माच्या वेगवेगळया पंथाचे आगम वेगवेगळी असून त्यांचा उत्पत्तीकाळ निश्चितपणे सांगता येत नाही. वैदिक आणि अवैदिक धर्म ग्रंथातून आगमांची निर्मिती झालेली आहे. कांही प्राचीन साहित्यात आगमांना अपौरूषेय समजलेले आहे. आगमांची निर्मिती शंकराच्या मुखातून झाली. ती अठ्ठाविस प्रकारची होती. ती प्रथम पार्वतीस व नंतर इतरांना समजली असेही सांगितले जाते.

साधारणः आगमाचे प्रकार दोन सांगितली जाते. पहिला वैदिक आगम आणि दुसरा अवैदिक आगम, वेद, इतिहास, पुराण व तंत्र हे वैदिक आगम पण बौद्ध सारखे आगम 'अवैदिक' म्हणून ओळखले जातात. काही ठिकाणी अवैदिक वाङ्मयास आगम व वैदिक वाङ्मयास निगम म्हणतात. वेदांना निगम आणि तंत्राना आगम हे नांव आहे. आगमाचे

---

219. वंड्डे गुरूनाथ, वीरशैव धर्म परिचय, प्रथम आवृत्ती, शकुंतला प्रकाशन, उदगीर जि.लातूर, मार्च 2002, पृ. क्र.54.

220. म. बसवेश्वरानंतर जवळपास शंभर वर्षानंतर म्हणजेच तेराव्या शतकाच्या सुरूवातीला मराठीमध्ये कांही विरशैवांनी वीरशैव साहित्याची निर्मिती केली. या लोकांनी बसवेश्वर व त्याच्या शरणांची परंपरा पुढे चालू ठेवली. विसोबा खेचर, जे तेराव्या शतकाच्या सुरूवातील होवून गेले त्याना मराठी वीरशैव साहित्यातील पहिले संत असे म्हणले जाते. त्यांचे षटस्थल हे ग्रंथ मराठीतील वीरशैव पंथचे षटस्थलासंबंधीचे पहिले ग्रंथ म्हणून ओळखले जाते.' विसोबा खेचर हे औंढा नागनाथचे रहिवाशी तेथेच हे संत श्रेष्ठ नामदेवांना 'शिवजीऐक्य तत्त्वज्ञानाचा 'उपदेश विसोबा खेचरांनी केला. विसोबा खेचरांच्या साहित्यातुनही वीरशैवांच्या तत्त्वज्ञानाबध्दलची माहिती मिळते.
16 व्या शतकात जन्मलेले इ.स. 1560 मन्मथस्वामी (जन्मस्थळ नेकनूर जि.बीड), हे ही मराठीतील वीरशैव साहित्यिक त्यांनीही आपल्या ग्रंथामधून वीरशैव तत्त्वज्ञानाचा प्रसार मराठी भाषिकांमध्ये केले. त्यांनी 'ग्रंथराज श्रीपरमरहस्य', लिंगेश्वर या ग्रंथाची निर्मिती केली.

221. वंड्डे गुरूनाथ, वीरशैव धर्म परिचय, प्रथम आवृत्ती, शकुंतला प्रकाशन, उदगीर जि.लातूर, मार्च 2002, पृ. क्र.66.

शैव, शाक्त व वैष्णव हे तीन भेद आणि शैवगमाचे कापालिक, कालामुख, पाशुपत, व शैव असे चार प्रकार सांगीतले. शैव या प्रकारचे काश्मिर व शैव सिद्धांत असे दोन पोटभेद. महामहापाध्याय मिराशी हे शैवसिंद्धात, कालामुख, पाशुपत व कापालिक अशा चार शैव शाखा मानतात. श्री बलदेव उपाध्याय पाशूपत शैव, कालामुख कापालिकाच्या तीन उपप्रकारात माहेश्वर संप्रदाय संबोधतात. आणि शैव सिद्धांत तामिळ, वीरशैव कर्नाटकात, प्रत्याभिज्ञा काश्मिर आणि पाशुपत राजपुतांना असा प्रसारीत झाल्याचे सांगितले जाते.

वीरशैव पंथात आगामांना प्रमाण मानले जाते. या पंथातील संकेतिक कार्य सूचविणाऱ्या मूर्तीचा आणि पंचमुखांचा उल्लेख भारतीय संस्कृतीकोशात आलेला आहे. ही पंचमुखे वीरशैवांच्या पंचाचार्याच्या नांवाने विषद केलेली दिसतात.[222] वीरशैवांशी संबंधित असणाऱ्या आगमांमधून वीरशैव तत्त्वज्ञान, आचार, धर्माबाबतची माहिती मिळते.

## सिद्धरामेश्वर व त्यांचा स्वतंत्र वैचारिक प्रवाह

12 व्या शतकात वीरशैव लिंगायत धर्मपंथाचे निर्माते व प्रवर्तक महात्मा बसवेश्वरांच्या मुख्य अनुयायांपैकी सोन्नलिंगे (चालुक्य कालिण सोलापूर) येथील सिध्दरामेश्वर (पूर्वाश्रमीचे–धुळीमहांकाळ) यांचे चरित्र व विचार पहाता वीरशैवांसोबत असणारे सिद्धरामेश्वर अथवा सिद्धेश्वर काही बाबतीत वीरशैवांपासून भिन्नत्त्व राखणारेही आढळतात. या काळात कर्नाटक व परिसरात शैव पाशुपत व त्यांच्यातील विविध पंथांचा प्रभाव पडलेला होता. त्यानुसार वीरशैव तत्त्वाचा स्वीकार करण्याआधी त्यांच्यावर लाकुलीश – पाशुपत शैव पंथातील तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला होता असे मत एम. चिदानंद मूर्ती व्यक्त करतात.[223] सिद्धरामेश्वरांचे मूळ नाव धुळिमहांकाळ असे असले तरी नंतर त्याने गुरू मल्लय्याच्या प्रभावाखाली येवून 'सिद्धराम' हे नाव धारण केले.[224] या कालखंडात दक्षिणेत सिद्धसंप्रदाय लोकप्रिय होता. 'प्रभुलिंग' ग्रंथानुसार बसवेश्वरांचे अनुयायी व शून्यपीठाचे अध्यक्ष अल्लमप्रभू व गोरखनाथ यांचा संबंध आलेला होता. अल्लमप्रभूच्या

222. वंड्डे गुरूनाथ, वीरशैव धर्म परिचय, प्रथम आवृत्ती, शकुंतला प्रकाशन, उदगीर जि.लातूर, मार्च 2002, पृ. क्र.74.
223. मूर्ती एम.चिदानंद , मराठी अनूवादक रवींद्र किंबहुने, श्री बसवेश्वर, सुधारित आवृत्ती, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, 2004, पृ. क्र. 60
224. ढेरे रा. चिं., शिखर शिंगणापूरचा श्री शंभू महादेव, प्रथमावृत्ती, श्री विद्या प्रकाशन, पुणे, जुलै, 2001, पृ. क्र. 234

सांगण्यावरून सिद्धरामेश्वरांनी कल्याणी येथे वीरशैव लिंगायत पंथाची दीक्षा घेतली. अल्लमप्रभूना, नाथसंप्रदायी नाथसिद्ध मानतात. अल्लमप्रभू व सिद्धरामेश्वर यांचा एकमेकांवर प्रभाव असल्यामुळे सिद्ध तत्त्वाचा स्वीकार सिद्धरामेश्वरांनी केला असावा. मूळात त्यांच्यावर पाशुपत पंथाचा प्रभाव पडलेला होता. पाशुपत पंथाच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव नाथपंथावरही जाणवतो. या सर्वाचा परिणाम म्हणजे सिद्धरामेश्वरांसाठी नाथसिद्ध होणे व पुढें वीरशैव पंथाचा स्वीकार करणे हे फारसे त्यांना अवघड गेले नसावे.

याशिवाय सिद्धपंथानुसार पाशुपत–कापालिकांची शाखा असणाऱ्या कालामुख पंथाचाही प्रभाव सिद्धरामेश्वरावर असावा. कारण सोलापूर परिसरात इ.स.च्या 10 व्या शतकापासून ते 12 व्या शतकापर्यंत कालामूख संप्रदाय लोकप्रिय होता. पुढे बाराव्या शतकात या पंथाचा प्रभाव हळू–हळू ओसरू लागला. परिणामी वीरशैव लिंगायत संप्रदाय लोकप्रिय झाला. कालामुखी संप्रदायाची मठे वीरशैवांची मठे बनली अनेक कालामुखी गुरू वीरशैवांचे जंगमगुरू बनले याप्रमाणे सिद्धरामेश्वरांनीही अल्लमप्रभूच्या सांगण्यावरून वीरशैव लिंगायत मताचा स्वीकार केला. असे असले तरी त्यांच्यात असणारा मूळचा पाशुपत, कापालिक, कालामुखी अथवा नाथसिद्ध प्रभाव काहीं अंशी तसाचं राहिला. कल्याण क्रांतीनंतर बसवेश्वरांच्या जीवनाचा शेवट कुडलसंगम येथे झाला. नंतर सिध्दरामेश्वर सोलापूर येथे आपले उर्वरित आयुष्य घालवले. या काळात त्यांनी आपल्या जुन्या विचारांचे व बसवविचांराचे समन्वय घडवून आणून एक स्वःताचा नवा तत्त्व प्रवाह निर्माण केला असावा. कारण त्यांचा अनुयायांचा एक मोठा वर्ग होता. जो, की फक्त सिध्दरामेश्वरांनाच मानणारा होता. ज्यात सर्वसामान्य लोकांचा भरणा अधिक होता. ज्यांना मूर्ती – मंदिरपूजा मान्य होती. अशा अनुयायांमुळे किंवा त्यांच्या आग्रहामूळे हे झाले असावे. या संबंधिची चर्चा आपण पूढील प्रकरणात करणार आहोत. सध्या मात्र आपण सिद्धरामेश्वरांचे चरित्र व विचारांची थोडक्यात ओळख करून घेवू.

## सिद्धरामेश्वर चरित्रांची साधने

सिद्धरामेश्वरांच्या चरित्रासंबंधी पुरातत्त्वीय साधनापेक्षा पूराभिलेखीय साधने मोठयाप्रमाणात उपलब्ध आहेत. बसवेश्वरांसंबंधीचे उल्लेख शिलालेखामधून आलेले आहेत पण त्यांच्या शरणांचे उल्लेख मात्र फारसे दिसत नाहीत. कुडल–पानगांवच्या शिलालेखात

सिध्दराम व त्यांच्या शिष्याचा उल्लेख आलेला आहे.[225] याशिलालेखीय साधनाशिवाय स्वतः यांनी रचलेली 851 वचने उपलब्ध आहेत. या वचनामधून त्यांचे जीवन, कार्य व तत्त्वज्ञानाबद्‌दलची माहिती मिळते. या सर्व साधनांसोबतच सिध्दरामेश्वरांचे चरीत्र सांगणारे कन्नड भाषेतील 'सिद्‌धराम चरित्र' हे काव्य ग्रंथ प्रसिध्द आहे. नऊ संधीत विभागलेले 549 षटपदीचे हे काव्य असून या ग्रंथातून सिद्‌धरामांचे चरित्र विविध कथनांच्या माध्यमातून राघवांकाने स्पष्ट केलेले आहे. या ग्रंथाची रचना साधारणतः सिद्‌धरामानी घेतलेल्या समाधी नंतर शंभर ते दिडशे वर्षानंतर झालेली आहे. यामुळे ऐकीव कथांच्या आधारे निर्माण झालेले चरित्र मराठी भाषेत सोलापूरचे रहिवाशी असणारे शिवदास या कवीने विसाव्या शतकाच्या सुरूवातीला मराठी भाषेत सोलापूरहून प्रकाशित केले होते. पण आज दूर्दैवाने ही प्रत उपलब्ध होऊ शकली नाही. मराठी आवृत्तीतील हा ग्रंथ नऊ आध्यायात विभागलेला असून 3392 ओव्यांचा हा ग्रंथ आहे. या ग्रंथाचा उपयोग रा.चिं.ढेरे यांनी 'शिखरसिंगणापूरचा श्री शंभूमहादेव' या ग्रंथाच्या निर्मितीवेळी केलेला होता. संशोधकाने रा. चिं.ढेरे यांच्या कुटुंबियांशी संपर्क साधला असता सध्या हा ग्रंथ त्यांच्याकडेही उपलब्ध नसल्याचे समजते. सिद्‌धरामेश्वरांच्या चरित्रासंबंधी आज उपलब्ध असणारी बहुतांश ग्रंथ राघवांकाच्या 'सिद्‌धरामेश्वरपुराणां'चा आधार घेवून लिहिलेले आहेत.

वरील सर्व साधनाच्या आधारे सिद्‌धरामेश्वरांच्या चरित्राची थोडक्यात माहिती आपण पूढील प्रमाणे घेवू.

## सिद्‌धरामेश्वरांचे चरित्र

सोलापूर (पूर्वाश्रमीचे सोन्नलिंगे) येथील कुडवक्कलिंग जातीतील मोर्डी मुद्यय्या अथवा मोर्डी मुद्यगौडा आणि त्यांची पत्नी सुग्गलदेवी या पती–पत्नीच्या पोटी आयुष्याच्या शेवटच्या काही वर्षी रेवणसिद्‌धांच्या भविष्यवाणीनूसार सिद्‌धरामेश्वरांचा जन्म झाला. वैवाहिक दीर्घ काळापर्यंत अपत्यप्राप्ती झालेली नसल्यामुळे या दांपत्याने आपल्या जातीतील 'बोम्मय्या' नावाच्या मुलास दत्तक घेतले. नंतर मात्र उतारवयात सिद्‌धरामेश्वरांचा जन्म झाला. त्यांच्या जन्मतिथीबद्‌दल मतभेद जाणवतात. रा.चिं.ढेरे यांच्यामते सिद्‌धरामेश्वरांचा

225. ढेरे रा.चिं., शिखर शिंगणापूरचा श्री शंभू महादेव, प्रथमावृत्ती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, जुलै, 2001, पृ.क्र. 233

जन्म इ. सन 1135 यावर्षी झाला.[226] डॉ. जयदेवीताई लिगाडे यांच्या मते इ.स. 1127 साली सोलापूर येथे सिद्धरामेश्वरांचा 'सोलापूर' येथे जन्म झालेला आहे.[227] वीरशैव विश्वकोश खंड 1 या कोषातही इ.स. 1127 हीच जन्म तारीख आढळते.[228] सिद्धरामेश्वरांचा राम, रामय्या, रामनाथ, रामनाथदेव, सिद्धनाथ, सिद्धराम, सिद्धरामेश्वर, सिद्धराम, शिवयोगी इ. उल्लेख कोरीव लेखातून आलेले आहेत.[229] मुद्दगौडा आणि सुग्गलदेवी या कुटुंबियांचे कुलदैवत हे धूळीमंकाळ असल्यामुळे या मुलाचे नावही 'धूळीमंकाळ' असे ठेवण्यात आले. सिद्धरामेश्वर बालपणी मंदबुद्धीचे व शांत वृत्तीचे होते. यामुळे शेतकरी असणाऱ्या आई–वडीलांनी गावातील इतर मुलांप्रमाणे गुरे राखण्याचे काम सोपविले. सिद्धरामेश्वर गुरे राखण्याचे काम करीत असतानाच सवंगडयासह अंबराईत असलेल्या मल्लिकार्जूनाची पूजा करीत बसत आणि बरोबर आणलेल्या दहिभाताचा नैवेद्य शिवाला दाखविल्यानंतरच स्वतः जेवत असे. एक दिवस शिव चिंतेत मग्न असताना सिद्धरामांनी एक कल्पनाचित्र (Fantasy) पाहिले. त्या कल्पनाचित्रात श्रीशैलच्या मल्लिकार्जूनाने प्रगट होवून, आपण निवास करीत असलेल्या स्थानाची सूचना दिल्यासारखे वाटले त्यामुळे सिद्धरामाला तिथे जावून आपल्या इष्टदैवंतांचे दर्शन घेवून यावे असे वाटले.

आई–वडिलांना कल्पना न देताच रानात चरत असलेल्या गुरांना तेथेच सोडून, श्रीशैल्य येथे जाणाऱ्या काही यात्रेकरूसोबत सिद्धराम निघून गेला. संध्याकाळ झाली तरी घरी परत न आलेल्या पुत्रासाठी माता–पिता तळमळत असताना, श्रीशैल्य येथे पोहचलेला सिद्धराम मल्लिकार्जूनापूढे बसून प्रार्थना करीत होता.[230]

---

226. ढेरे रा. चिं., शिखर शिंगणापूरचा श्री शंभू महादेव, प्रथमावृत्ती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, जुलै, 2001, पृ.क्र. 233
227. लिगाडे जयदेवीताई, श्री सिध्दरामांची त्रिवेदी, द्वितीय आवृत्ती, महाराष्ट्र बसवपरीषद, भालकी, जिल्हा बीदर, (कर्नाटक), नोव्हेंबर 2009, पृ. क्र. 01
228. संपादक मंडळ, वीरशैव विश्वकोष, खंड क्र. 01, प्रथमावृत्ती, आखिल भारतीय मराठी वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर, डिसेंबर 2001, पृ. क्र. 167
229. ढेरे रा. चिं., शिखर शिंगणापूरचा श्री शंभू महादेव, प्रथमावृत्ती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, जुलै, 2001, पृ.क्र. 233
230. 'देव असा आहे म्हणून विश्वास ठेवणे अशक्य असे,
हे म्हणून सांगून दृष्टिआड झालेल्या देवाला चांगले म्हणावे का?
देव असा आहे म्हणून विसंबने अशक्य,
आपल्या कार्यासाठी त्रास दिलेल्या देवाला चांगले म्हणावे का ?
कपिलसिध्दमल्लय्या, तुझी लिला कुणास कळली नाही'.
– सिद्धरामेश्वर वचन क्र. 806

काही काळ त्यांनी श्रीशैल्य येथे ध्यान योग धारण केले. याच ठिकाणी त्यांच्यात तात्त्विक विचार रूजून सोलापूरात त्या तत्त्वांचा विकास व प्रसार सिद्धरामेश्वरांनी केला.[231] पुढील कार्यासाठी त्यांचे पुन्हा सोन्नलिंगे (सोलापूर) येथे आगमन झाले. त्यांनी आता संन्यास धारण करण्याचा निश्चिय केला वैराग्य मार्गाचा त्यांनी अवलंब केला. कुटुंबाचा त्याग करून मोठया भावासह गावाबाहेर ते वास्तव्यास आले आता त्यांचा अराध्यदैवत 'कपिलसिद्ध मल्लिकार्जून' झाला.

**श्री शैल्य येथील धार्मिक वातावरणाचा मोठा प्रभाव सिद्धरामेश्वरावरती पडलेला असल्यामुळे तसेच वातावरण सोलापूरात निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.** त्यानुसार लिंगस्थापना, देवस्थान निर्माण, देवस्थानाच्या भोवताली तलाव बांधून धार्मिक कार्यासोबतच सामाजिक कार्यास सुरूवात केली. याच दरम्यान सोलापूर येथेच अल्लमप्रभूशी भेट झाली. अल्लमप्रभूनी सिद्धरामांच्या जीवनातील सुरूवातीच्या कर्ममार्गाची साधना थांबवून त्यांनी भक्ति, वैराग्याकडे वळविले. बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानाने भारावलेल्या अल्लमप्रभूनी सिद्धरामेश्वरांना सोलापूरहुन कल्याण येथे आणले.[232]अल्लमप्रभूच्या मते, 'चन्नबसवेश्वरांना (चन्नबसवेश्वर हे बसवेश्वरांचे भाचे होते) सिद्धरामेश्वरांनी गुरूस्थानी मानावे'. त्याप्रमाणे सिद्धरामेश्वरांनी मानलेले गुरू सिद्धरामेश्वरापेक्षा वयाने लहान असणारे चन्नबसवेश्वर हे होते. चन्नबसवेश्वरांकडून सिद्धरामेश्वरांनी लिंगदीक्षा घेवून लिंगायत धर्म व समाजाच्या प्रगतीसाठी आपले पुढील जीवन अर्पण केले. अल्लमप्रभूनी भूषविलेल्या अनुभव मंडपाच्या अध्यक्षपीठावर आसनस्थ होवून शिवशरणांच्या प्रशंसेस पात्र ठरले.

सिद्धरामेश्वरांनी निर्माण केलेल्या वचनांपैकी 851 वचने आज उपलब्ध झालेली आहेत. 851 वचनापेक्षा अधिक वचनाची निर्मिती त्यांनी केलेली असावी. ते स्वतः एका वचनात, ''अडुसष्ट हजार वचने गाऊन थकले माझे मन'' (सिद्धरामेश्वर वचन क्रमांक 106) असे सांगून आपल्या वचनांची संख्या सूचित केलेली आहे. आपल्या वचनाच्या शेवटी

231. मडके शशीकलाताई राजशेखर, शिवयोगी सिध्दराम चरित्रामृंत, प्रथमावृत्ती राजशेखर च. मडकी, सोलापूर, 2001, पृ. क्र. 30
232. ढेरे रा.चिं., शिखर शिंगणापूरचा श्री शंभू महादेव, प्रथमावृत्ती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, जुलै, 2001, पृ. क्र. 234

सिध्दरामांनी 'कपिल सिद्ध मल्लिकार्जुन' हे अंकित धारण केले कारण श्रीशैल्य येथील मल्लिकार्जुन आता त्यांचे आराध्य दैवत बनले होते.[233]

कल्याण येथे आलेल्या सिद्धरामास आपला अराध्य देव असलेला कपिल सिध्द मल्लिकार्जुन बसवण्णांच्या रूपात आलेला आहे, असे त्यांना वाटले. बसवण्णांच्या बरोबरीने त्यांनी सुध्दा कुलोत्तमवादाचे खंडन केले. ''वेदवाचून वेदाध्ययन केल्याने ब्राह्मण होऊ शकतो का?'' (सिद्ध वच.453) असे आव्हान ते करतात. ''ढोर कक्कय्या, मांग चेन्नय्या या सारख्या शिवभक्ताचे कूळ विचारणाऱ्यास व्यास, वाल्मिकी, कोंडिण्याचे कूळ कोणते? कूळ पाहण्यात काही अर्थ नाही.'' असे प्रतिपादन करीत ते बसवेश्वरांच्या समाज कार्यात एकनिष्ठपणे सहभागी झाले. अनुभव मंडपाच्या कार्यामध्ये मग्न होऊन अद्वैताचा मार्ग शोधत त्यांनी लिंगांग सामरस्यांची रीत जाणून घेतली.

शेतकरी संस्कृतीचा वारसा, श्रीशैल्य येथील तत्त्कालीन निर्माण झालेल्या धार्मिकतेचा प्रभाव, योगीक साधनेचा अभ्यास, स्थावरलिंगाची स्थापना, अशातच बसव व शरणांचा सहभाग या सर्वांच्या सामरस्यातून सिद्धरामेश्वरांचे एक वेगळे तात्त्विक रसायन निर्माण झालेले दिसते. पुढे कल्याण क्रांतीनंतर सिद्धरामेश्वर सोलापूर येथे आले. या कालखंडापर्यंत बसवेश्वर व इतर शरण लिंगैक्य झालेले होते. पुन्हा त्यांनी जीवनाच्या अंतिम काळापर्यंत सामाजिक व धार्मिक कार्यास वाहून घेतले. ते स्वतःच्या स्वतंत्र तत्त्वांचा प्रसार करू लागले. शेवटी इ.स. 1180 साली सोलापूर येथे निर्माण केलेल्या मंदिरात समाधी घेवून लिंगाग सामरस्य साधले.[234]

## सिद्धरामेश्वरांचे साहित्य व वैचारिक प्रवाह

सिद्धरामेश्वरांचे वचन साहित्य श्री.फ.गु.हळकट्टी यांनी परिश्रमपूर्वक शोधून आणि संपादून 851 वचनांचा एक संग्रह प्रसिद्ध केला. त्यातील काही वचने त्यांना ताम्रपटावर मिळाली. सिद्धरामांच्या एकूण वचनांची संख्या 68,000 असली पाहिजे. हे त्यांच्या पुढील वचनावरून स्पष्ट होते. पण ती सर्व वचने आज उपलब्ध होऊ शकली नाहीत.

---

233. मडके शशीकलाताई राजशेखर, शिवयोगी सिध्दराम चरित्रामृत, प्रथमावृत्ती राजशेखर च. मडकी, सोलापूर, 2001, पृष्ठ क्र. 45

234. ''आकाशातील वीजेप्रमाणे, योग्यातील क्रोधाप्रमाणे, वेश्येच्या प्रेमाप्रमाणे, गुरूमुर्तीच्या पादोदकाप्रमाणे, कपिलसिद्धमल्लिकार्जुनाच्या लीलेप्रमाणे, माझ्या प्राण्याचे ऐक्य, तद्वत् शब्दमुग्ध असे शिवशिवा''

''अडुसष्ट सहस्त्र वचने गाऊनी शिणले माझे मन।

गावे एकच वचन, परिसावे एकच वचन।।

विषय सांडूनी, निर्विषयी व्हावे हे एकच वचन।

कपिलसिद्ध मल्लिकार्जुना।।''

सिद्धरामेश्वरांच्या प्रत्येक वचनाच्या अखेरीस, ''कपिलसिद्ध मल्लिकार्जुन'' असे अंकित आहे. तर त्यांच्या त्रिविधींच्या शेवटी ''योगिनाथ'' असे अंकित आहे. वचन साहित्याव्यतेरिक्त ''मंत्रगौप्य'', तीन ''त्रिविधी'' अणि ''कालज्ञान'' नावाचा ग्रंथ, इत्यादी साहित्यही त्यांनी निर्माण केले. त्याद्वारे तत्त्वज्ञान व साधनापद्धतीबद्धल मिळणारी माहिती पुढीलप्रमाणे,

## बसव स्तोत्र त्रिविधी

या त्रिविधीत 124 पदे असून त्यात सिद्धरामांची बसवेश्वरावरील प्राणाधिक अशी निस्सिम भक्ति आणि प्रेम व्यक्त झाले आहे. इष्टलिंग, प्राणलिंग, भावलिंग ही तीनही लिंगे, त्यांना बसवेश्वरांच्या ठिकाणी दिसतात. ''बसव'' या अक्षरत्रयाने त्रैमलाचा नाश होऊन मी नित्य सुखी झालो असून माझ्या अंगलिंगात तूच सामावून उरला आहेस. तू आणि मी एकजीव झालो आहोत. षड्अंगातले षडलिंग तूच झाला आहेस. अशा भक्तीभावाने सिद्ध रामांनी बसवेश्वरांचे स्तवन केले आहे.[235]

## मिश्र स्तोत्र त्रिविधी

या त्रिविधीत 109 पदे आहेत. प्रारंभीच्या वीस पदामध्ये बसवेश्वरांचे स्तवन आहे. त्यापुढील 29 पदामध्ये सिद्धरामेश्वरांचे गुरू चन्नबसवेश्वर यांनी त्यांना लिंगदीक्षा दिल्याचा उल्लेख येतो. विहिरी, तलाव, मंदिरे इत्यादी बांधणाऱ्या माझ्या सारख्या कर्मयोग्याला प्रभूदेवानी कल्याण येथे नेले आणि चेन्नबसवण्णांकडून लिंगदीक्षा घेतली आणि तेव्हापासून कर्मयोगी असलेला मी शिवयोगी झालो असे त्यांनी म्हटले आहे. त्यानंतरच्या 19 पदांत श्री प्रभूदेवांचे स्तवन आहे आणि उरलेल्या पदात अनेक शिवशरण आणि शिवशरणी यांच्याबद्धल आदर, भक्ती, प्रेम व्यक्त झाले. दासोहमूर्ती निलम्मा,

---

235. कंदसंख्या–01, पदयसंख्या 01 ते 126

लिंगनिष्ठा तत्पर्य सोडूळ बाचरस, निश्चल भक्तिचा निर्लज्ज शांत गुरू, मालिंन्य दूर करणारा सगरचा बोम्मय्या. नगर संचार करून तत्त्वोपदेश करणारा निगमाचा बोम्मय्या. सम्यक चारित्र्याने युक्त बहुरूपी चौडंय्या, शब्दांच्या अंतरी असलेले ब्रह्मज्ञान जाणणारा कलकेत ब्रह्मय्या, योध्यांतील योध्दा जोधर मायण्णा, शिवसानिध्य पावलेला त्रिनयन दासय्या, दशवायुचे भेद जाणणारा मोरन वेमय्या, मुक्ती मंदिरात आरूढ झालेला ब्रह्मय्या, जन्मदात्री नीलम्मा, आजी महादेवी, सांभाळणारी अक्कनागम्मा, प्रसाद देणारी मुक्तायक्का, ज्यांच्या घरचा प्रसाद बसवेश्वरांनी आणला ते कक्कय्या, खजिनदार चिक्कय्या, रतय मुद्दय्या, रक्कज्ञ बोमय्या, थाकटा मादण्णा, माता महादेवी, थोट अजगण्णा, अशा अनेकविध शरणांना 'जयजयतु शरणु' असे आदराने विनवून ''शिखी कर्पुराप्रमाणे या शरणवृदांच्या चरणी लीन झालो.'' असे गाईले आहे.[236]

## अष्टावरण स्तोत्र त्रिविधी

लिंगायत धर्मपंथात अष्टावरणाचे स्थान मोठे आहे. लिगांग सामरस्याचे ज्ञान करू देण्यास अष्टावरण चिन्हे उपयुक्त आहेत. गुरू, लिंग, जंगम, पादोदक, प्रसाद, विभुती, रूद्राक्ष, मंत्र ही ती चिन्हे होत. सिद्धरामांच्या अष्टावरण त्रिविधीत 144 पदे आहेत. सदाचाराचे आचरण ठेवून सद्धशक्ती आणि सम्यकज्ञान प्राप्त करून घेण्यास अष्टावरणातील निष्ठा आवश्यक आहे. असे या त्रिविधीत म्हटले आहे.[237] अष्टावरण चिन्हांच्या महंतीचे श्री सिद्धरामेश्वरांनी पुढीलप्रमाणे वर्णन केलेले आहे.

### गुरू

हे गुरू, तव चरण कृपेने मला इष्ट लिंगाची प्राप्ती झाली. तूच इष्ट लिंग, प्राणलिंग, भावलिंग या त्रैलिंगाचे ज्ञान मज करून दिलेस. षडांगांचे षड्लिंगामधील सदमल असे क्रिया संबंधीचे ज्ञान तुच करून दिलेस. मज शिवतत्त्वामृत पाजून लिंगैक्य साधविलेस. हे गुरू तू परमानंद –मुक्तांनदाची मंगलमुर्ती आहेस. शून्य ह्दयानंदाच्या मंडपात कोटी प्रभांचे तेज तूच प्रकटवितोस.[238]

236. पदसंख्या 01 ते 109
237. अष्टावरण, पदसंख्या 01 ते 144
238. अष्टावरण, पद 01 ते 50

## लिंग

हे लिंगमुर्ती तू मंगलमय आहेस जगाच्या, आरंभाचे मुळ तूच आहेस. तू विश्वव्यापी आहेस. विश्वाचे चक्षू, मुख, बाहू तूच आहेस. जनन–मरणाच्या बंधनाच्या पलिकडच्या हे लिंगदेवा, भक्तिला भाळून तू माझ्या करस्थळी जन्मलास, तत्त्व, ब्रह्मांड यांच्या अतित असूनही शरणाच्या भक्ती, ज्ञान, क्रिया इत्यादीमुळे त्यांच्या हाती तू सुक्ष्म रूप धारण केलेस.[239]

## जंगम

अंगच्या कलांकुरांना लिंगाठायी निश्चल केल्यानंतर मंगलमय बनलेल्या मनाला जंगमाची घनश्रेष्ठता पटली. सुज्ञानभरीत क्रिया–शक्तीयुक्त, जंगम, तूजशरणू शरणार्थी म्हणून मी जगत आहे. हे जंगम, तव, मूर्ती जगात भरून उरली आहे. लिंग, जंगम व मी असा भेदच आता उरला नाही. लिंग जंगम मीच झालो आहे.[240]

## पादोदक

पादोदक, लिंगोदक, मज्जनोदक, स्पर्शनोदक, अवधानोदक, आप्यायनोदक, हस्तोदक, परिणामोदक, निर्नामोदक, सत्योदक अशा प्रकारे पादोदक स्वरूपांतील दहा भेद निरूपिले आहेत.[241]

## प्रसाद

गुरू प्रसाद, लिंग प्रसाद, जंगम प्रसाद, प्रसादाचा प्रसाद, आप्यानप्रसाद, समयप्रसाद, पंचेंद्रियविरहित प्रसाद, अंतःकरण चतुष्टविरहित प्रसाद, सध्दावप्रसाद, समताप्रसाद, ज्ञानप्रसाद या प्रकारे प्रसाद स्वरूपातील अकरा भेद बोधिले आहेत.[242]

## विभूती

श्री गुरू चेन्नबसवकृपेने चिन्नाद, चिदबिंदू, चिज्ज्योती संयोगाने, मंत्रधारणेने चिदभसित होते. गुरूरूपी ही विभूती चर म्हणविणारी ही विभूती, वसलिंग चिद्रप अशा विभूतीय गुरू चेन्नबसवण्णा यांनी आपल्या हाती घेवून माझ्या मस्तकीधारण केले. अशा

239. अष्टावरण, पदसंख्या 51 ते 85
240. अष्टावरण, पदसंख्या 86 ते 91
241. अष्टावरण, पदसंख्या 106 ते 109
242. अष्टावरण, पदसंख्या 92 ते 105

विभूतीस नमो नमः म्हणून त्रिकाल धारण करून त्रिमलरहित मी झालो आहे. अत्यतिष्टदशांगुल भसितास धारण करून मी मुक्त झालो.[243]

### रूद्राक्ष

चिद्रमणाच्या निजभालाक्षाने निर्माण झालेल्या रूद्राक्षास मी अत्यंत भक्तीभावाने धारण करितो. मनास मांगल्यकर, तनास सुखविणारे, विनय–प्रसाद साध्य करून देणारे रूद्राक्ष मी धारण करतो. धारण केल्याने मी परम भूरूद्र झालो. रूद्राक्ष हे रूदमुख जाणून, रूद्रज्ञानाने ते धारण केल्यास तोच रूद्र होतो.[244]

### मंत्र

पंचाक्षरी महामंत्र सप्तकोटी मंत्राची माता आहे. तो सगळया मंत्राना पूज्य आहे. महिमान्वित परिपूर्ण आनंद अनुभवाचे ज्ञान प्राप्त करून देणारा आहे. पंचाक्षरीचे शिवतत्त्व व ज्ञान संबंध व चेन्नबसव जाणतात. मला त्यांनी आरूढ अशा निज पदाची प्राप्ती करून दिली. त्या योगे जनन–मरण–रहित होऊन मी निश्चिंत सुखी झालो.[245] अशा प्रकारे लिंगायत धर्मातील वैशिष्टपूर्ण षटस्थल ज्ञानाचा बोध व्हावा म्हणून श्रीसिद्धरामेश्वरांनी स्पष्ट केले आहे.

या वरून हे सिद्ध होते की, सिद्धरामेश्वरांच्या साधनातत्त्वावर बसवेश्वर प्रणित वीरशैव लिंगायत तत्त्वांचा मोठा प्रभाव जाणवतो. लिंगदिक्षा घेण्याअगोदरचे साधना तत्त्व व लिंगदीक्षा घेतल्यानंतर वीरशैव लिंगायत तत्त्वाचा प्रभाव त्यांच्यावर निर्माण झाला. मात्र कल्याण क्रांतीनंतर या दोन्ही तत्त्वांमध्ये समन्वय झाल्याचे स्पष्ट दिसते.

---

243. अष्टावरण, पदसंख्या 110 ते 124
244. अष्टावरण, पदसंख्या 125 ते 129
245. अष्टावरण, पदसंख्या 130 ते 144